म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ९५०
IRBK-0100950
IRBK-0100950
IRBK-0100950

... ... १०८४ ...
वा. क्र. ... ५० ... दि. ...
वि. ... नाटक ...

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

सूचना :- खाली दिलेल्या ... पुस्तक परत करावे,
नाहे ...

ॐ भारत.

आ. क्र. २५-१-३० ... १५

# संगीत कायदेभंग.

( सामाजिक नाटक )

अंक १ ते ३.

लेखकः—भा. गो. पेंढारकर.

IRBK-0100950

—प्रकाशक—

परचुरे, पुराणिक आणि मंडळी, बुकसेलर्स,

माधवबाग, मुंबई नं. ४.

सन १९३० ] किंमत १ रुपया [ शके १८५१

मुद्रक—**रघुनाथ रामचंद्र बखले**, मुंबईवैभव प्रेस, सर्व्हंट्स् ऑफ इंडिया सोसायटी, सँढर्स्टरोड, गिरगांव–मुंबई.

प्रकाशक—**बळवंत विष्णु परचुरे**,
व्यवस्थापक, परचुरे पुराणिक आणि मंडळी, बुकसेलर्स माधवबाग, मुंबई नं. ४.

या नाटकाच्या पुनर्मुद्रणाचे, रंगभूमीवर प्रयोग करण्याचे, भाषांतर, रूपांतर व चित्रपटासाठीं कथानकाचे वगैरे सर्व हक्क ग्रंथकर्त्याकडे आहेत.

प्रस्तावना ५०

प्रस्तुत नाटकच एका विषयाची प्रस्तावना आहे.

बादशाही बोर्डिंग हाऊस
सोमवार पेठ, पुणें.

"पवित्र पितृचरणीं सादर समर्पण"

ॐ भारत.

# संगीत कायदेभंग नाटक.

## अंक पहिला.

### प्रवेश १ ला.

स्थलः—( रस्त्यालगत छोटेंसें उद्यान. पुढें असलेली घराची पुढील बाजू. पडवींत क्रांति, अनुकंपा, दया, मोहिनी, लज्जा व रूढीराम. )

**मंगलाचरण. १**

**गोकुललाल बाल । असुरकाल मुनिध्यान ।**
**भयद होय हें विशाल । बंधन खलजाल ॥ ध्रु० ॥**
**हे शांतवदन शाम । वंदि क्रांति कमलचरण ।**
**सुदिन लाभ प्रार्थी दिव्य । ये स्वातंत्र्य काल ॥ १ ॥**

( क्रांति, लाजून मध्येंच स्तब्ध राहिल्यानें )

**मोहिनीः**—काय ग क्रांती, गाणं कां थांबवलंस ? बुद्धि गोंधळली कीं, जिव्हा जड पडली ?

**लज्जा०**—अग, तिची बुद्धि गोंधळली नाहीं आणि जिव्हाहि जड पडली नाहीं, प्रियकराचं नांव घेतल्यामुळं, तिचं हृदय लाजलंय.

**दया०**—जाऊं दे ग ! मनपसंत नवरा मिळाला म्हणजे दुसऱ्याची हेटाळणी करूं नये अशी !

**क्रांतिः**—मनपसंत नवरा मिळाला कीं, लग्न झाल्यामुळं मनाला पसंती द्यावी लागली, हें तिचं तिलाच माहीत !

**लज्जाः**—कांहीं असलं, तरी माझं ठीकच आहे. तूं मात्र आतां मनपसंत नवरा पहा म्हणजे झालं !

**रूढीरामः**—तें काम माझं ! हो, जातीनं वेगळा असलों, तरी तुमच्या घरच्यासारखाच मी ! आम्हीं अगदीं मनपसंत मुलगा पाहिला आहे.

**क्रांतिः**—रूढीराम, वाद तुमच्या मुलग्याबद्दल नसून माझ्या भावी पतीबद्दल चालला आहे.

**रूढी०**—मी तुझ्या भावी पतीबद्दलच बोलत होतों. आम्ही पाहूनहि ठेवला आहे एक वर !

**क्रांतिः**—तुम्ही वर पाहून, मला खालीं पहाण्याची वेळ न येवो म्हणजे ठीक !

**लज्जाः**—होय का ? बरं झालं बाई ! कोण ? कोण ते ?

**क्रांतिः**—लज्जे, नांवापुरतं तरी लाजायचं होतंस !

**लज्जाः**—अग, माझं नांव लज्जा असलं तरी यावेळीं लाजायचं तूं ! मी नव्हे !

**क्रांतिः**—आणि न लाजलें तर ?

**दयाः**—तर ? तर निर्लज्ज म्हणतील लोक !

**लज्जाः**—कायहो रूढीराम, कोण ते ? नांव काय त्यांचं ?

**क्रांतिः**—लज्जे, माझ्या भावि पतिराजाबद्दल जर तुला इतकी कळकळ तर माझ्याशीं खरोखरीच लग्न झालेल्या पतिबद्दल तूं अगदीं—

**लज्जाः**—काय म्हटलंस ? तुझ्या नवऱ्याला मी अगदीं–पुढं बोल पाहूं !

**दयाः**—गप्प बसा ग ! लज्जे, क्रांतीच्या नादीं लागूं नको. ती बोलबोलून रडवील तुला ! काय हो रूढीराम, नांव काय त्यांचं ?

**रूढी०**—नाहीं ! अद्याप तसं नक्की झालं नाहीं. पण–

लज्जाः—हो, पण त्यांचं नांव काय ?

रूढी०—त्यांचं नांव होय ? त्यांचं नांव–

क्रांतिः—रूढीराम, सांगा, त्यांच्याशीं लग्न झालं, तरी तें व्हायचं माझं. तुम्ही कशाला लाजायला हवं ?

रूढी०—तसं नव्हे, पण त्यांचं नांव–

क्रांतिः—हं, आतां आलं ध्यानांत ! अग दया, अद्याप त्यांचं नांव ठेवायचं राहिलं आहे.

लज्जाः—अगबाई, आणि मग ?

क्रांतिः—मग काय ? तुम्हीआम्हीच ठेवायचीं त्यांना नांवं. विवाहाच्या विधी अगोदर, बारशाचाच बेत करावा लागणारसं दिसतं.

रूढी०—क्रांति, काय हें ! त्यांचं नांव ऐकल्यावर तूं अशी थट्टा करणार नाहींस. ते सरदार असून–

क्रांतिः—अहो, 'स–र–दा–र' या चार अक्षरांनीं, त्यांच्या स्थावर–जंगम जिनगीची चतुःसीमा डोळ्यापुढं उभी रहात नाहीं. उलट, नांवामागं लागलेली सरदारी, केव्हां केव्हां नादारीपर्यंत फरफटत नेऊन, जगूंसुद्धां देत नाहीं; म्हणून म्हणतें त्यांचं नांव गांव सांगा अगोदर.

रूढी०—त्यांचं नांव सरदार कज्जलेश्वर !

सर्वचः—( साश्चर्य ) काय ? ( क्षणभरानं साऱ्याजणी दुःखानं खालीं पहातात. )

रूढी०—त्यांचं, सम्राटाजवळ चांगलं वजन आहे !

क्रांतिः—हं ! तेव्हां हाच वजनदार दगड गळ्यांत बांधून, मला भवसागरांत बुडवायचा बेत आहे वाटतं बाबांचा !

लज्जाः—पण त्यांच्याबद्दल लोकमत अगदीं वाईट आहे म्हणे !

रूढी०—पण राजमत उत्तम आहे ना ?

दयाः—परवांच त्यांनीं त्या प्रभेला पळवून नेली ! तिच्या आईनं, बिचारीनं विहीर जवळ केली. शिवाय काय तें हिडिस ध्यान ! आणि तो नवरा का क्रांतीला ? इश्श !

रूढी०—इश्श ? इश्श—करण्याइतके ते खास वाईट नाहींत.

क्रांतिः—रूढीराम, सरदार कज्जलेश्वर तुम्हाला वाईट दिसत नसतील, तर तुम्ही लावा त्यांच्याशीं लग्न ! चला, पुन्हां या बाबतींत एक अक्षरहि बोलूं नका इथं ! घिसाडघाईंत घडलेले तुम्हां दोघांचे चेहेरे, पुन्हां कुणालाही दाखवूं नका. भित्र्या पोरी, किंकाळी न फोडतांच मरायच्या !

रूढी०—क्रांति, कुरुप असणें हा कांहीं गुन्हा नाहीं ?

क्रांतिः—कबूल करतें मी तें ! पण दुर्गुणी असणं, कुलीन पोरींनां फसवून, त्यांना जुलमानं भ्रष्ट करणं, हाहि गुन्हा नाहीं अशी कां तुमची रूढि सांगते ? रूढीराम, स्वजातियांच्या बऱ्यावाईट गोष्टींबद्दल, स्त्रीजातीइतकी बारीक चौकशी, अराजकांच्या अड्ड्यावर नेमलेला गुप्त-हेरहि करीत नसतो. कज्जलेश्वराचं, अंतरंगही बहिरंगाप्रमाणं अंधकारपूर्ण आहे हें जगजाहीर आहे.

रूढी०—क्रांती, त्या कज्जलेश्वराशीं तुझा विवाह झाल्यावर, उत्पन्न झालेल्या आपलेपणानं, तुला त्यांचा कृष्णवर्ण मोहक दिसेल. ज्ञातीभैरवांच्या अभिवचनांत जर कांहीं अर्थ असेल, तर कज्जलेश्वरांच्या दुष्कृतींचासुद्धां, पौरुषपूर्ण वीरकृति, म्हणून तुला गौरव करावा लागेल. तुझ्या वडिलांनीं त्यांना वचन दिलं आहे. तुमच्या ज्ञातींत कज्जलेश्वरांखेरीज इतका श्रीमंत, इतका वजनदार एकहि पुरुष नाहीं.

क्रांतिः—रूढीराम, तुमच्या व्यवहारी जगाप्रमाणं स्त्रियांच्या मनाची स्थिति नाहीं. श्रीमंतीच्या व मानमरातबाच्या आड, सर्व सद्गुण व सर्व सुख-साधनं लपलीं आहेत, असं सुविचारी स्त्रियांना वाटत नाहीं. त्याचप्रमाणं, दरिद्र्याला लक्ष्मीबरोबर सद्गुण व अंतःकरण हीं सोडून जातातच असा भ्रम त्यांना कधींहि होत नाहीं.

## पद. २

**काल उलटला निर्धन ठरतां । नाश जगति झाला ॥ध्रु०॥**
**गुण-गत झाले पापी ठरले । जवळी ज्यांच्या धन ना**
**उरलें ? असें न मानी अबला ॥ १ ॥**

**रूढी०**—पण क्रांति—

**क्रांति०**—रूढीराम, कज्जलेश्वरांची वकिली पत्करलीत वाटतं ? पण या सर्व वाटाघाटींचा कांहींच उपयोग नाहीं !

**रूढी०**—कारण ?

**क्रांतिः**—तें तुम्हाला सांगण्याची माझी इच्छा नाहीं.

( रूढीराम रागानें जातो. )

**ज्ञातिभैरवः**—( प्रवेश करून व अनुकंपेकडे पाहून. ) क्रांति, ही कोण नवी मुलगी ?

**क्रांतिः**—शेजारीं राहणाऱ्या फुलवंती माळणीची मुलगी ! तिचा नवरा, तिकडे राजधानींत सम्राटांचा बाग-कामगार आहे. चार दिवस आईकडे आली आहे. लहानपणीं तुम्हीं पुष्कळदां पाहिली आहे तिला.

**ज्ञाति०**—पाहिलेली बारिकसारिक वस्तू, मेंदूत कायमपणें ठसून राहिली, तर मेंदूचा अजबखानाच व्हायचा ! शिवाय लहानपणीं ती जशी होती तशी कुठं आहे आतां ? तूं तरी कुठं आहेस तशी म्हणा ! तूं शहाणी-फारच शहाणी झाली आहेस !

**क्रांतिः**—मला नाहीं वाटत तसं ! आणि मी शहाणी झालें तरी बिघडलं कुठं ? ज्ञानसूर्याचा प्रकाश कुणालाही हितप्रदच होईल.

**ज्ञातिः**—होय. पण तो सहनीय आहे तोपर्यंतच ! हाच तुझा सूर्य जवळ येऊन, दोन हातांवरून डोळे फाडून पाहूं लागला, तर क्षणार्धांतच डोळे पिटायचे, आणि सरणाशिवाय राख व्हायची !

क्रांतिः—काय बाबा हें ! ओढूनताणून भलताच अर्थ करण्यांत काय अर्थ आहे ? ( कानांत ) शेजारच्या मुली आहेत ना इथें ?

ज्ञाति०—( ओरडून ) होय ! त्यांच्यादेखत तुला बोललों तर अब्रू जाईल ना तुझी ? पण बापाच्या अब्रूचं दारुकाम करून, तें आकाशांत उडवितांना, लोक तुला पहाताहेत याची कांहीं शुद्धी होती कां तुला ?

क्रांतिः—म्हणजे ? मी नाहीं समजलें आपण काय म्हणतां तें ?

दयाः—( मुली उठून ) क्रांति, आम्ही येतों बाई आतां. ( जाऊं लागतात ).

ज्ञाति०—थांबा ! लाडानं फाजील झालेल्या आणि अमर्याद स्वातंत्र्यानं शेफारलेल्या, तुमच्या क्रांतीचा चटोरपणा ऐका आणि मग जा. तिच्या सहवासानं तुमचाहि मेंदू भडकला असेल तर तो सावध होईल.

क्रांतिः—पण बाबा, असं झालं तरी काय माझ्या हातून ?

ज्ञाती०—थांब ! तेंच मी आतां सांगणार आहें. ( मुली बसतात ) क्रांति, तुला गातां येतं, दिलरुबा वाजवितां येतो; कविता करतां येतात ?

क्रांति—होय.

ज्ञाति०—कविता कशानं सुचते ?

क्रांतिः—कोणत्याहि गोष्टीचं, वस्तूचं, अगर कल्पनेचं वैशिष्ट्य हृदयाला पटून, प्रतिभा जागृत झाली कीं कविता सुचते.

ज्ञाति०—हं ! आणि गायन केव्हां सुचतं ?

क्रांतिः—भावनांच्या उत्कटतेनंतर.

ज्ञाति०—( कागद दाखवून ) ही कविता कुणाची आहे ?

क्रांतिः—( खालीं मान घालून. ) माझी.

ज्ञाति०—( संताप आवरून ) कधीं केलीस ? आणि कुणाबरोबर पाठविलीस ?

क्रांतिः—परवां-अशोक वनांत-मी-ती सहज गात बसलें होतें !

ज्ञाति०—पुढं ?

क्रांतिः—सहज ते तिथं आले आणि त्यांनींच ती लिहून घेतली.

ज्ञाति०—स्पष्ट बोल! निर्लज्जपणानं वागून, लज्जाशील नायिकेची लट्की लाज आणूं नकोस. तो कोण? त्याचं नांव काय?

क्रांतिः—त्या कवितेंतच आहे तें.

ज्ञाति०—तूं सांग! होय, बाकी प्रतिभेच्या भरारीवर बसून आलेल्या उपाध्यायानं आगाऊच तुमचं लग्न लावलं असेल तर त्याचं नांव घ्यायला लाजायची तूं! लाजेचा अलंकार तुझ्यासारख्या स्वैर पोरींनीं वापरला, तर लज्जा हें निर्लज्जांचं भूषण ठरणार! सांग त्याचं नांव ?

क्रांतिः—त्यांचं नांव सरदार सुदीन !

ज्ञाति०—ऐकलंत ? ऐकलात या स्वेच्छाचारी कुलटेच्या कवितेचा आणि प्रेमाचा विषय ! स्वतःबरोबरच ज्ञातीच्या उच्चत्वाला, घराण्याच्या प्रतिष्ठेला, आणि समाजाच्या कायद्यांना धाब्यावर बसवून, त्या हीनकुलोत्पन्नावर प्रेम–गीतं करून गातांना, क्रांति, तूं कसल्या कैफानं बेहोष झाली होतीस ?

क्रांतिः—पण बाबा, ते हीनकुलोत्पन्न आहेत असं आपल्याला कुणी सांगितलं ? ते अस्सल क्षत्रीय आहेत !

ज्ञाति०—आणि तूं–ब्राह्मण आहेस! तुझ्या प्रेमाला पात्र होण्यासारखा एकहि ब्राम्हणपुत्र तुला दिसला नाहीं ? रूढीचीं बंधनं, धर्माच्या आज्ञा, विकाराच्या लहरीसरशीं प्रत्येक आर्यस्त्रीनं तोडलीं असतीं, तर आज हिंदुधर्म भारतवर्षांत नांवालाहि राहिला नसता !

क्रांतिः—बाबा, रूढीचीं बंधनं समाजाच्या सोयीसाठीं असतात. आणि तीं, कारणपरत्वें दृढ अगर सैल केलीं जावींत. पण धर्म हा आत्म्याच्या उद्धारासाठीं असतो, आणि त्याचं मूळस्वरूप सर्वकाल एकच असतं. क्षत्रियाशीं ब्राह्मणकन्येनें विवाह केल्याचीं अनेक उदाहरणं दाखवितां येतील.

चालू समाजाचा कायदा भंगल्याबद्दल, समाज मला जी शिक्षा करील, ती भोगायला मी तयार आहें.

ज्ञाति०—कारटे, तुझं तत्वज्ञान बंद कर! रूढीचीं बंधनं सैल करावयाचीं झालीं, तर तो अधिकार सर्वमान्य धर्मगुरूकडे आहे. वाटेल त्या बहकलेल्या मुलीच्या शब्दाबरोबर, समाजाचे कायदे बदलते, तर वारांगनेच्या प्रत्येक पाऊलागणिक, एक एक कायदा, समाजाच्या माथीं मारला जाता. कारटे, तुझ्या रक्तांतील संस्कारसुद्धां, कामवासनेच्या विषानं निर्जिव झाले काय?

क्रांतिः—बाबा, ज्या धर्मावतार जगद्गुरुबद्दल आपण बोलत आहांत, त्यांनीं गेल्या शंभर वर्षांत, आपल्या मस्तकावरील मुगुट बाजूला सारून, बदलत्या परिस्थितीचा कितीसा विचार केला आहे? सामाजिक विषयाबद्दल एक प्रकारची अनास्था दाखवून, त्यांनीं आपला सर्वमान्य अधिकार, जवळ जवळ गमावला आहे. क्षत्रियांना स्वतःपेक्षां हीन समजण्याचा, ब्राम्हणांना केव्हांहि अधिकार नव्हता व नाहीं! रूढीप्राबल्यानं व वंशानुवंश संपादन केलेल्या ज्ञानानं. त्यानां उच्चपद प्राप्त झालं होतं, पण गेल्या शंभर वर्षांत ज्ञानसंपादनाचं पवित्र कार्य टाकून, ब्राम्हणांनीं, क्षत्रियाइतक्याच कुशलतेनं तरवार परसावली, मनसबदारी स्वीकारली, आपल्याच धर्मभगिनी मोंगलांच्या जनानखान्यांत जाऊं दिल्या; इतकंच नव्हे, तर त्यांना सम्राज्ञी मानून कुर्निसात करायला सुरवात केली! क्षमा शांतीचे अवतार, दररोजच्या भाकरीकरितां, आप्तेष्टांचे हत्यारी बनले! त्यावेळीं, त्यांची संस्कृति झोंपली होती, समाजबंधनं तुटलीं होतीं; त्यांचा अभिमान बेभान झाला होता. आणि धर्मसंमत मार्गानं वागून स्वतःच्या देशासाठीं झगडणारा तरुण मात्र, तुमच्या दृष्टीनं हीन ठरला, त्याच्याशीं विवाह करणारी कुलटा ठरली.

ज्ञाति०—एकंदरींत, उद्यां एखाद्या ब्राह्मणाच्या मुलीला, खुशाल एखाद्या महारानं पळवून न्यावी आणि तिनंहि त्याचा हात धरून, मोठ्या आनंदानं त्याचीं गाडगीं मडकीं धुवायला, रस्ते झाडायला निघून जावं तर?

क्रांतिः—लौकिकबंधनं शिथिल करणं, म्हणजे अनीतीला व पळापळवीला वाव देणं नव्हे. मोंगली सत्तेच्या रुळाखालीं, आपण सरसहा सगळेच चिरडले जात आहोंत, यांतून उठतांना आपली उत्क्रांति करून घेऊन, सदाचरण आणि ज्ञान, यांनीं महार युक्त झाले, तरचा तो प्रसंग आहेच ! सुधारणा सुचली तरी ती शक्यतेच्या कोटींतील पाहिजे. अविचारानं एकदम पंधरा हात मारलेली उडी, प्राणघातक ठरते.

ज्ञाति०—हाच तुझा सुदिन, दिल्ली दरबारचा मोहबतखां असता तर ?

क्रांतिः—तर ? त्यांच्या गुणाबद्दल मला आदरच वाटला असता.

ज्ञाति०—आदरच फक्त ? कां ? प्रेमहि उत्पन्न झालं असतं !

क्रांतिः—शक्य नाहीं. भिन्नधर्मियांवर बसण्याइतकं माझं प्रेम अविचारी नाहीं. आणि तसं तें बसलं असतं तरी निष्फळ झालं असतं. ऐहिक सुखाकरितां, अनंत जन्मींच्या आत्म्याचा उद्धारकर्ता धर्म दूर सारण्याचा मोह मला झाला नसता. धर्माचं मोल देऊन प्रेम विकत घेण्याची कुणालाही इच्छा होऊं नये.

ज्ञाति०—हींच बंधनं जरा दृढ केलीं असतींस तर ब्राह्मणज्ञातींतच लग्न करण्याचं महत्व तुझ्या विचारसरणीला पटलं असतं !

क्रांतिः—पटलं असतं कां ? पटेलही ! पण धर्मभंगाइतकं रूढीभंगाला मी महत्व देत नाहीं. याच्या मुळाशीं माझी दोन्ही जातींबद्दलची तुलनात्मक दृष्टी नाहींच मुळीं !

ज्ञाति०—मग रूढीभंगापर्यंत ताणलेली विचारशृंखला, अशीच धर्मभंगापर्यंत ताणलीस, तर या ज्ञानाच्या आणि सौंदर्याच्या जोरावर, तुलाहि कदाचित युवराज्ञीपदाचा मान मिळेल !

क्रांति०—बाबा, काय बोलतां हें ? इतक्या ताणाताणींत ती शृंखला तुटेल. कोणत्याहि सुखाच्या आशेनं त्याग करतां येण्याइतका धर्म क्षुद्र

नाहीं. अनंत जन्मींच्या प्राणत्यागानेंहि, धर्मत्यागाचं पाप धुतलं जाणार नाहीं. समाजाचे कायदे, शिथील अगर दृढ करतां येतात, हें जसं मला पटलं आहे, तसंच धर्माच्या—वेदप्रणित धर्माच्याबाबतींत, आम्ही ढवळाढवळ करण्याइतका तो हलका नाहीं हेंहि मला पटलं आहे.

ज्ञाति०—मूर्ख नाहीं तर ! या सर्व वाक्पांडित्यांत, वाक्यांच्या करामतीशिवाय आणि शब्दांच्या गोलंदाजीशिवाय मला कांहींच दिसत नाहीं. हिंदुधर्म हा रूढीशीं इतका निगडित आहे कीं, रूढीप्रमाणं वागणं हेंच धर्माचरण आहे.

क्रांतिः—बाबा, वेद, श्रुति स्मृति व सदाचार यांवर हिंदु धर्माची प्रमुखपणें उभारणी आहे. स्मृतीच्या आज्ञा, सदाचाराच्या कल्पना, कालमानाप्रमाणं बदलत आल्या आहेत. वेदकालीं, मद्यपान संमत होतें. मांसाहार निषिद्ध नव्हता तो आतां झाला. बुद्धधर्मानं संन्याशांचा सुळसुळाट करतांच, बालविवाह सदाचार ठरला. रूढींत बदल होणं, हींच समाजाच्या जिवंतपणाचीं लक्षणं आहेत. नव्या युगाबरोबर बदलत न जाणारी रूढि, समाजघात करते. इच्छा असो वा नसो, काल समाजाला बदलत ओढत नेणार ! मग सर्वच जुनं तें सोनं म्हणणारे कांहींहि म्हणोत.

ज्ञाति०—समजलों. या सर्व भरमसाट विधानांच्या जोरावर, तूं सुदीनशीं विवाह करण्याच्या कल्पना करते आहेस. समाजाला बंधनांची अडचण भासूं लागली तर ती, तो शिथील करील. ती उठाठेव, तुझ्यासारख्या बोलभांड पोरीनं नको करायला ! क्रांती, हा तुझ्याकडे दोष नाहीं ! माझ्याच बेसावधपणाचीं कडू फळं, मला आज चाखावीं लागत आहेत. पण, मी तीं मुकाट्यानं चघळीन असं समजूं नको. सुदीनशीं तुझा विवाह होऊन, माझं घराणं ज्ञातिभ्रष्ट केलेलं पहाण्यापेक्षां, मी तुझा या तरवारीला बळी देईन ! अविचारपूर्वक, या समाजाचे कायदे अवमानण्याचा बेफामपणा तूं दाखविलास तरी, या प्रबल सत्ताधारी समाजाला डिवचण्याचं सामर्थ्य, माझ्या अंगीं नाहीं.

पद ३

॥ रुचत ना मन्मना ! हे वच । ते अदय भयद । तव आप्तबंधु निकटसह घात करिति ॥ खरि तळमळ ॥ ध्रु० ॥ धरित बळ प्रखर भयंकर अविरत । कृतांत-सम अकरुण जनता । तुज ॥ सहज मारविल ॥ १ ॥

समाजाशीं वैर धरणं, म्हणजे माशानं पाण्याशीं वैर करण्याइतकं हास्यास्पद व घोर परिणामीं आहे. या कायदेभंगाबद्दल, जुलमी सम्राटापेक्षांहि कठोरपणें, समाज तुझा–तुझ्या आप्तेष्टांसह बळी घेतल्याखेरीज राहणार नाहीं.

क्रांतिः—होय. या सर्वसमर्थ समाजाला, त्याच्या वटारलेल्या डोळ्यांदेखत, प्रत्यही आपल्या धर्माचें मोंगली तरवारीनं तोडलेले तुकडे दिसत नाहींत, शहानशहाच्या जनानखान्यांत लोटलेल्या आयाबहिणी दिसत नाहींत, पवित्र गोमातेच्या रक्ताचे पाट रस्तोरस्तीं वाहविलेले पहातांना, या सर्वसमर्थ समाजाला चीड–चेतना उत्पन्न होत नाहीं, मुसलमान भटाऱ्यांच्या हातचे निषिद्ध पदार्थ खाऊन, शहानशहाच्या पंक्तीचा लाभ मिळाल्याबद्दल फुशारकी मारणाऱ्यांचं पारिपत्य करतांना, या समाजाचे शक्तिसंपन्न बाहू, लुले पडतात ! आणि स्वधर्मांतच राहून स्वधर्मीयाशींच विवाह करतांना, समाज खडबडून जागा होतो आणि घरच्या स्त्रियांचे–आपल्या सामर्थ्याच्या जोरावर नव्हे–त्यांच्या दीन स्थितीचा फायदा घेऊन, बळी घेतो. वाघाला पाहून पळून जाणाऱ्या पण घरीं बांधलेल्या शेळीवर तरवारीचे वार करणाऱ्या वीरासारखाच आमचा समाज आहे म्हणायचा !

ज्ञाति०—तुझं म्हणणं खरं मानलं, तरी या सर्व आगाऊ आपत्तींत घरच्या स्त्रियांनीं, उरले सुरले कायदेभंग करून भर टाकावी असं कुणालाहि वाटणार नाहीं. स्वतःच्या बाजूचं समर्थन करतांना, मनुष्य नेहमीं अनुकूल दाखलेच लोकांपुढें मांडीत असतो, पण त्याला नेहमीं विरुद्ध बाजू असते, हें विसरून चालणार नाहीं.

क्रांतिः—हेंच उत्तर प्रतिपक्षालाहि पटलं पाहिजे. माझ्या या विचार-सरणीनं, घोरत पडलेल्या समाजाला, अगदीं लहानसा जरी धक्का बसला तरी जागृत झालेला समाज, पुष्कळ गोष्टींचा विचार करील. मी पापी ठरलें, माझा समाजानं बळी घेतला; तरी हें बलिदान फुकट जाणार नाहीं खास.

ज्ञाति०—बळी जायचं असेल, तर स्वतःबरोबर, माझ्या घराण्याच्या अब्रूचा बळी मी तुला घेऊं देणार नाहीं. स्त्रियांच्या सहनशीलतेइतकीच, त्यांची विकारवशता अमर्याद असते म्हणायची ! क्रांती, सुदीन–विषयींचं प्रेम, तुझ्या हृदयांत खोल रुजलं असेल, तर तें, त्या हृदयासकट चितेंत घाल. प्राणत्याग करून मुक्त हो, अशी माझी तुला आज्ञा आहे.

क्रांतीः—बाबा, असं आपण बोलूं नका. मी कृतघ्न नाहीं. सुदिन विषयींचं माझं प्रेम दृढ आहे. आपली आज्ञा म्हणून या दोहोंपैकीं एक मी खास करीन.

ज्ञाति०—क्रांति, तूं काय करणार ?

क्रांतिः—बाबा आत्मघाताशिवाय मला कोणता मार्ग शिल्लक आहे ?

ज्ञाति०—नको, क्रांति स्वतःच्या वेड्या हटवादीपणानं, माझा हट्ट वाढवूं नकोस. विकाराच्या आधीन होऊन तूं केलेला आत्मघात मला पहावेल असं का तुला वाटतं ? दररोज दुसऱ्याचे गळे कापून उपजीविका करणाऱ्या मारेकऱ्याला सुद्धा, आपल्या अपत्याला इतकंसं लागलेलं सहन होत नाहीं. क्रांति, माझ्याकडे पहा ! माझ्या उतार वयांत मला तुझ्याशिवाय कोण आहे ?

क्रांतिः—बाबा, प्रेम ही इच्छेनं उत्पन्न अगर नष्ट होणारी भावना असती, तर साधकबाधक परिस्थितीचा विचार करून प्रत्येकानं तिचा विषय ठरविला असता. तारुण्याच्या प्रदेशांत पहिलं पाऊल पडतांच, या नूतन भावनांचा होणारा पहिला परिणाम, हृदयांत इतका खोल जातो कीं, प्रेम काढून टाकणं म्हणजे हृदयच बाहेर फेकणं होय ! बाबा, हृदयशून्य शरीरानं मी केलेली सेवा तुम्हाला कितपत सुखाची वाटेल ? नाहीं बाबा,

तुमच्या व माझ्या भावी सुखाच्या दृष्टीनं पहातां, किंचित्काल असह्य वाटणार. माझ्या मरणाचं दुःखच आपण सहन करणं भाग आहे. मेलेल्या मनानं, पण जित्या शरीरानं जगांत वावरून, मी तुम्हाला सुख देईन म्हणणं म्हणजे दुःखानं आनंदाची खैरात करण्यासारखंच आहे.

ज्ञातिः—क्रांति, नको असं बोलूं नको. दृढनिश्चयाला अशक्य कांहीं नाहीं. मनुष्यप्राण्याला सहन होणार नाहीं, अशी एकहि आपत्ति ईश्वर जगावर फेंकीत नाहीं. क्रांति, बाळे तुझ्या—तुझ्या सुखाकरितां—मी हें सुचवीत आहें ना ?

**क्रांतिः**—बाबा, नका; असे केंविलवाणे उद्गार काढूं नका. सुदीनवर प्रेम करण्याचा मी मूर्खपणा करीत असेन, पण जिवंत राहून, त्याच्या सहवासापासून दूर राहण्याचा माझा निश्चय व्यर्थ होईल. एक वेळ पतीच्या कल्पनेनं त्यांची मूर्ति हृदयांत पुजून, दुसऱ्याशीं विवाह करणं, सदाचारा-विरुद्ध आहे असं मला वाटतं. मनानं वरलेल्या पतीपासून दूर राहणं, पत्नीधर्माला सोडून आहे; विशेषतः तें निरर्थक आहे.

ज्ञाति०—हट्टी ! हट्टी ! हट्टी ! क्रांति, अपत्यस्नेह अगर स्वधर्म, या दोहोंपैकीं एकाचा बळी देण्यासारखी, भयंकर व बिनतोड परिस्थिति तूं माझ्यावर आणलीस ! अपत्य—स्नेहाच्या वादळांत मी माझी धर्मनौका बुडूं देणं शक्य नाहीं. माझ्या धर्माच्या आड येणारी कोणतीहि गोष्ट,—मग ती मला प्राणापेक्षांहि प्रिय असली, तरी मी तिचा त्याग—तिचा नाश केल्या-खेरीज राहणार नाहीं. तुझ्या देहाचं पतन झालेलं पहाण्याचं ईश्वर मला सामर्थ्य देवो.

**क्रांतिः**—सद्धेतुनं केलेल्या कोणत्याहि कृत्याला ईश्वराचं पाठबळ असतं ! बाबा, या रूढिद्रोही क्रांतीवर तुमचा राग राहूं द्या, पण लाडक्या कन्येवर आशिर्वादाचें कृपाछत्र असूं द्या !

ज्ञाति०—सुदीनविषयीचं तुझं अंतःकरण निर्विकार होवो !

**क्रांतिः**—तें सर्वथा अशक्य आहे.

ज्ञाति०—तुझ्या देहाचं पतन होवो. क्रांति, आजपासून चौथे दिवशीं, सरदार कज्जलेश्वरांशीं तुझा विवाह निश्चित झाला आहे. ( स्वगत—पहात ) माझी लाडकी बाळ! ईश्वरा, चार दिवस तिच्याच कल्याणासाठीं कठोरपणानं वागण्याचं या तुझ्या दासाला धैर्य दे ! ( उसासा टाकून जातो. )

**सुंदरः**—क्रांतीताई, तूं काय करायचं ठरविलंस ग ?

**लज्जाः**—तूं तरुण आहेस !

**क्रांतिः**—हं ! म्हणूनच मला म्हातारे विचार पटले नसतील.

**दयाः**—पुढं तूं काय करणार ?

**क्रांतिः**—क्रांति ! आत्मत्याग ! मी आत्मत्याग करणार !

**सुंदरः**—नकोग असं बोलूं !

**क्रांतिः**—बरं आहे. न बोलतां करीन मी !

**दयाः**—तुला आपला विचार नाहीं कां बदलतां येणार ?

**क्रांतिः**—दये, आयुष्यांतला आवश्यक व्यवहार म्हणून तूं लग्न केलंस वाटतं ? अंतःकरणांतला प्रेमप्रवाह परत फिरविणं हें गंगेला परतवून हिमालयावर नेऊन सोडण्याइतकंच अशक्य आहे.

**दयाः**—क्रांति, असं नकोग बोलूं ! माझ्याच्यानं नाहीं हें ऐकवत ! तुझी आई असती तर—

**क्रांतिः**—दये, माझ्यावर दया कर आणि भलभलत्या आठवणी काढूं नकोस. आई ! क्रांतीची आई क्रांतीला जगाच्या तोंडावर टाकून, पवित्र ठिकाणीं जाऊन बसली. आई, खरंच मी चुकतें कां ग ? पण इतक्या लांबून नाहीं तुला ऐकूं यायचं, तिथं आल्यावरच मला सांग मी चुकतें का तें ? आई, माझी आई !

## पद ४

**॥ आई झणिं धांव । मनि आज भयभाव ॥ ही दीन भ्रांत-मति बालिका ॥ ध्रु० ॥ बंधा न साहे ॥ मन धांव घे । आतां न नेशि तईं बालिका ॥ कां ? ॥ १ ॥**

( समोरील बाजूस एक तरुणी, तान्ह्या मुलासह येऊन बसतां बसतां कोलमडून पडते. साऱ्याजणीं धांवतात. )

**क्रांतिः**—( ओळखून. ) अगबाई, ही तर प्रभा ? प्रभे ! बोलना ग ! जा ग लज्जे, जरा पाणी आण. बिचारीला ग्लानी आली. घे त्या बाळाला. ( ती कां कूं करते. ) घे कीं ! तेवढ्यानहि भ्रष्टाकार होतो ? दया, जरा पाणी लाव हिच्या डोळयांना !

**प्रभाः**—क्रांति ! क्रांति ! बरं झालं, मी तुझ्या दारांत येऊन पडलें. क्रांति !

**क्रांतिः**—प्रभा, अशी गडबडूं नकोस. घे हें पाणी ! पी घोटभर ! म्हणजे अंमळ तुला बरं वाटेल.

**प्रभाः**—क्रांति, मला आतां कसचं बरं वाटणार ? आज वर्षभर मरण्याची बलवत्तर इच्छा असूनहि, मला मरतां आलं नाहीं. त्या चांडाळानं मला मरायला सुद्धां संधि दिली नाहीं. आणि आतां पावला गणिक मृत्यु दिसत असतां, मला या बाळाकरतां जगावंसं वाटूं लागलं आहे. क्रांति, संभाळशील का माझ्या बाळाला ? माझा जीव अडखळतोय ग ! क्षणोक्षणीं माझ्याकडे फेकले जाणारे यमपाश, माझ्या बाळाच्या आड तोंड लपवून मी चुकविले. पण आतां मी वांचत नाहीं.

**क्रांतिः**—प्रभे, कुठें होतीस इतके दिवस ? आणि हें तुझंच का बाळ ! घाबरूं नकोस अशी ! गप्. रडूं नकोस.

**प्रभाः**—क्रांति, रडूं नको तर काय करूं ? इतके दिवस मी नरकांत होतें, आणि आज, दुसऱ्या नरकाची तयारी करायला त्यानं मला सोडली. गेल्या सहा तासांत या बाळाला घेऊन वणवणतांना देवालयांतून येणाऱ्या कर्मठ पुजाऱ्यापासून तों वेश्येच्या घरांतून पान चघळीत बाहेर पडणाऱ्या प्रत्येक पुण्यात्म्यानं, मला लाखोली मोजली. दमूनभागून विश्वपालकाच्या पायरीवर टेकलें, तर मला, " धर्म " हीं अक्षरं लिहायलाहि न येणाऱ्या धर्ममार्तंडांनीं, पोरांकरवीं दगड मारवून हांकून दिलं. क्रांति, इच्छाशक्तीनं

मरण आणण्याचं सामर्थ्य माझ्यांत असतं, तर मी केव्हांच मेलें असतें. पण काय करूं ! माझा बाळ, त्याचं कसं होईल ?

क्रांतिः—प्रभा, तूं खरी हकीकत सांगून, तुझ्या सर्वस्वाचा बळी घेणाऱ्या त्या चांडाळाचं नांव समाजाच्या तोंडावर कां फेकित नाहींस ?

प्रभाः—क्रांति, तूं वेडी आहेस ! मी कितीहि ओरडलें तरी पण लक्षांत कोण घेतो ? ज्यानं त्यानं माझीच लाज काढली ! आपलं पाप, निष्कारण त्या सत्पुरुषाच्या माथीं मारणारी कुलटा, म्हणून माझा धिःकार केला. क्रांति, समाज पुरुषांच्या हातीं आहे. आमच्यासारख्या गरीब गाईंचा गळा कापूनहि, संपत्तीच्या आणि अरेरावीच्या जोरावर, त्यांना प्रतिष्ठितपणानं नामानिराळं राहतां येतं. पापाचे प्रवर्तक सहीसलामत सुटून, त्यांनींच केलेल्या आमच्या अधःपाताकडे पाहून, त्यांना कींव येण्याऐवजीं, कर्तबगारीचा आनंद वाटतो. क्रांति, कज्जलेश्वराच्या—आपल्या मांगा करवीं मातेच्या कृपाछत्राखालून मला फरफटत नेणाऱ्या त्या नरपशूच्या—नांवानं, मी मरेपर्यंत रडलें, तरी कुणी ऐकलं नाहीं आणि ऐकणारहि नाहीं. कारण तो सरदार आहे, उच्चकुलोत्पन्न आहे !

क्रांतिः—कज्जलेश्वराचं कृत्य ना हें ? अबलांच्या गांजणुकीसाठीं कंबर बांधून उभा ठाकलेल्या समाज पुरुषा, ऐक; कान लांब करून ऐक ! भस्माचे पट्टे रेखून लावून, स्त्रियांच्या काल्पनिक वांकड्या पावलाबद्दल, गल्लीच्या पारावर न्यायकचेरी भरविणाऱ्या धर्ममार्तंडांनों, तुमच्याच गोटांतील कित्येक सज्जनांचा हा परोपकार पहा.

प्रभाः—क्रांति, माझ्या बाळाला संभाळ ! येतें मी ! क्रांति—( मरते. )

क्रांतिः—प्रभा ! गेली. दये, लज्जे पाहिलंस ? दुःखानं, जाचानं, स्नेहशून्यतेच्या वाळवंटांत, या अर्भकासाठीं आजवर वणवणणारा प्रभेचा जीव, तडफडून गेला. शेवटीं पापी कोण ? प्रभा ! हें बालक तिच्या पापाचा पुरावा.

ज्ञाति०—क्रांति, ऊठ ! त्या प्रेताला शिवूं नकोस. माझ्या दारांत त्या कुलटेचं प्रेत पाहिलं, तर समाज उद्यां मला बहिष्कृत करील.

**क्रांतिः**—बाबा, जिवंतपणीं तिचा झालेला छळ अपुरा वाटला, ह्मणून तिच्या प्रेताची विटंबना करतां काय ? समाजाच्या काल्पनिक भीतीनं साध्या माणुसकीला बाबा, आपण लाथाडायचं ?

**ज्ञाति०**—आणि हें काय ?

**क्रांतिः**—हें काय ? ही माझ्या भावी पतिराजांनीं आपल्या भावी पत्नीला पाठविलेली प्रथम भेट ! कज्जलेश्वरांनीं केलेली स्त्रीजातीची विटंबना ! आपले नियोजित जामात कज्जलेश्वर यांच्या प्रभेवरील जुलमाचं अपत्य ! बाबा, स्त्रियांना पापाचं प्रायश्चित्त देण्याकरितां, त्यांची रस्तोरस्तीं धिंड काढण्याकरितां; त्यांना फिदी फिदी हंसण्याकरितां टपून राहिलेल्या गिधाडांनां या कज्जलेश्वराचं कुजकं काळीज कसं दिसणार ? आणि दिसलं तरी प्रत्यक्ष मोंगल सम्राटाशीं स्नेह असलेल्या या कज्जलेश्वराचं पारिपत्य करण्याचं धाडस कोण करणार ? प्रभे ! प्रभे ! गेलीस ! सुटलीस ! तिथं तरी तुला खडे मारायला पोरं येणार नाहींत, निंदा करायला गांवकुटाळ धजणार नाहींत; भ्रष्ट करायला कज्जलेश्वर असणार नाहींत. परमेश्वरा, दुःखातिरेकानं रडत ओरडत तुझ्या पायाशीं धांव घेणाऱ्या प्रभेला तुझ्याच प्रभेंत मिसळण्याची कृपा कर. ( रडत प्रेतावर पडते. पडदा पडतो. )

---

## प्रवेश २ रा.

**स्थलः**—कज्जलेश्वराच्या धर्मपुरी वाड्यापुढील रस्ता.

**पात्रेंः**—( बद्रुद्दीन, चंदन, सुंदर. )

**बद्रुद्दीनः**—( गजल गाऊन. ) बस्स यार ! गाना तो गजल गाना ! खाना तो गोष खाना ! पीना तो शराब पीना ! आर रखना तो—( समोरून सुंदर मुल घेऊन येते तिला पाहून ) आंखे बंद रखना ! तोबा, क्या औरत है !

**सुंदरः**—गेली बिचारी सुटली एकदांची. प्रभाताईच्या प्रेताला सुद्धां न्यायला कुणी तयार होईना! कसले मेले दगडाच्या काळजाचे आहेत? धन्य त्या क्रांतीची! गडी माणसांच्या मदतीनं तिनं बिचारीला मूठ माती दिली. कसं छान आहे बाळ! मोठ्या आवडीनं मी याला मागून घेतलं. आतां मी तुझी आई हं? क्रांतीताई म्हणत होती कीं, लोक मला सुद्धां नांव ठेवतील? ठेवूं देत मेल्यांना! घरच्या बायकांना नांव ठेवण्याशिवाय यांच्या हातून दुसरं काय व्हायचयूं!

**बद्रु:०**—खुदा! क्या कथामतके दिनतक मै ऐसाहि आखें मिचके रहूं? ये हे हे, क्या रंग है.!

**सुंदरः**—हा कोण घोटाळतोय इथें? मोंगली राज्यांत मुसलमानांना काय दुष्काळ! पण हे राज्यांतले काळ घरांत घुसायचे.

**बद्रु:०**—ये साला चंयाँ कहां गुजर गया? ऐ खुबसुरत—

**सुंदरः**—कायरे मेल्या, कुणाला खुबसुरत म्हणतोस? मेल्यांना दुसऱ्याच्या बायकांशीं एकदम लगट करायला लाज कशी वाटत नाहीं कोण जाणे! कोणरे तूं.

**बद्रु:०**—अम्माजान—

**सुंदरः**—जळ्ळं तुझं तोंड! अरे अम्माजान मी नव्हे? मेल्या मला नायकीण समजलास होय! जरा टापटिपीनं राहणारी नीटस बाई दिसली कीं यांना नायकिणीच वाटतात साऱ्याजणीं! अरे माझं नांव आहे सुंदर!

**बद्रु:०**—सुंदर? इसका नाम रेखनावाला अंधा था या गधा था? ओ सुंदर बाई, इधर वो सरदार कज्जलेश्वर का मकान कहां है?

**सुंदरः**—आग लागली त्याच्या मकाणाला, त्याला आणि तुला. त्या मांगाचं नांव काढूं नकोस माझ्यापुढं. तूं कुठला बाबा? आणि त्याच्याकडे तुझं काय काम?

**बद्रु०**—बेटा बद्रुद्दीन, तूं बच गया! बिचारी बाबा करके पुकारती है.

सुंदरः—काय हो, कुठून आलां तुम्ही.

बद्रु०—आम्ही दिल्लीसे आला.

सुंदरः—हं, तर मग दिल्लीचे सोदे म्हणतात ते तुम्हीच वाटतं? बरो-बरच आहे? असल्या संभावित मांगाकडे सोदेच यायचे (मुलाकडे पाहून) झोपलं बिचारं बाळ! तुमचं नांव?

बद्रु०—आमचा नाम बद्रुद्दीन!

सुंदरः—काय बद्लुन देईन? कां? खरं नांव सांगायला लाज वाटते होय?

बद्रु०— क्या बला है! ओ सुंदरबाई, बद्रुद्दीन! आमचा नामहि बद्रुद्दीन.

सुंदरः—बद्रुद्दीन? कसलं मेलं उंटासारखं वेडंवाकडं नांव हें. पण मला त्याच्याशीं काय करायचं आहे! माझ्या बाळाचं नांव कसं छान ठेवीन मी!

बद्रु०—सुंदरबाई, तुमचा शादी झाला क्या? क्या आदमी हूं मै? शादीके पहिले बच्चा कैसा होगा?

सुंदरः—नाहीं. पण ठरलं आहे माझं लग्न!

बद्रु०—फिर ये बच्चा किस्का?

सुंदरः—किस्का म्हणजे माझा!

बद्रु०—तोबा! तोबा! क्या किस्मत्वाला आदमी होगा. शादीके रोज बिचारा शोहर और बाप दोनो एकदम बन जायगा! खुदा जाने कौन उल्लूका पठ्ठा इसपे मर रहा है? सुंदरबाई, उस्का नाम?

सुंदरः—अहो वेडे आहांत तुम्हीं. त्यांचं नांव मी कशी सांगूं तुम्हाला?

बद्रु०—क्यौं? त्याचा नामबी तुमाला मालुम नाहीं?

सुंदरः—अहो मला लाज वाटते. मी कशी नांव घेऊं? हा बाळ सांगील तुम्हाला.

बद्रु०—चाई, ये बच्चा किस्का?

**सुंदरः**—एकदां सांगितलं नां माझा म्हणून ? मग सतरादां काय विचारतां ? तुम्हाला खोटं वाटतं होय ? पण जातें मी. ते उजव्या हाताला दिसतं तेंच त्या मांगाचं घर. पण काय हो, दिल्लीला तुम्हाला आमचे हे दिसले होते का ? तुमच्या ओळखीचे असतील ते ?

**बद्रु०**—बाई, हे कौन ? नामबिगर मै क्या सांगूं तुमाला ?

**सुंदरः**—जाऊं द्या ! तुम्हीं त्यांचं नांवच विचारीत सुटतां. पण मी कसं नांव घेऊं बाई ? नकोच तें. जातें मी. ते भेटले तुम्हांला तर मी भेटलें होतें म्हणून सांगा हं ? आणि लवकर या म्हणावं ! ( मुलास ) चल ! चल ! तुला झोंपवून धुणीं धुवायला गेलं पाहिजे. आई वाट पहात असेल ! चल. माझं सोनं, माझं छकुलं; माझा बरफीचा तुकडा. ( मुका घेत जाते )

**बद्रु०**—क्या औरत है ! मगर भोली भाली है बिचारी. बच्चा किस्का ! हे कौन ? खुदाजाने क्या अंधेर है ! चंद्या, अरे वो साला चंद्या ! क्या आदमी मिला है ? कोई गांजा पिके ढिले बनते है और ये साला हमाषाहि ऐसा. चंद्या ! ( चंदन ओझ्यानं लादलेला असा येतो. ) चंद्या, चलो जलदी करो.

**चंदनः**—खांसाहेब, ज्या त्या कामांत तुमची घाई. या दोन पायांनीं यापेक्षां किती जलदी करायची ? शिवाय सामानाचा ताबूत आहेना पाठीवर !

**बद्रु०**—आपनेको बहोत काम है !

**चंदनः**—हो, बहोत काम नसून कसं चालेल ? नोकरानां जनावराप्रमाणं राबवलं नाहीं, झोंडपलं नाहीं तर तो मालक कसला ? आतां गवतावर ठेऊन पेंडीचा खडा तोंडापुढं धरीत नाहीं ही मेहेरबानी.

**बद्रु०**—ये देखो चंदन—

**चंदनः**—देवा, चंदन नांव ठेवलं म्हणून कां मला असं झिजायला लावतोस ? पण मुसलमानाच्या हातीं हें खोड देण्याऐवजीं, एखाद्या देव-

ळांतल्या साहणेवर मला ठेवतांस तर नसतों का तुझ्या नशिबाला चिक-टून बसलों ?

बद्रु०—चंद्या, साला मार खानेका इरादा है अब !

चंदनः—चंद्या, चल बाबा, नोकरीची अडीच मणाची बेडी पायांत असली तरी डोळ्यासमोरील भाकरी आणि मागून येणारा माराचा फराळ ध्यानांत आणून चालायला लाग. नाहीं तर सावित्रीला पूर्वपुण्याईनं पुसट पुसट दिसलेला यम तुला स्पष्ट दिसायला लागायचा.

बद्रु०—अबे ओ गद्धे की अवलाद ?

चंदनः—खरंच, याच्या मालकीकडे पाठ फिरवून, चार लाथा झाडून याला खात्री पटवून दिली असती, पण मना इतकं शरीर थोडेंच चपळ असतं ?

बद्रु०—( पाठींत मारून ) ऐसा नहीं तूं सुननेवाला. तेरी आदत मुझे मालुम है.

चंदनः—आई ! आई ! मार खाऊन खाऊन पाठीला इतका घट्टपणा आलाय कीं पाठीवर गफलतीनं वावरणारा विंचू सुद्धां नांगी न मारतां परत जातो.

बद्रु०—उठाव ! उठाव ! पांव ! क्या सुनता है या नहीं (कान धरतो.)

चंदनः—साहेब, कान सोडा. कान ओढून ओढून लांब केलेत आणि पुन्हां या ओढाताणींत कान उपटून निघाले तर ऐकायची पंचाईत होऊन अत्त-राचा फाया मला दाढेंत नाहीं तर नाकांत ठेवावा लागेल.

बद्रु०—मुफ्तमें मिला है, अश्राफ है, मगर साला दो घंटेमें पचास पैर चलेगा. खुदा करे और ऐसा नोकर आगे ना मिले.

चंदनः—परमेश्वर करो आणि मलाहि पुन्हां नोकरी न करावी लागो. धन्याकरितां जीव देणाऱ्या नोकरांचे मालक लुले पांगळे असले पाहिजेत किंवा मालकाचा त्रास चुकविण्यासाठीं हे नोकर एकदम जीव देत असले पाहिजेत.

बद्रु०—(चाबुक मारून.) चंद्या, सर फुटनेका वख्त आया तेरे बारेमे !

चंदनः—वक्त-नेहमीं येतोय, पण फुटतं का तें ? शिवाय फुटायला डोकं असलं पाहिजे. पागोटं अडकविण्याच्या सोच्याला जर डोकं म्हणायचं, तर पगडबंदाच्या दुकानांतल्या ठोकळ्यांना काय म्हणायचं ?

बद्रुः—चंद्या, तूं मरता क्यौं नहीं रे !

चंदनः—काय करूं धनीसाहेब, मालकाआधीं नोकरांना मरायचा परवानाच मिळत नाहीं. शिवाय मी मरून आपल्याला काय लाभ होणार ? प्रवासांत आपणच—

बद्रु०—चुप् ! जबान रोक. नहीं तो जहन्नममे पोंचा दूंगा !

चंदनः—कुठें न्याल तिकडे यायचे आह्मीं. आपण गेलांत, तर मलाहि आलंच पाहिजे. होय नाहीं ह्मणून थोडंच भागतं ?

बद्रु०—चंद्या, तूं बहोत पाजी आदमी है !

चंदनः—आपल्यासारख्या थोरामोठ्यांचा कित्ता गिरवतों आहें. काय होईल तें खरं.

बद्रु०—क्या कहा ? सुन लिया तो तूं और बढने लगा ?

चंदनः—जग हें असंच आहे धनीसाहेब. मी जरा मार खाऊं लागलों तों तुह्मी वाढवलंतच्च कीं प्रमाण !

बद्रु०—है निमकहलाल, मगर मूं बहोत खराब !

चंदन०—असूं द्या की ! अजून धन्यानं नोकराच्या तोंडाला तोंड देण्याची कांहीं पाळी आली नाहीं. असूं द्या की खराब असलं तर !

बद्रुः०—मूं बंद करता है या नहीं ? क्या बकता है ? कुत्ता कहिका. ( चाबुक मारतो. )

चंदनः—खरं आहे मायबाप. अर्जुनाच्या निशाणासारख्या अडचणीच्या जागीं बसणाऱ्या बजरंगा, माझा पाठीराखा आतां तूंच ! चला हुजूर. ( जाऊं लागतात तोंच सुंदर येते. )

बद्रुः०—या अल्ला ! और ये खुबसुरतबला आई.




चंदन—ही तर ती ! [पान २३].

**सुंदरः**—अगबाई हे तर ते ! ( लाजते. )

**चंदनः**—ही तर ती !

**बद्धुः**—ये हे हे ! क्या शरमती है. अंधेरेमे बिल्ली के चमकती हुई आंख जैसी आंखे चमकती है. मूं पे तो और नया रंग चढता चला ! जीता रहो रे मेरे चंद्या ! क्या औरत मिली ! शादीके अव्वल बच्चा लाई !

**सुंदरः**—केव्हां येणं झालं ?

**चंदनः**—अग झालंय कुठे ? अजून येतोंच आहें मी.

**सुंदरः**—चला घरीं ! आईला नाहीं कां भेटत ?

**चंदनः**—हें पहा, म्हातारीला भेटायच्या निमित्तानं पोरीकडे येणाऱ्या पैकीं मी नाहीं. तुझींच गांठ घ्यायला यायचा मी ! मी थोड्याच वेळांत येतों. आमच्या या धनीसाहेबांना सरदार कज्जलेश्वरांच्या वाड्यांत पोंचवून मग येतो तुझ्या दर्शनाला.

**सुंदरः**—नका जाऊं त्या मांगाकडे ! आणि हें का तुमचे धनी ? चांगलं ! त्यामांगाच्या नीचपणाचा मासला दाखवायचा आहे. घरीं या हं ! आपलं बाळ तुम्हाला दाखवायचं आहे !

**चंदनः**—आपलं बाळ ? देवा, इथे आणि काय खेळ करून ठेवलायस सुंदर—

**सुंदरः**—इश्श ! नांव काय घ्यायचं तें ! कुणी ऐकलं तर ?

**चंदनः**—ऐकलं तर तुझ्या नांवाबद्दल त्याला आश्चर्य वाटेल. पण ही बाळाची भानगड काय आहे ?

**सुंदरः**—भानगड कसली ? घरीं बाळ आहे माझं !

**चंदनः**—तुझं बाळ ? हं समजलों. कुत्र्याचं पिल्लू बिल्लु पाळलं आहेस वाटतं ?

**सुंदरः**—चला उगीच भलभलतं बोलत जाऊं नका ! कुत्र्याचं पिल्लु नाहीं ! तें कसं छान आहे बाळ ! यांनीं पाहिलं आहे. नाहीं हो ?

वड्ड०—हां चंद्या, ठीक है तेरा बेटा !

सुंदरः—चंदनराव म्हटलंत तर जीभ झडेल का ? अगबाई, काय पण बोललें मी हें ! ऐकलंत का ? विचारांत कसल्या पडलांत ?

चंदनः—नाहीं, कुंतीनंतर सूर्यमंत्र द्यायला, हा कोण दुसरा दुर्वास तुला भेटला याचा विचार करतों आहें मी !

सुंदरः—कसला मंत्र घेऊन बसलांत ? सूर्यमंत्र कसला ?

चंदनः—नाहीं का ? तरमग कानमंत्र असेल ! एकंदरींत, तुझ्यावर सुद्धां उल्लू होणारे हरीचे लाल जगांत आहेत म्हणतेस !

सुंदरः—असं काय स्वतःलाच नांवं ठेऊन घ्यायचीं बरं ! यांत मी वाईट तें काय केलं ? मूल असणं वाईट का ?

चंदनः—अग, तुला लग्ना आधीं मुलाची हौस होती, तर मलाच दत्तक घ्यायचं ! पण या पापाचा बाप मला करून तूं काय मिळविणार !

सुंदरः—या पापाचे बाप तुम्हीं नाहीं ! तो मांग ! तो चांडाळ कज्जलेश्वर !

चंदनः—म्हणजे ? कज्जलेश्वराचा तुझ्यावर डोळा ? आतां डोळा कसला म्हणा ! डोळा असता तर तो असा उघड्या डोळ्यांनीं या काजळी खड्ड्यांत कां पडता !

सुंदरः—माझ्यावर डोळा ! डोळे फाडीन मेल्याचे. मी म्हणजे भित्री प्रभाताई नव्हे ! दांत पाडून घशांत घालीन.

चंदनः—म्हणजे ? काय आहे काय हें ? सुंदर, कुणाचं बाळ ? आणि कज्जलेश्वरांवर तुझा इतका राग कां !

सुंदरः—काय सांगूं तुम्हाला ? प्रभाताईचा त्या मांगानं जीव घेतला हो. बिचारी याच्या नांवानं रडून रडून मेली. याच मांगानं तिचं वाटोळं केलं.

चंदनः—म्हणजे तें मुल—?

सुंदरः—प्रभाताईचं. पण आतां तें माझं झालं आहे. मी त्याला सोडायची नाहीं.

चंदनः—सुंदर, काळ्या ढगांत लपलेल्या विजेप्रमाणं, तुझं अंतःकरण आहे. तरुणपणीं माझ्या चटोर डोळ्यांना, तुझं बाह्यांग सुंदर वाटलं नाहीं, तरी तुझं अंतःकरण विजेप्रमाणं तेजस्वी आहे. तुझं दयाळू अंतःकरण आणि आपलं बाळ पहायला मी आलोंच पहा ! चला धनीसाहेब !

बद्रु०—चंद्या ! सच बात है. तेरी किस्मत् खुल गई और ऐसी जोरू मिलगई !

चंदनः—धनीसाहेब, माझी बायको मला बरी दिसली, पण तुम्हाला बरी दिसणं मला बरं दिसेलच असं नाहीं.

बद्रु०—चलो. ( चंद्या तिच्याकडे पहात हंसत बद्रुद्दीनसह जातो. )

सुंदरः—आले एकदाचे ! आतां त्यानां मी कध्धी कध्धी जाऊं द्यायची नाहीं. चला. सपासपा एवढं धुणं बडवून मला घरीं गेलं पाहिजे. माझ्या बाळाला मी अगदींच विसरलें ! मला चार गाणीं शिकलीं पाहिजेत आतां त्याच्यासाठीं ! ( गडबडीनें जाते. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थलः—( कज्जलेश्वराचा वाडा. )

पात्रें:—( कज्जलेश्वर, बद्रुद्दीन, रूढीराम व चंदन. कज्जलेश्वर, तोंडांत हुक्क्याची नळी धरून बोलतो आहे. )

कज्जले०—तुम्हीं फारच शीघ्रकोपी आहांत रूढीरामजी ! पण तुम्ही हा विचारच काढून टाका मनांतून ! निराश अंतःकरणाच्या अंतकालच्या धडपडींत, दोन चार शब्दांच्या लाथा लागल्या, तरी त्याचा इतका विषाद मानूं नये.

रूढीरामः—नाईलाज आहे सरदारसाहेब. पण तिचे ते उद्दाम शब्द, तिचा तो ताठा ! हरकत नाहीं. दाखवीन या रूढीरामचा सपाटा ! तिला

वाटलं, माझ्या हातून काय होणार? बेपत्ता सुदिनच्यां कल्पित जोरावर ती असेल. पण जिथं राणाप्रतापाला अंग टाकायला जागा नाहीं, तिथं त्याच्या या चोरट्या भक्तांची काय कथा! सरदारसाहेब, नाहीं म्हटलंतर, प्रतापाच्या मदतगारांना पकडून दिल्याचं बक्षिस घेऊन, कुणीतरी आतांपर्यंत यायला हवं होतं? शिवाय त्या सुदिनचीहि वाट लावायची आहे ना?

कज्जले०—रूढीराम, तुम्हीं फारच उतावळे आहांत. सर्व गोष्टी सावधपणानं व योग्यवेळीं केल्या पाहिजेत. शिवाय क्रांतीला, रहिमतखांच्या लोकांच्या स्वाधीन करण्याची तुमची सल्ला, मला मुळींच पसंत नाहीं. अहो, माझं तिच्याशीं लग्न ठरलं आहे.

रूढी०—पण तें तिला संमत् आहे का! तें होण्याची शक्यता आहे का? तुम्हीं, क्रांती म्हणजे प्रभा समजलांत होय? प्रभेनं तुमच्या सर्व पापाचा पाढा वाचून तिच्याच दारांत जीव सोडला! शिवाय तुमच्या सर्व सत्य दुष्कृत्यांबरोबर, इतर अनेक अकल्पित पापं सुद्धां गांवांतील लोक तुमच्या माथीं मारताहेत. क्रांती जीव देईल, पण तुमच्याशीं लग्न करणं शक्य नाहीं. आणि स्वतःशीं पूर्णपणें विरुद्ध असलेली, तुमच्या विषयींच्या द्वेषानं चिडलेली, आणि प्रभेच्या सुडासाठीं टपलेली ती वाघीण तुम्हीं घरांत आणणार? अहो, ही आग घरादाराला लावून, तुम्ही काय राख फांसून फिरणार आहांत? शिवाय प्रत्यक्ष रहिमतखानानं, क्रांतीला पाहिलं आहे. प्रसंगीं तुमच्या विवाहा नंतरहि, रहिमतखां तिला हस्तगत केल्याखेरीज राहणार नाहीं.

कज्जले०—मोठ्या अडचणींत अडकवलंत रूढीराम तुम्हीं! रहिमत खांशीं विरुद्ध वागायचं, म्हणजे सर्वस्वी घात करून घेणं होय! पण असं नको होतं व्हावयाला? स्वतःच्या हातांनीं, क्रांतीला रहिमतखांच्या गोषांत लोटायचं, माझ्या धाडशी मनाला सुद्धां कससंच वाटतं.

रूढी०—तिनं दिलेलीं विशेषणं आठवलीं, म्हणजे कससंच वाटणं बंद होऊन, संतापानं मस्तक फिरून जाईल. "घिसाडघाईंत घडलेले चेहरे"

"बाहिरंगाप्रमाणं अंतरंग अंधकार पूर्ण आहे"! बरं आहे! या अंतःकरणांतील अंधकार, तुझ्या जन्मावर न पसरीन, तर माझं नांव रूढीराम नव्हे!

**कज्जले०**—पण लोक काय म्हणतील?

**रूढी०**—लोक काय म्हणतात? आपण स्वतः थोडंच करणार आहोंत हें? रहिमतखांच्या लोकांनाच परस्पर बोलवा म्हणजे झालं.

**नोकरः**—( प्रवेशून ) बाहेर दिल्लीहून कुणी खां साहेब आले आहेत!

**कज्जले०**—दिल्लीहून? जा! त्यांना आंत घेऊन ये. आणि थोडं शरबत बनवून आण. ( नोकर जातो. ) बहुधा हशम अगर बद्रुद्दीन असावा, पण आलाच हा. ( उठून ) आईये. आईये बद्रुद्दीनसाहेब! तमाम खैरियत?

**बद्रु०**—शुक्र है खुदाका! आप ठीक हो? आप रूढीरामजी?

**रूढी०**—ठीक हूं! आपकी मेहेरबानी. हा कोण? चंदन! कसं कायरे? ठीक आहे ना?

**बद्रु०**—दो घंटेसे जबाब मिलेगा! बहोत गैदी आदमी!

**कज्जले०**—बद्रुद्दीन साहेब, जाऊं द्या या चंदनला. गावांत भेटून येईल आपल्या मंडळींनां! कां? कुणी आहेतना चंदन तुझी माणसं इथं?

**चंदनः**—जातांनां होतीं, पण आपल्या सारख्यांच्या कृपेनं अद्याप तशींच असलीं म्हणजे ठीक!

**रूढी०**—काय चंदन, मजा मारली असशील दिल्लींत?

**चंदनः**—झक् मारलेली आठवते.

**बद्रु०**—हमारा वो सामान उधर ठीकठाक रखके जाना. मगर जल्द वापीस आना.

**चंदनः**—होय धनीसाहेब. ( सामान उतरूं लागतो. )

**रूढी०**—अगदीं वेळेवर आलांत खांसाहेब. सरदारसाहेब तुमच्याकडे आज इसम पाठविणार होते.

**बद्रु०**—आमी बहोत दिनसे निगाला. मगर ये ऐदीनाथांबरोबर! इसलिये जरा देर झाला.

**कज्जले०**—नाहीं, कांहीं बिघडलं नाहीं. बरं खांसाहेबांचा काय हुकूम?

**रूढी०**—चंदनला तर जाऊं द्या!

**बद्रु०**—वो रहेगा, तो कुछ फिकीर नाहीं. वो हमेषा अपने धुंदीमें मरता है. देखो, वो ज्ञातीभैरवकी लडकी क्रांती, उसके लिए मुझे उन्होंने भेजा है. शहाजादा सलीमके साथ, वो स्वारीपे जानेके पहिले, मुझे लडकी को लेके फौजमे दाखल होना जरूर है.

**चंदनः**—( स्वगत ) हं! तरी म्हटलं, हा मोंगली बेदाणा वाटेंत क्रांतीताईची चौकशी कां करीत होता! बरं आहे धनीसाहेब, धुंदीतून आपण मला जागं करायची कृपा करताहांत!

**कज्जले०**—खांसाहेब, काम जोखमीचं आहे. क्रांती इथें फारच लोकप्रिय आहे. आम्हीं उघडपणें या कृत्याला मदत केली, तर लोक दिवसाढवळ्या आमच्या घराला आगी लावतील.

**रूढी०**—न केली तर खांसाहेब खफा होतील.

**बद्रु०**—कुछ भी हो, ये काम होना जरूर है.

**कज्जले०**—तें खरं, पण–हें पहा चंदन, तूं जा जरा बाहेर! वाटल्यास तूं तुझ्या सुंदरला भेटून ये. आणि हें पहा, तोंड बंद ठेवायचं हं! नाहींतर आम्हाला तोंड दाखवायला जागा राहायची नाहीं.

**चदनः**—( स्वगत ) जागा असली, तरी तोंड आहे का दाखवायला! ( उघड ) सरदार साहेब, बंद ठेवायला आणि उघडायला, नोकरानां तोंडं असतात कुठे!

**रूढी०**—चंदन तसा गरीब आहे. ( उठून ) हें पहा चंदन, तुझी ती सुंदर आहे ना! तिनं त्या भ्रष्ट प्रभेचं पोर घेतलं आहे आपल्याकडे. बघ बुवा, तुला आपलं सांगून ठेवतों. ( वहीचीं पानें पडतात. )

**चंदनः**—रूढीरामजी, पानं गळताहेत वहीचीं ! पिकलीत वाटतं !' कां भारीभारी रकमांच्या ओझ्यानें जड झालीं आहेत ?

**रूढी०**—तें राहूंदे रे ! तिला सांग, बरं नव्हे हें ! अरे कुणाचं पाप, कुणी वाहावं ?

**चंदनः**—पहा कीं, लोक तरी काय हलकट हो ? पाप करून नामानिराळे होतात, आणि तें फेडायचं येतं आमच्या नशिबीं ! कायहो, यांची चांगली खेटरानं पूजा करणारा कोणीच निघत नाहीं कसा ?

**कज्जले०**—जाऊंदे रे, आपण कशाला वाईट बोलावं. ज्याचं पाप तो भरील !

**चंदनः**—नाहीं, सरदारसाहेब, आपणासारख्या वजनदार लोकांनीं तरी, अशांना सरळ सोडणं बरं नाहीं. अहो, हे उद्यां निराश्रित मुलींना सोडून, तुमच्या आमच्या आया बहिणींकडे वळायचे ! हो ! एकदां लाज सोडली, ह्मणजे यांची शेण खायची मजल कुठवर जाईल कुणी सांगावं !

**कज्जले०**—जाऊं देरे, तूं कां उगीच शिव्या देतोस ?

**रूढी०**—बरं आहे चंदन, जा तूं आतां.

**चंदनः**—( स्वगत ) एकूण याच्या व्यापारांत हेंही कलम दडलं आहे तर ? या स्वजनद्रोही नराधमापेक्षां हा साधा सीधा दाढीदिक्षीतच बरा म्हणायचा ! ( उघड. ) बरं आहे. येतों धनीसाहेब.

**बड्डु०**—जाना, मगर जल्द वापस आना, नहीं तो बैठेगा वो बच्चेवालीके साथ ! ( चंदन जातो. )

**कज्जले०**—ठीक आहे, बोला आतां खांसाहेब.

**बड्डु०**—मैं तो बोल चुका हूं. एक दो दिनमें, क्रांती मेरे हात आना चाहिये.

**कज्जले०**—खांसाहेब माझे लोक असलीं कामं करण्यांत जरी तरबेज असले, तरी क्रांतीच्या बाबतींत कदाचित घोटाळा उडण्याचा संभव आहे. तुम्ही थोडे लोक आणतां तर तें तितकंच बरं झालं असतं !

बद्रु:—कुछ पर्वा नहीं. कोई तरकीबसे उस्को ऐक बाजू बुलालो. आगेका, मै और रूढीरामजी देखेंगे !

रूढी०—मी होय ? नाहीं, कांहीं हरकत नाहीं. तुमच्या सारख्याचा पाठिंबा असल्यावर, मी कुणालाच भीक घालीत नाहीं. पण शक्य तोंवर मला पुढं यायचा प्रसंग नका आणूं ! बरं ! पण त्या सुदिनचं काय ? अगोदरच तो आमच्यावर जळतो आहे.

कज्जले०—त्याची काळजी नको. खासाहेबांचा हुकूम म्हणून, त्याला माझ्याच लोकांकडून कैद करवितों आणि देतों लावून छावणीकडे.

रूढी०—पण तो हातीं सांपडला पाहिजे ना ?

कज्जले०—जातो कुठें ? चार दिवस पाळत ठेवली, कीं सांपडेल तो ? तो सरळ स्वाधीन व्हायचा नाहीं, पण दंगलींत मारला गेला तरी बिघडलं कुठे ?

रूढी०—ठीक आहे. क्रांतीची काळजी नको. ती चंद्रोदय होतांच यमुनेच्या काठीं जाऊन गात बसते. तिथूनच तिला उचला !

कज्जले०—ठीक ! ठीक ! रूढीरामजी, हाच बेत ठीक ! मी प्रसंगीं तुम्हाला विरोध करीन, पण तुम्ही तिकडे लक्ष्य देऊं नका. तुमच्या त्या चेंद्याकडून, मला जरूर तर बांधून ठेवा आणि उचला तिला !

रूढी०—( स्वगत ) वा: ! म्हणजे स्वत: नामा निराळं राहून, आम्हाला तोंडाशीं द्यायचा डाव आहे स्वारीचा. ( उघड ) ठीक आहे. खांसाहेब, तुम्ही तुमच्या त्या चेंद्याला चुचकारून ठेवा. नाहीं तर म्हणतात ना, भरंवशाच्या म्हशीला–! बरं आहे, मी जातों. ती तिकडे जातांच तुम्हाला वर्दी देतों. सरदार साहेब, आपली गांठ रात्री जमलं तर तिथंच ! नाहीं तर उद्यां भेटतोच आहोंत.

बद्रु०—ठेहरो ये तुम्हारे वास्ते. ( कसा काढून देतो. )

रूढी:०—मला वाटऊंच होतं, खांसाहेब विसरणार नाहींत म्हणून ! आम्हीं त्यांचेच आहोंत. हँ हँ हँ ! येतों मी. दानेशें असतीलच. ( जातो. )

बद्रु०—सरदार साहेब, ये रूढीराम कुछ गफलत तो नहीं करेगा ?

कज्जले०—शक्यच नाहीं. त्याला खांसाहेबांचा चांगलाच अनुभव आहे. शिवाय, या कामीं तरी तो मनःपूर्वक पुढाकार घेईल. क्रांतीवर त्याचा तसाच दांत आहे.

बद्रु०—सरदार साहेब कुछ भी कहो, मगर ये आदमी और है ! इन् लोगोंको, कलिजा तो बिलकुल है ही नहीं.

कज्जले०—त्याशिवाय का असलीं कामं करतात ते ! कोणरे तो ! चंदन, कां आलास इतक्यांत ! काय म्हणते तुझी सुंदर ?

चंदनः—कांहीं नाहीं ! लग्ना आधींच मुलाचा बोजा पडल्यानं, जरा भांबावली आहे झालं.

कज्जले०—मग काय ! या लेंकुरवाळीशीं करणार का तूं लग्न !

चंदनः—न करून कसं चालेल ? जन्मभर दुसऱ्यांच्याच बायकांकडे पहात बसण्यापेक्षां उसनं मूल घेऊन, लेकुरवाळी बनलेली बायको करणं काय वाईट ?

बद्रु०—चंद्या, चलो, जरा काम है. ( दोघेही बाहेर जातात )

कज्जले०—मला वाटत होतं कीं, इतक्या दीर्घदुष्कर्मानंतर, माझी विवेकबुद्धि मृत झाली असेल ! पण नाहीं. मृत्युसमयींच्या क्षीण व अस्फुट स्वरानं, ती अद्यापहि माझ्या इच्छाशक्तीला अडविण्याचा व्यर्थ प्रयत्न करतेच ! प्रभेसारख्या तरुणींचा बळी घेतांना, ज्या कज्जलेश्वराला आसुरी आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या त्याला आज क्रांतीची कींव येते! क्रांतीच्या आत्मतेजानं उत्पन्न होणारी ही भीति तर नसेल ? कीं प्रेम ह्मणतात तें हेंच ? छेः, प्रेमाचा माझा काय संबंध ? क्रांती स्वतःच्या हातून न सुटावी, ह्मणून स्वार्थी मनाचा हा दुबळा जळफळाट ? नाहीं ! क्रांती रहिमतखांच्या गोटांत गेलीच तर ? पण छेः क्रांती जाणार नाहीं, मी तिला जाऊं देणार नाहीं ! स्वतःच्या सौंदर्याच्या सत्यवर्णनानं चिडून, हा प्रतिष्ठित ह्मणून

मिरविणारा रूढीराम, तिला रहिमतखांच्या जनानखान्यांत लोटणार ! नेहमीं, सावध शिष्टाचाराखालीं लपवून ठेवलेलं नीच मन, प्रसंगीं असं स्पष्टपणें उघड होतं. आजवर डोळ्यांत तेल घालून स्वतःकरितां पाहून ठेवलेली शिकार, त्या रहिमतखांच्या हातीं लागूं द्यायची ? शक्यच नाहीं. बद्रुद्दीन क्रांतीला हस्तगत करून दिल्लीची वाट चालूं लागला कीं, वाटेंतच त्याला कबरस्थान दाखवावं आणि क्रांतीच्या आशेनें ही हत्त्या सुदिननं केली, असा पुकारा करून संरक्षकाच्या सभ्यपणानं, क्रांतीला स्वाधीन करून घ्यावी ! कारस्थानाला नेहमीं सरावलेलं डोकं संधि आली कीं अस्सं उत्साहानं चालूं लागतं. चला, थोड्या वेळांत आपल्यालाहि तिथे हजर झालं पाहिजे. नाहींतर पक्षी उडून गेला, तरी बाणाची निवड करण्यांत गुंतलेल्या शिकाऱ्याप्रमाणं माझी फसगत व्हायची ! ( जातो. )

---

## प्रवेश ४ था.

**स्थलः**—( यमुनातीरावरील रम्य वनश्रीयुक्त जागा. शिलातलावर क्रांती बसली असून दिलरुबा वाजवून गात आहे. )

**क्रांतिः**—सुखाच्या आशेनं डोळे उघडून जगाकडे पाहावं; आणि त्याच उघडण्याला, वटारण्याचं स्वरूप येऊन, प्राण निघून जावेत तशी माझी गत होणार ! देवा, प्रेम ही भावना गुंफतांना सुखाचीं नाजूक फुलं दुःखाच्या धाग्यांत तुटून पडण्या इतकीं, करकचून निष्ठुरपणानं कां बांधलींस ? नको हा जीव. रूढीरामाचा द्वेष, कज्जलेश्वराची कामवासना आणि जन्मदात्या पित्याचा संताप वाढवून, मी काय सुखानं नांदणार ! निराशेच्या ओझ्यानं दमलेला हा देह, यमुनेच्या कृष्णवर्ण मृदुलहरीवर, चंद्रकिरणांच्या रुपेरी आवरणाखालीं, चिरकाल झोंपण्यानं पितृऋणाची अंशतः तरी फेड होवो. सख्यानों, आपल्या प्रेमळ सहवासाला—कष्टानं कां होईना—पण सोडून

जाणाऱ्या क्रांतीला क्षमा करा ! तुमच्या क्रांतीचं जीवन, अशाच आकस्मिक घटनांनीं भरलेलें दिसतं. देवा, त्याग दुस्सह व्हावा म्हणून का मला प्रेम करायला शिकवलंस. सुदिन, सुदिन अंतकाळींहि मला तुमची आठवण आल्याशिवाय कशी राहील ?

पद ५

चालः—( वन्सीवाले कान्हा. ) त्रिवट.

**ठेवा सुदिनदेव माया । नच विसरा बालिका ॥ध्रु०॥**
**गेली मुकली त्या प्रणया । नाहीं भालीं सौख्य का ॥१॥**
**माझ्या हृदयींच्या देवा । नाथा याल तेथ ना ॥ १ ॥**

तीव्र निराशेनं वेडापीसा बनलेला हा जीव, चिरविश्रांतीसाठीं आपणां उभयतांच्या, आवडत्या यमुनामाईच्या लहरींवर, आंदोलन घेत, झोंपीं जात आहे. या काल–निद्रे नंतर तरी, सारा शीण नाहींसा होवो आणि नव चैतन्यानं नटलेल्या उत्साहभरानं उत्कंठित झालेल्या या क्रांतीला, सुदीन लाभोत, एवढीच देवा तुझ्या चरणीं माझी प्रार्थना आहे.

**चंदनः**—क्रांतीताई !

**क्रांतिः**—कोण तें ?

**चंदनः**—ताई, मी चंदन !

**क्रांतिः**—कोण ? सुंदरचा चंदन ?

**चंदनः**—होय, सुंदरचा चंदन ! क्रांतीताई, कृपा करून आपण एक क्षणाचाहि विलंब न लावतां, येथून निघून जा. आपण भयंकर संकटांत आहांत ! आटपा, पळा लवकर.

**क्रांतिः**—चंदन तूं घाबरूं नकोस. मी सर्व व्यवस्था करूनच आलें आहें.

**चंदनः**—तुम्हाला कसं कळलं हें ? खरें ? अगदीं खरं ना क्रांतिताई ?.

क्रांतिः—खरं? तुझीच शपथ! माझ्या इमानी चंदनभाई, तुझीच शपथ!

चंदनः—अहाहा, तो देव दयाळू आहे.

क्रांतिः—खरंच, तो देव दयाळू आहे. फारच दयाळू आहे!

चंदनः—ताई, मी जातों आतां! सर्व व्यवस्था आहे ना?

क्रांतिः—अगदीं पूर्णपणें. जा हं. ( चंदन पहात पहात जातो. ) सुटकेचा मार्ग एक हातावर असतां, मला संकटाची भीति कां वाटावी? चंदनचे चारच भोळे भाबडे बोल, उत्कृष्ट कवितेहूनही सरस नाहींत काय? नको, शांततेच्या वेळीं ही हृदयांत खळबळ नको. आई यमुने, प्रेमभंगानं तडफणाऱ्या कुमारिकांनीं, निष्प्रेम सुवासिनींनीं, बालपणींच संन्यासी बनलेल्या विधवांनीं, आणि रूढीच्या कायद्यांनीं कोंडमारा केलेल्या, प्रेमोत्सुक अबलांनीं वस्ती केलेल्या प्रदेशांत मला नेऊन सोड! आणि तुझ्या दीर्घ लाटांनीं सांग कीं प्रेम हें काव्या करितां आहे. समता फक्त समानाकरितांच आहे. धर्म रूढीला चिकटण्यांत आहे. स्वातंत्र्य पुरुषांकरितां आणि सुख-होय–फक्त त्यागांत–त्यागांतच राहिलं आहे ( किनाऱ्यावर उभी राहते. पडद्यांत–क्रांती!) कोण मला हांक मारतंय! मरायला सुद्धां सवड मिळत नाहीं? ( पडद्यांत–क्रांती! क्रांती! ) असें तोंड लपवून माझ्या नांवानं कोण हांका मारीत आहे. माझं तोंड पहायची लाज कां वाटते?

कज्जले०—नाहीं. स्वतःचंच तोंड दाखवायची मला शरम वाटते.

क्रांतिः— कोण?

कज्जले०—मी कज्जलेश्वर.

क्रांतिः—सरदारसाहेब, आपल्यासारख्यांचा सहवास टाळण्यासाठीं, मी दूर–फारच दूर–जाण्याच्या विचारांत होतें.

कज्जले०—क्रांती, तो विचार असला तरी वेडा विचार आहे.

क्रांतिः—असेल! मी वेडी आहें आणि म्हणुनच, शहाण्यांनीं बुजबुजलेल्या या जगांत राहण्याची, माझी इच्छा नाहीं.

कज्जले०— मी स्पष्टच बोलतों. पण क्रांती आम्हांला काय वाटेल याचा विचार कर!

क्रांतिः०—कज्जलेश्वर, हृदय असल्यासारखंच तुम्हीं बोलतां आहांत. लांडग्यानं शेळीचं कातडं पांघरलं, तरी निरीक्षकाला त्याच्या दाढा दिसत नाहींत असं नाहीं.

कज्जले०—क्रांती, ऐकीव आरोपावर विश्वास ठेऊन, तुझ्या सारख्या स्वतंत्र विचाराच्या तरुणीनें, एखाद्यावर असा अग्निवर्षाव करावा हें बरें नव्हे !

क्रांतिः—कज्जलेश्वर, तुमच्या दुष्टपणाला शोभेल अशीच तुमची बुद्धिही असेलसं मला वाटलं होतं, पण आतांच्या साळसूद सोंगाची, आपली दरिद्री बतावणी पाहून मला आश्चर्य वाटूं लागलं आहे. पण जाऊं द्या ! मी बोललें हेंच जास्त.

कज्जले०—क्रांती, मनुष्य चुकीला पात्र आहे. इतकी माझी निर्भर्त्सना करण्यासारखं मी काय केलं आहे ?

क्रांतिः—कज्जलेश्वर, तुम्हीं काय करायचं बाकी ठेवलं आहे ? प्रभे-सारख्या उमलत्या पुष्पांनां, विषयवासनेच्या आगींत जाळून तुम्हीं कठोर समाजाच्या पायाखालीं ठोकरत, मृत्युमुखांत लोटलंत. कज्जलेश्वर, वाईट केलंत अगदीं ! प्रभेची ती अंतकाळची तळमळ, तो केविलवाणा चेहरा, मी कधीं आणि कशी विसरेन ! कज्जलेश्वर, मी जगलें असतें तर तुमचा द्वेष करणें–प्रभेच्या खुनाचा सूड घेणें–हेंच मी माझं जीवित कार्य ठरविलं असतं.

कज्जले०—क्रांती, सुडाची राक्षसी कल्पना स्त्री हृदयाला शोभत नाहीं. स्त्रियांपासून, प्रेमाची आणि दयेची पुरुष अपेक्षा करतात.

क्रांतिः—यांच्या मोबदल्यांत स्त्रियांना काय मिळतं ? प्रभेला मिळालं तें ? इतक्या अधमपणानं वागून, तुम्हीं प्रेमाची आणि दयेची अपेक्षा करतां ? कज्जलेश्वर, धन्य आहे आपल्या धाडसाची.

### पद ६

**चाल–( दयासागरा ) त्रिवट**

**न पाही धाके लाजे कसा । राखि प्रेम आशा ॥ध्रु०॥**
**छल तापकारी । सुजनां संव्हारी । करी घोर नाशा ॥१॥**

**कज्जले०**—क्रांती, तूं चुकते आहेस. रहिमतखांचे दूत क्षणार्धांत इथे येतील आणि स्वतःच्या इच्छेविरुद्ध तुला—माझ्याच्यानं पुढें बोलवत नाहीं.

**क्रांतिः**—नकाच बोलूं ! कज्जलेश्वर ! नका उगीच कष्टी झाल्यासारखें दाखवूं. कारण अशा सोंगानें मी फसणार नाहीं.

**कज्जले०**—माझी भीती तुला कशी स्पष्ट करून सांगूं ? क्रांती, माझं हृदय मी तुला कसं उघडं करून दाखवूं !

**क्रांतिः**—कज्जलेश्वर, तुमचं हृदय कशाला उघडं करतां ! आजूबाजूला पडलेल्या प्रत्येक दगडांत, तें मला दिसतं आहे.

**कज्जले०**—क्रांती, तुझा गैर समज काढून टाक. निष्काळजीपणानं वागून तूं स्वतःचा धर्म गमावशील.

**क्रांतिः**—कज्जलेश्वर, धर्म म्हणजे काय तुम्हीं कनवटीला लावलेली आश्रफी समजतां ?

**क्रांतिः**—स्वतःच्या हातांनीं, आजवर दुसऱ्याच्या मुलीबाळी, मुसलमान सरदारांना नजर करतांना घोरत पडलेलें तुमचं धर्मप्रेम, जागृत कां झालं हें मला समजत नाहीं असं का तुम्हाला वाटतं ? क्रांतीच्या धर्माची तुम्हाला पर्वा नाहीं, क्रांतीच्या शीलभंगानं तुम्हाला खेद होणार नाहीं; क्रांती स्वतःच्या हातून सुटूं नये, म्हणून तुमच्या स्वार्थी मनानं धर्मरक्षणाखालीं चालविलेला हा गारुडी तमाशा आहे.

**कज्जले०**—क्रांती, एकदां बाण हातचा गेला—

**क्रांतिः**—जाऊं द्या. तुमच्या हातचा बाण गेला तर ठीकच होईल. कारण तुमच्या हातांतील बाण संरक्षणाऐवजीं घातच करावयाचा ! रहिमतखांचे दूत मला फरफटत नेतानां पाहून, तुम्हाला वाईट वाटेल, हें मलाहि कबूल आहे. पण तें कां ? तर हें फरफटत नेण्याचं पुण्यकर्म स्वतःला लाभत नाहीं म्हणून !

**कज्जले०**—तसं जरी गृहित धरलं, तरी परक्यांच्या हातापेक्षां, स्वकीयांचा हातच बरा नव्हे का ?

**क्रांतिः**—फरफटत नेणारा हात—मग कुणाचाहि असो—वाईटच. परकीयांचा उघड घातकी, आणि स्वकीयांचा विश्वासघातकी.

**कज्जले०**—दैवापुढें कुणालाहि जातां येत नाहीं. ते पहा आलेच ते!

**क्रांतिः**—येऊं देत! त्यांचं स्वागत करायला, मी इथें थांबतच नाहीं. ( गडबडीनें उडी टाकूं लागते. कज्जलेश्वर तिला धरून ओढतो. )

**कज्जले०**—माझ्या डोळ्यांदेखत, मी तुला असा आत्मघात करूं देणार नाहीं.

**क्रांतिः**—आणि मी आत्मघात करीन, पण तुला माझा घात करूं देणार नाहीं. ( चंदन, बद्रुद्दीन, रूढीराम वेष बदलून येतात. )

**बद्रु:**—चंद्या, पकड वो आदमीको! ( चंदन जाऊन कज्जलेश्वराला धक्का मारून पाडतो. रूढीराम क्रांतीला धरतो. )

**कज्जले०**—प्राण गेला तरी बेहत्तर, पण या तरुणीच्या अंगाला मी तुम्हाला हात लावूं देणार नाहीं.

**चंदनः**—प्राण गेला तरी बेहत्तर, मी तुलाही त्या तरुणीच्या अंगाला हात लावूं देणार नाहीं.

**क्रांति**—बाबानों, कां निष्कारण त्रास करून घेतां? तुम्ही मला बळजबरीनं पकडून नेलीत, तरी मी शेवटपर्यंत जिवंत येणं शक्य नाहीं. कां उगीच हत्या मागं लावून घेतां? सोडा माझे हात. मी पळून जात नाहीं.

**कज्जले०**—हरामखोरांनो, सोडा तिला. ती कोण आहे तुम्हांला माहित आहे?

**चंदनः**—तुझी आई आहे. गप्प बैस कीं! उगीच कां मध्येंच तोंड घालतोस?

**कज्जले०**—काय करूं! यावेळीं माझी तरवार असती तर?

**चंदनः**—तर काय केलं असतंस?

**कज्जले०**—दाखविलं असतं या कज्जलेश्वराचं तेज!

**चंदनः**—दिसतंच आहे तें! आंतल्या तेजानं करपून बाहेर काळा झाला आहेस नाहीं का? ( झाडाला बांधून ) बस्स्. बसा आतां!

बद्रु०—देखो, ये लडकीको छोडना नहीं. मैं घोडे लेके आता हूं. ( जातो. )

चंदनः—अहो-अहो रूढीरामजी—

क्रांतिः—काय रूढीराम ?

रूढी०—काय मूर्ख आहे हरामखोर ! शेवटीं केलाच घात !

क्रांति०—( खिन्नतेनें हंसून ) रूढीराम, काय हें तुमचं मन ! शास्त्राधाराच्या गोष्टी सांगतां सांगतां असली कुंटणगिरी करून पोट जाळतां ?

रूढी०—क्रांती, तोंड आवर ! हें पोट जाळणं नव्हे, हा सूड आहे.

क्रांतिः—रूढीराम, स्वतःच्या हातांनीं तुम्हीं माझा खून करायचा होता, पण दुसऱ्याच्या धर्मावर, शीलावर अशी रखरखीत आग फेकायला, तुमचे हात धजले तरी कसे ? रूढीराम, अगदीं वाईट आणि वेडेपणाचं कृत्य करतां आहांत तुम्हीं ! उद्यां तुमचाच समाज, तुम्हाला काय ह्मणेल ?

रूढी०—तुझ्यासारख्या पतित पोरीच्या वतीनं वकिली करायला समाज बांधला गेला नाहीं. समाजाचे कायदे भंग करणाऱ्यांनां, समाजाकडून संरक्षणहि मिळत नाहीं.

क्रांतिः—सदाचार व शील आहे तोंपर्यंत, माझं रक्षण करायला मी समर्थ आहें. रूढीराम, तुमच्या दृष्टीनं मी पतित असलें तरी स्वधर्मी आहें.

रूढी०—असल्या पतित रूढीभ्रष्ट कुलटांना, आमच्या धर्मांत जागा नाहीं. त्या अशाच बेवारशी वस्तुप्रमाणं, वाटेल त्याच्या हातीं पडायच्या ! असली ही कीड स्वधर्मांत जगण्यापेक्षां परधर्मांत गेली ह्मणून काय बिघडलं ?

क्रांतिः—रूढीराम, धर्माला लागलेली कीड टाकायची नाहीं, तर मारायची ! वाटल्यास माझा प्राण घ्या, पण हा आत्मघातकी प्रकार बंद करा.

रूढी०—या विनवण्या व्यर्थ आहेत. तुझं रक्षण होणं अशक्य आहे.

क्रांतिः—मला रक्षण नको ! जगण्यासाठीं मी धडपडत नसून, मरण्यासाठीं मी उत्सुक आहें. पण रूढीराम, माझे शब्द ध्यानांत ठेवा. हा बेदर-

कारपणा, परिणामीं भयंकर घातक होईल. क्षुल्लक अपराधावरून, तुम्हीं मिजासखोरपणानं, आणि फाजिल सोवळेपणानं, परधर्मांत आजवर अनेक बायाबापड्या लोटल्या; पण त्यांचींच मुलं, परधर्मी वीर म्हणून, तुमच्या नरड्यावर बसलीं आहेत आणि पुढेंहि बसतील ! स्वधर्मी पतित स्त्रीचा पुत्र, निदान मूर्तिभंजक बनत नाहीं, देवालयं भ्रष्ट करीत नाहीं; स्वधर्म नष्ट व्हावा म्हणून झटत नाहीं. पण तोच परधर्मांत गेला तर? तुमच्याशीं आपलेपणाचा संबंध सुटलेल्या, तुमच्याच भाइबंदाचा परधर्मीय नातु, तुमच्या वंशजांना शत्रू लेखील. रूढीराम, डोळे उघडा ! पापी असतील त्यांना प्रायश्चित्त द्या, त्यांचा जीव घ्या, पण त्यांना दूर लोटूं नका ! त्यानां परधर्मांत जायचे रस्ते, स्वतःच्या हातांनीं दाखवूं नका.

**चंदनः**—क्रांतीताई, खोटं बोलली मघाशीं ! मला सांगितलं व्यवस्था केली, पण तें सारं खोटंच तर ? अद्याप सुदिनदेवहि कुठें दिसत नाहीं.

**कज्जले०**—हरामखोरा, माझे हात पाय जरा खुले कर.

**चंदनः**—कशाला उगीच ? लाथा झाडायची तुमच्या जातीला आहे संवय ! उगीच नसता त्रास !

**कज्जले०**—( स्वगत ) हा बदमाष सोंगाची बतावणी करतां करतां खरोखरीच मला शिव्या देऊं लागला ! पण हा बद्रुद्दीन कुठें गुप्त झाला ?

**रूढी०**—चंद्या, बघ लवकर खांसाहेब घोडीं घेऊन आले कीं नाहीं ते !

**चंदनः**—तुमचं घोडं जरा बांधा कीं ! आणावयाला तरी नकोत वाड्यांतून?

**क्रांतिः**—रूढीराम, विचार करा. नाहींच का तुमच्या डोक्यांत प्रकाश पडत ? रूढीराम, स्वधर्माचा घात, कायदेभंग करणाऱ्या पेक्षां तुम्हीं केला आहे, करीत आहां ! आणि या घोर पापाचे परिणाम, तुम्हाला भोगावे लागतील, हें विसरूं नका. रूढीराम हा सूड नाहीं, ही कीड मारणं नाहीं; हा आत्मघात आहे ! हा स्वजनद्रोह आहे. हा तुम्हा स्वतःच्या हातांनीं समाजाच्या सुरक्षिततेखालीं लावलेला सुरुंग आहे.

**रूढी०**—क्रांती, बडबड बंद कर !

**क्रांतिः**—काय करूं, देवानं सामर्थ्य दिलं असतं, तर स्त्रीजातीच्या कोमल भावना विसरून, मी माझ्या हातांनीं तुमचा प्राण घेतला असता, इतका मला तुमच्या मूर्खपणाचा संताप आला आहे. सोडा माझी वाट! ती अडविण्याचं, तुम्हालाच काय—पण कुणालाच सामर्थ्य नाहीं. सोडा माझी वाट!

**रूढी०**—मी इथें तुझी वाट सोडायला उभा नाहीं,. वाट लावायला उभा आहें. ते पहा, आलेच खांसाहेब!

**क्रांतिः**—रूढीराम, सोडा माझी वाट! माझी वाट मला दिसते आहे. ( जाऊं लागते. रूढीराम धरतो. )

**चंदनः**—काय करावें? अद्याप कसे येत नाहींत? मोठी पंचाईत आली!

**क्रांतिः**—मांगा, सोड, सोड माझा हात! ( ओढीत कडेला जाते व ओढ घेतांच, रूढीराम मागें पडतो व क्रांति पाण्यांत पडते. )

**चंदनः**—( ओरडून धांवत पाण्यांत पहात ) क्रांतीताई, क्रांतीताई, सुदिन, सुदिन, चालली; चालली तुमची क्रांति!

**सुदिनः**—( धांवत येऊन ) चंदन, महासागरापर्यंत प्रवास करून, मी माझ्या क्रांतिला परत आणीन! क्रांती, जय जगदीश! (उडी टाकतो)

**बद्दु०**—( धांवत येऊन ) किधर गई वो लडकी?

**चंदनः**—रूढीरामाला विचारा!

**रूढी०**—( भांबावून ) वो, वो, वो—

**बद्दु०**—ठीक है! समालके रेहना! चंद्या, पकड उस्की गर्दन! ( चंदन रूढीरामाला पकडतो ) पडदा पडतो.

**अंक पहिला समाप्त!**



क्रांती—मांगा, सोड, सोड माझा हात !

[पान ४०].

# अंक दुसरा.

## प्रवेश १ ला.

स्थलः—नदी किनारा.

पात्रेंः—( ज्ञातिभैरव बेभान स्थितींत येतो. )

ज्ञातिभैरवः —

पद ७

**प्रेमळ बाला ही दुनिया ॥ ध्रु० ॥ त्यजुनि स्वताता**
**लोटी रोषें वाया । कां तरी व्यसनीं घाव जिव्हारी ॥**

अनंत हस्तांनीं लहानथोरांनां, अकालीं उचलून तोंडांत टाकणाऱ्या मृत्यूला, या म्हाताऱ्याला गिळायची इच्छा होत नाहीं ! हल्लीं मी पिचत असलेल्या नरकापेक्षां, आणखी कोणता भयानक रौरव असणार ? बायको गेली, एकुलती एक कन्या स्वतःच्या हातांनीं, मी यमुनेच्या डोहांत बुडविली. आणि त्या स्मशानापेक्षांहि भणभणीत बनलेल्या घरांत, मी ताठ डोळे ठेऊन मृत्यूची वाट पहात नसलों. क्रांती, काय केलंस हें ?

कज्जले०—मामासाहेब.

ज्ञाति०—कोण ? कज्जलेश्वर ! क्रांतीच्या जिवंतपणीं केलेल्या विटंबनेनं, माझं हृदय फुटायची वेळ आली आहे. त्यांत तुम्ही मला आतां मामासाहेब म्हणून, तिच्या स्मृतीचीहि विटंबना करूं नका. कज्जलेश्वर, तुमच्यामुळं मी माझ्या क्रांतीचा खून केला. आणि या खुनाचा, कायदेशीर नसला तरी नैतिक नीचपणा तुमच्या बोडक्यावरच आहे.

कज्जले०—मामासाहेब, आपण शांत व्हा ! क्रांतीच्या आत्महत्त्येची जबाबदारी आपणां दोघांवरही नाहीं. हें भयंकर पाप तिच्या माथ्यावर आहे.

ज्ञाति०—तुमच्या आमच्यासारख्या फाटक्या पंडितांनीं न्याय करण्याच्या पलीकडे क्रांती गेली आहे. पण कज्जलेश्वर, प्रभेनं तुमच्या पुण्याईचा पाढा, पुराव्यासह आमच्या दारांत रडत ओरडत वाचला नसता, तर क्रांती आत्मघात करती ना ! बाकी, तुम्हाला तरी काय दोष द्यायचा.

रूढी०—दादासाहेब, धर्माकरितां आपण आपल्या पोटचा गोळा बळी दिलात, ही गोष्ट त्या सर्व निरीक्षक ईश्वराला तरी दिसेल.

ज्ञाति०—कुणाला ठाऊक ! ज्या ईश्वराला प्रभेसारख्या पोरी तडफडतांना दिसत नाहींत; त्या परमेश्वराला, असल्या क्षुद्र गोष्टी तरी काय दिसणार आहेत ! परमेश्वराला डोळे असते, तर इतकीं पापें करून तुम्हीं आणि मी जिवंत राहिलों असतों काय ? त्यानं तुम्हां आम्हांला फरफटत नेऊन रौरवांत इतक्या खोल गाडलं असतं कीं तेथून वर यायला आम्हाला अनेक शतकं लागलीं असतीं !

कज्जले०—मामासाहेब, कोणत्याहि स्वार्थानं प्रेरित होऊन, तुम्ही ही गोष्ट केली नाहीं हें समाज विसरणार नाहीं. धर्म जिवंत राहिला असेल तर तो आपल्यासारख्या, निश्चयी, त्यागी सत्पुरुषांच्याच कृपेनें !

ज्ञाति०—कज्जलेश्वर, संसाराच्या कर्दमांत रुतलेल्या, प्रत्येक मनुष्याच्या कृतीच्या मुळाशीं थोडाबहुत स्वार्थ असतोच ! स्वतःचीं मुलंबाळं लोकांच्या भीतीनें मृत्युमुखांत लोटणाराला, जर त्यागी म्हणायचं तर तुम्हाला तरी ब्रह्मचारी कां म्हणूं नये ! आत्म्याच्या उद्धारासाठीं निर्माण झालेला धर्म, आम्हीं व्यवहारांतील सुखसोयींकरितां बदलला आहे. आणि हें कळायला, क्रांतीला मरावं लागलं. मला पोटचा गोळा बळी द्यावा लागला.

चंदनः—पण दादासाहेब, क्रांतीबाई पुन्हां दिसणार नाहीं म्हणून कशावरून.

ज्ञाति०—चंदन, माझी क्रांती जिवंत असती, तर कोणत्याहि मोहानं, कसल्याहि भयानं, ती आज आठ दिवस या म्हाताऱ्याला सोडून राहिली नसती.

रूढी०—कदाचित् ती सुदीनबरोबर—

ज्ञाति०—रूढीराम, एकवार बोललांत, मूर्खपणाला शोभलं! पुन्हां बोलाल, तर बाहेर आलेले शब्द तरवारीनं परत नरड्यांत ढकलीन. पित्याच्या आज्ञेकरितां सर्वस्वाचा त्याग करणाऱ्या क्रांतिबद्दल अशी कल्पना मनांत आणतांना तुम्हाला लाज वाटली नाहीं?

कज्जले०—मामासाहेब, आपण त्रास करून घेऊं नये. ती नुस्ती शंका आहे.

ज्ञाति०—कज्जलेश्वर, माझ्या क्रांतीबद्दल अशा शंका तुम्हीं ऐकून घेतां, नव्हे, उलट तरफदारी करतां? कज्जलेश्वर, तुम्हां सर्वांची ओळख मला फार उशीरां होत आहे! बरं झालं, माझी क्रांति गेली; नाहीं तर तुमच्या सारख्यांचे पायपोस खात तिला पावलोपावलीं, मरत जगावं लागलं असतं.

कज्जले०—मामासाहेब, अपत्य-विरहानं तुम्हीं वेडे होणें शक्य आहे. पण वेडा, लहरींत मर्यादेबाहेर बोलला तर त्याची जीभ आणि लहर मर्यादित करावी लागेल.

ज्ञाति०—कज्जलेश्वर, धमकावणाऱ्या तोंडाला, हातहि धडधाकट लागतात. बहात्तर रोगांनीं बुजबुजलेल्या, तुमच्या सारख्या पोषाखी वीरांनीं आजुबाजूला, दहापांच सशस्त्र नोकर असल्याशिवाय वीराची ऐट आणूं नये!

रूढी०—दादासाहेब, आपली आणि इतरांची योग्यता ध्यानांत घेऊन बोलायला पाहिजे होतं तुम्हीं.

ज्ञाति०—खरंच! हें मी अगदींच विसरलों होतों! सरदारसाहेबांची योग्यता विसरूनच मी बोललों खरा.

कज्जले०—ज्ञातिभैरव, तोंड सांभाळून बोला. वशिला लावून सुटाव-याला आतां पोरगीहि राहिली नाहीं.

ज्ञाति०—पोरगी नसली, तरी ही अर्धांगी आहेच कीं! मी सांगतांच, ती वाटेल त्याच्या गळ्याला जाऊन बिलगेल! दुसऱ्यांच्या व स्वतःच्या

खायका देऊन, वशिले लावणारा तूं ! तुला याशिवाय काय दिसणार ? अरेरे, काय ही अधोगती ! आणि हा शाहीसरदारांचा कुंटण्या माझा जांवई व्हायचा होता ?

**कज्जले०**—खामोष ! थेरड्या ( स्वगत. ) पण जाऊंद्या. क्षणभर मी बेसावध झालों ! चुकतं आहे हें ! ( शांतपणें ) मामासाहेब, क्षणभर मी अविचारानं आपला उपमर्द केला, त्याची मला क्षमा करा. आपण कांहीहि बोललांत, तरी आम्हाला वंद्यच आहांत.

**चंदनः**—हं, आतां आला बरोबर जातीवर ! इतका वेळ तरी कसा इतक्या जोरानं बोलला कुणाला ठाऊक ! गडबडींत, लेकाचा बुरखा थोडा बाजूला झाला होता.

**कज्जले०**—चंदन, जा. मामासाहेबांनां घरीं पोहोचीव. आणि हें पहा तुझ्या सुंदरला म्हणावं, जरा चार दिवस मामासाहेबांच्याकडे पहा ! काय ?

**चंदनः**—हो, हो ! ती आनंदानं जाईल. नाहीं म्हणायला, तिला थोडंच तुमच्याकडे पहायला सांगायचं आहे ?

**कज्जले०**—म्हणजे ? चंद्या !

**चंदनः**—म्हणजे असं सरदारसाहेब, तुम्हीं पडलांत तरुण, त्यांतून मोठे ! तेव्हां कदाचित् ती आपल्याला लाजेल तशी दादासाहेबांना नाहीं लाजायची म्हटलं. चला दादासाहेब !

( ज्ञातिभैरव चंदनाचा हात धरून निघून जातो. )

**रूढी०**—( त्याच्याकडे पाहून ) थेरडा बराच पिसाळलाय ?

**कज्जले०**—आमचंच चुकलं तें ! पिसाळला तरी काय करणार ? पण त्याला उगीच बिथरून उपयोगी नाहीं ? हें पहा, तुम्हीं या चंद्यावर नजर ठेवा. मला याचीच शंका येते. हो नाहीं तर, हाच उरुट त्यांना बातम्या द्यायचा. ( जाऊं लागतो तोंच सुंदर मुलाला घेऊन येते. ) हें कारटं जगलं आहे. सुंदर बेफामपणें, प्रत्येकाजवळ वाटेल तें बरळत सुटते. तिचा लवकर बंदोबस्त केला पाहिजे रूढीराम !

सुंदरः—हा तु सु तु ! छुक् छुक् छुक् ! ( दोघांना पाहून ) हें चांगलं ! ही डोम कावळयांची जोडी इथं कां ! ( जाऊं लागते. )

कज्जले०—सुंदर !

सुंदरः—काय म्हणतां ?

कज्जले०—हें पोर कधीं झालं तुला ?

सुंदरः—प्रभाताई मेल्यावर !

कज्जले—म्हणजे तुझं मूल नव्हे तर हें ?

सुंदरः—माझं, माझंच म्हणायचं !

रूढी०—अग पण हें विकतचं मढं घेऊन, कां बसली आहेस तूं ?

सुंदरः—फुकटचं तमच्या सारख्याचं मढं मिळालं तर हें विकतचं देईन सोडून !

कज्जले०—अग तसं नव्हे ! पण वाईट दिसतं तें ! जरा लोकांकडे पाहिलं पाहिजे.

सुंदरः—बेवारसी मूल पाळतांना, जर आम्ही लाजायचं, तर या मुलाला जन्म देणाऱ्यांनीं कुठल्या मोरींत तोंडं लपवायचीं ?

रूढी०—अग, पण त्यांची उठाठेव तुला कुणी सांगितली ?

सुंदरः—मग आमची उठाठेव तुम्हाला कुणी सांगितली ?

कज्जले०—सुंदर, असं उर्मटपणानं बोलणं, बायकोच्या जातीला शोभत नाहीं.

सुंदरः—शोभलं आणि वाईट दिसलं, मला काय करायचं कुणाशीं ?

रूढी०—पण तुझं लग्न व्हायचंय ! अजून तूं जगांत काय पाहिलंयंस !

सुंदरः—दिसतं आहे तेंच जास्त आहे.

कज्जले०—हें पहा सुंदर, तुला वाटलं, तर चंदनला मी आमच्या इथं ठेऊन घेतों. तूंहि रहा त्याच्याबरोबर ! पण हें एवढं पाप आणूं नकोस. लोक काय म्हणताहेत माहीत आहे का ?

सुंदरः—मला पाठ झालंय तें ! पण तुम्हीं ऐकलंत का ?

रूढी०—काय म्हणतात ?

सुंदरः—सारा गांव म्हणतो कीं हें बाळ—-

चंदनः—( प्रवेशून ) कज्जलेश्वराचं असंच ना ?

कज्जले०—झक् मारतो गांव.

चंदनः—गांवानें झक मारली, पण पुढचं शेण कुणी खायचं ?

कज्जले०—तूं—

चंदनः—खरं बोललांत सरदार साहेब ! गांवाच्या दृष्टीनं झक् मारली आपण, हें शेण खातों आहोंत आम्हीं !

कज्जले०—चंद्या, खबरदार पुन्हां असं बोलशील तर ? कोण सांगतं ? सांग मला त्या हरामखोरांचीं नांवं ?

चंदनः—मला तरी काय माहीत, सरदार साहेब ! आपली ही भानगड झाली, त्यावेळीं मी दिल्लीला होतों, काल परवां बायका नदीवर आपापसांत बोलत होत्या तें मी ऐकलं ?

रूढीरामः—त्यांत तुझी सुंदर असेल ? तिनंच ही आग पेटविली आहे.

सुंदरः—चुकतां तुम्हीं ! आग पेटाविली यांनीं, जाळली प्रभेला, आणि हें कोलित मात्र मी घेऊन फिरतें आहें.

रूढी०—यांनीं आग लावली याला पुरावा ?

सुंदरः—हा ! ( मूल दाखविते. )

रूढी०—त्याच्यावर यांचं नांव आहे वाटतं ?

चंदनः—तुमच्या मुलावर तुमचं नांव आहे वाटतं ?

कज्जले०—चंद्या, सुंदर, वाह्यातपणा बंद करा ! ज्ञातिभैरवांसमोर त्या चहाड्या कुणी केल्या ?

सुंदरः—मला काय माहीत ! त्या दिवशीं, प्रभाताईच त्यांच्या दारांत तुमच्या नांवानं रडून रडून मेली.

रूढी०—ती मेली आहे, पण तूं अद्याप जिवंत आहेस हें ध्यानांत ठेव! आणि मरायचं नसलं, तर तोंड आवरून रहात जा!

सुंदर:—हं! कां फारच दरडावायला लागलांत? काय खाल कीं गिळाल मला?

चंदन:—( स्व. ) हें आतां भलत्याच थराला जायचा बेत दिसतो. आपणहि या शिमग्यांत चार शिव्या देऊन घ्याव्यात ( खूण करून ) कां ग? फार तोंड सोडलयंस. कुणापुढं कसं बोलावं! यांना तूं कोण समजतेस?

सुंदर:—समजतें! सगळा गांव ओळखतो याला! प्रथम गांवांत आला तेव्हां "चिक्की गुडदानी" म्हणून ओरडून, घसा फुटलाय आणि आतां झालाय मोठा शेठ!

रूढी०—चंदन, तिला नीट सांग हं! बायको माणूस, म्हणून गप्प राहिलों.

सुंदर:—बायको माणूस म्हणुनच, तुझं तोंड इतकं तरी चाललं! पुरुषांशीं तूं भांडतोस? एवढा म्हातारा होत आलास, तरी अजून पोरींत बोलत बसतोस? पुरुषच कां तूं?

चंदन:—सुंद्रे, तोंड आवर. त्यांची आणि रहिमतखां सुभेदार साहेबांची चांगली दोस्ती आहे. देतील फटके!

सुंदर:—फटके देतोय? दिल्लीच्या बादशहाचा मेव्हणाच कीं नाहीं? सुभेदाराची दोस्ती नसायला काय झालं!

कज्जले०—सुंदर, तोंड आटप! चंद्या, फार झालं हें! माझं डोकं शांत असलं, तरी शांततेला मर्यादा आहे.

चंदन:—सुंदर, तोंड आंवर तुला सांगतों. नाहीं तर, तुझ्या गळ्याशपथ, मी तुझा गळा दाबून जीव घेईन!

सुंदर:—घ्या कीं! त्याशिवाय यांच्या सहवासाचा गुण कसा दिसणार!

चंदन:—अग, पण तूं यांच्या नांवानं इतकी रडतेस, तुझं असं काय घोडं मारलं आहे यांनीं? त्यांचे ते मुकत्त्यार आहेत.

रूढी०—आम्हाला वाटेल तें आम्हीं करूं !

सुंदरः—हें असलं वाटेल तें करूं लागतात, तर कोण देईल करून ?

रूढी०—पण त्यांत तुझ्या बापाचं काय गेलं? बेशरम नाहीं तर ! वाः ! मुस्कट फोडून देईन. माहित नाहीं !

सुंदरः—अहाहा, तोंड बघा. ये मुस्कट फोडायला ! म्हसोबा बसविल्यासारखा बसवतें तुझा मुडदा ! टरबुजाच्या तोंडाचा !

चंदनः—( स्व. ) वः ! हिनं तर छानच हजेरी घेतली यांची !

कज्जले०—( बाजूस ) रूढीराम, यांत कांहीं अर्थ नाहीं ! ती आहे बेफाम बायको ! आपल्याला धड बोलतां यायचं नाहीं ! लोक उलट आपल्यालाच हंसायचे ! सुंदर, थोडे दिवस थांब ! तुझीहि व्यवस्था होईल. ( दोघे जातात. )

चंदनः—( हंसून ) वः ! खूप केलीस ! पण जपून रहा हं ! नाहीं तर हे दोघे आहेत नीच ! कोणत्या वेळेला काय करतील, याचा नेम नाहीं.

सुंदरः— करून करून काय करणार माझं ? ठार मारतील ? मारूं देत ! पण मी तरी काय करूं ! प्रभाताईची आठवण झाली, तिची त्या दिवशींची स्थिती नजरे समोर उभी राहिली, आणि या बाळाकडे पाहिलं कीं वाटतं, लोकांनीं हडळ म्हटलेलं पुरवलं, पण या दोघांचा चावून चावून जीव घ्यावा.

चंदनः—असलं कांहीं करूं नकोस ! अगदीं दांत शिवशिवतच असतील चावण्यासाठीं, तर कोणी नाहीं तो पर्यन्त हे माझेच गाल घे !

सुंदरः—इश्य !

चंदनः—या इश्य मध्येंच, पाहिजे असा अर्थ घ्यायचा ना ? कमाल आहे बुवा तुम्हा बायकां पुढं !

सुंदरः—आतां, माझ्यावर फिरली कां नजर ?

चंदनः—नजर फिरली नव्हे खिळली, तरी दिसणार काय तिथं ?

शिवाय ती लहानपणापासूनच ठेवली आहे मी! अग पण तें पोर जिवंत आहे कीं—

**सुंदरः**—असं भलतंच बोलूं नये! अफू घातलीय थोडी त्याला जरा, किरकिरतोय दोन दिवस!

**चंदनः**—होय का! मग मलाहि जपलं पाहिजे. नाहीं तर माझी कुरकुर टाळण्यासाठीं, मलाहि घालायची गोळी एखादी!

**सुंदरः**—पण क्रांती ताई—

**चंदनः**—घरीं चल पाहूं! रस्त्यांत, क्रांती आणि सुदीन हीं नावं घ्यायची सुद्धां चोरी झाली आहे. ( जातात. )

---

## प्रवेश २ रा.

---

स्थलः-( एक झोंपडी. क्रांती झोंपलेली. सुदीनं गुप्त वेषांत. वेळ रात्र. )

**सुदीनः**—

### पद ८.

**आशा नुरे वेध। लागे सतत हाचि ॥ धृ० ॥ शयानिं पडे बाला चिंता उपजवीत ॥ कां ना दया तूतें। ये आज ईशा ॥ धृ० ॥**

आठ दिवस तापानं बेहोष होऊन पडलेली क्रांती, या सुदिनला, गुप्त वेषांत ओळखूं शकली नाहीं. पण आतां? क्रांतीचं माझ्यावर अचल प्रेम आहे हें माहीत असूनहि, क्रांती बरी झाल्यावर इथं राहीलच, असा भरंवसा मला कां वाटूं नये! चंदनच्या सावधगिरीनं, आणि माझ्या सुदैवानं, अद्याप आमचा सुगावा, कज्जलेश्वराला लागला नाहीं. पण पुढंहि लागणार नाहीं, याचा काय नेम? येथून, गुप्तपणें प्रवास करण्याच्या स्थितींत क्रांती नाहीं; राणाजींनां सोडून, क्रांतीसाठीं, इथें राहण्याच्या स्थितींत मी नाहीं! पण ही जागी झाली वाटतं?

**क्रांतिः**—मला इथं कुणी आणली ?

**सुदीनः**—सरदार सुदिन !

**क्रांतिः**—त्यांनीं वाईट केलं. त्यांच्या कृतीच्या मुळाशीं, माझ्याबद्दलची अभिलाषा होती असं लोक म्हणतील. जीव देण्याच्या निमित्तानं, नदींत पडून ही आपल्या—नाहीं नाहीं, माझ्याच्यानं नाहीं हें सहन होत. सरदार-साहेब, आपण कृपा करा आणि मला जाऊं द्या, मला मरूं द्या !

**सुदीनः**—आपली वेळ आली, म्हणजे आपण सारेच मरणार आहोंत. शिवाय, सरदार सुदिनच्या प्रत्यक्ष परवानगीवांचून, मी आपल्याला कसा जाऊं देऊं ? तुम्हीं, तुमच्याबरोबर, मीही मरावं म्हणतां ?

**क्रांतिः**—तुम्हीं जाऊन त्यांना सांगा !

**सुदीनः**—आपल्याला एकटं सोडून मला जातां येणार नाहीं.

**क्रांतिः**—यमुनेच्या डोहांतून जिथं मी परत आलें, तिथे झोंपडींतल्या झोपडींत मला काय होणार आहे ?

**सुदीनः**—महापुरांतून वांचलेले लोहाळे,बैलाच्या पायांत चिरडले जातात.

**क्रांतिः**—तुम्हाला मी माझी भीति, कशी स्पष्ट करून सांगूं ? मी जिवंत असून आठ दिवस परक्यांच्या सहवासांत—परक्यांच्या—घरांत राहिलें हें कळलं तर—

**सुदीनः**—तर काय होईल ?

**क्रांतिः**—लोक मला फाडून खातील. माझ्या बाबांना हें कळलं, तर ते वेडे होतील. समाजाच्या भीतीनें ते आत्महत्या करतील.

**सुदीनः**—एकंदरींत, तुमच्या घरांत हा आत्महत्येचा पिढीजाद रोग आहे म्हणायचा ? सरदार सुदीनना काय वाटेल, याचा तुम्हीं विचार केला आहे का ?

**क्रांतिः**—चार दिवस वाईट वाटेल, पण मी जिवंत राहण्यानं, त्यांना जन्मभर रडत बसावं लागेल. नका, मला जाऊं द्या. जन्मदात्या पित्याला,

स्वतःला, जी सुखी करूं शकली नाहीं; ती त्यांचं तरी काय चांगलं करणार आहे ? मला मेलं पाहिजे. मी जगलें हीच चूक झाली !

**सुदीनः**—मग पुन्हां मरण्याची चूक करूं नका ! एकदां केली तर ती चूक. वारंवार केलेली चूक अपराध ठरेल !

**क्रांतिः**—माझ्या बाबांनां काय वाटेल ? जग मला काय म्हणेल ?

**सुदीनः**—सरदार सुदीनवर प्रेम करतांना, हा विचार तुम्हीं केला नाहीं. आत्महत्त्या करतांना, तुमच्या हें ध्यानांत आलं नाहीं. सुदीनवर प्रेम करून, आपण पित्याच्या इच्छेविरुद्ध वागलांत, आत्महत्त्येचा प्रयत्न करून, जगाविरुद्ध वागलांत. आतां, सुदीनचे प्रयत्न आणि आशा व्यर्थ ठरवून, तुम्हीं आपल्या प्रियकराच्या आयुष्याचा अंत करायला उठायचं, म्हणजे, स्वतः बरोबर दुसऱ्याचे—राणाजींच्या, एका कर्तबगार सरदाराचेहि प्राण घेणें नाहीं काय ? तुम्हाला तुमच्या सुखाकरितां म्हणून नव्हे, पण सुदीनकरितां जगून, लोकांचे वाग्बाण सहन करणं भाग आहे. इच्छेविरुद्ध मरायला तयार होऊन, पितृप्रेम जसं तुम्हीं प्रगट केलंत, तसंच इच्छेविरुद्ध जगून, तुम्हाला पतीप्रेम उज्ज्वल करणं भाग आहे.

**क्रांतिः**—पण मी त्यांच्याशीं विवाह करणं योग्य नाहीं.

**सुदीनः**—योग्य नसेल, तर नका करूं. पण त्याकरतां मेलं पाहिजे, असं कुणी सांगितलं आहे !

**क्रांतिः**—विवाह न करतां, मी त्यांच्या सहवासांत राहिलें तर—

**सुदीनः**—तर, तर काय ? जग नांव ठेवील. जगाच्या मताची, जगाच्या शासनाची, तुम्हाला इतकी भीति वाटते, तर असा कायदेभंगच तुम्हीं करायचा नव्हता.

**क्रांतिः**—जगाला मी भितें, असा त्याचा अर्थ नाहीं. एखाद्या तत्वाकरितां कायदेभंग केला, एखाद्या विशिष्ट मताकरितां झगडलं, तरी, कारण नसतां बेफामपणें वागणं, मला सम्मत नाहीं.

सुदीनः—कांहीं म्हणा, सुदीनशीं विवाह करणंच तुम्हाला प्राप्त आहे. खरं पहातां, सुदीन व तुम्ही, दोघंहि एकमेकांकडे पतीपत्नीच्या भावनेनं पहातां अहांत म्हणजे, आजच्च तुम्ही पतीपत्नी आहांत. जमलेल्या प्रेमसंबंधावर, लौकिकव्यवहाराकरितां तुम्हाला विवाहविधीचा शिक्का मारून घ्यायचा इतकंच! हृदयं एकमेकांनीं एकमेकांला दिल्यानंतर, उरली देव घेव, आणि उपाध्यांची साक्ष, जरूरीची वाटली, तरी इतकीशी महत्वाची नाहीं.

क्रांतिः—त्यांचं तुमचं कांहीं नातं आहे ?

सुदीनः—ते कोण ?

क्रांतिः—ज्यांच्याबद्दल तुम्ही इतकी उरस्फोड करतां ते !

सुदीनः—तुम्ही नांव घेत नाहीं वाटतं ?

क्रांतिः—होय.

सुदीनः—कां ? लाजतां कां ?

क्रांतिः—लाज आहे म्हणून ! शिवाय, मला नांव घेववत नाहीं याचं कारण, त्या नांवाचा विचार मनांत येतांच, मी गोंधळतें, आनंदानं मी अडखळतें.

पद ९.

**केवि वचनीं वदे प्रेम ती शीलवती। प्रेमी विचारा**
**मनामाजि झांकी ती ॥ ध्रु० ॥ धरि मौन ना दावि वाचें**
**वदेना। स्वमनांतरिच पाहि प्रियनाथ ललना ॥ १ ॥**

सुदीनः—एकंदरीत, तुमचं सुदीनवर बरंच प्रेम आहे तर ?

क्रांतिः—बरंच म्हणजे ? त्यांच्या विषयींच्या प्रेमानं व्यापलेल्या अंतःकरणांत, डोकाऊन पाहूं लागलें, तर माझी दृष्टी फिरते.

सुदीनः—हं ! ही दृष्टी फिरल्यामुळंच, तुम्हाला जग तुच्छ वाटूं लागलं होतं वाटतं ? आणि इतकं प्रेम असूनहि, सुदीनाला न भेटतां तुम्ही मरायला तयार झालांत—नव्हे मेलांत !

**क्रांतिः**—त्यांच्यावर प्रेम होतं, म्हणूनच मी मरायला सिद्ध झालें. आणि इतकं प्रेम होतं म्हणूनच मी त्यांना भेटलें नाहीं !

**सुदीनः**—मोठं चमत्कारिक कोडें आहे हें ! आपल्याला तर उलगडत नाहीं !

**क्रांतिः**—स्त्रीहृदयाशिवाय, अगर स्त्रीहृदयाची पारख असल्याशिवाय, असलीं कोडीं नाहीं उलगडायचीं ! हो पण तुम्ही त्यांचे कोण ?

**सुदीनः**—आम्ही होय ? आम्हीं त्यांचे हे !

**क्रांतिः**—हे म्हणजे काय ?

**सुदीनः**—ते म्हणजे काय ?

**क्रांतिः**—न कां सांगानात ! खरंच तुमचे आमच्यावर अनंत उपकार आहेत.

**सुदीनः**—उपकार कसचे ! आपल्या माणसाकरितां कुणीहि करील. प्रेमाकरितां मी विस्तवावरून चालत जाईन !

**क्रांतिः**—म्हणजे ?

**सुदीनः**—नाहीं, म्हटलं आपल्या प्रेमाकरितां मी काय करणार नाहीं ?

**क्रांतिः**—आणि तुह्मीं स्वतःला त्यांचे आप्त म्हणवतां ?

**सुदीनः**—आप्तच कां ? तुमच्यापुरता, तो मीच समजानात ! त्याच्या माझ्यांत विलक्षण साम्य आहे, असं तुम्ही परवांच म्हटलंत ?

**क्रांतिः**—परवां म्हटलं पण आज खास नाहीं !

**सुदीनः**—प्रेम करण्यानं मनुष्य लगेच वाईट ठरतो कीं काय ? मग, सुदीन अत्यंत नीच मनुष्य—

**क्रांतिः**—थांबा, कृपा करून, माझ्या आजारी स्थितीचा फायदा घेऊं नका ! तुमचा जीव घ्यायला, अगर स्वतःचा जीव द्यायला मला शक्ति नाहीं.

**सुदीनः**—( जवळ जाऊन ) माझा जीव घ्यायचा असेल, तर हा पहा मी तयार आहें.

**क्रांतिः**—दूर हो, विश्वासघातकी दुर्जना दूर हो !

**सुदीनः**—दुर्जन, सज्जनाप्रमाणं कसे वागणार ?

**क्रांतिः**—क्रांती, कशाला जगलीस ? पितृद्रोही क्रांती, आतां कुठं तुझ्या दैवलीलेला सुरुवात झाली आहे. क्रांती, तुझ्या चारित्र्याचे लचके, असल्या गिधाडांकरवीं तोडविण्यासाठीं तुझ्या पित्याला, छीः थूः च्या महापुरांत लोटण्यासाठीं आणि त्यांना प्रेमभंगाच्या आगींत जिवंत जाळण्यासाठीं तुला यमुनेनं बाहेर फेकली ? सुदीन सुदीन धांवा लौकर !

( बेशुद्ध होते. )

**सुदीनः**—( घाबरून ) क्रांती ! सावध हो. कसली भलती थट्टा सुचली मला ! क्रांती, लाडके सावध हो. ऐक, हा तुझा हतभागी सुदीन तुला हांक मारतो आहे. ( आंत जाऊन मडक्यांत पाणी नाहींसें पाहून पळत मडकें घेऊन जातो. )

**कज्जलेश्वरः**—( प्रवेशून ) आठ दिवस पायपिट केल्याचं सार्थक झालं. चंद्या वाटला तितका वेडा नाहीं. आमच्या सारख्यांना मूर्ख ठरविणारा महाठक आहे. इथं कुणी नाहीं तोंपर्यंत क्रांतीला पळवावी. रूढीराम अगर बद्रुद्दीन, यांना सुगावा लागला तर सारंच फसायचं ! ( वारा घालूं लागतो. )

**क्रांतिः**—( सावध होऊन पहात ) मी स्वप्नांत आहें काय ? मी भ्रमिष्ट झालें आहे का ?

**कज्जले०**—तुझा दास कज्जलेश्वर ! कृपा कर आणि घरीं चल. मामासाहेब—

**क्रांतिः**—बाबा ? बाबांचं काय ? हाय, तर मग मी जिवंत आहें. जीव जगवणं अवघड असेल, पण मरण हें त्याहूनहि अवघड आहे ? काय करूं ! कज्जलेश्वर सांगा ? बाबा, बाबा काय ?

कज्जले०—क्रांती, मामासाहेब मृत्युशय्येवर आहेत; आणि त्यांनीं सारखा तुझ्या नांवाचा जप चालविला आहे.

क्रांतिः—कज्जलेश्वर, मला पळवून नेण्यासाठीं रचलेला हा तुमचा डाव तर नाहीं? मी जिवंत आहें हें बाबांना काय माहीत?

कज्जलें०—म्हणजे? चंद्यानेंच हें त्यांना व मला सांगितलें. तो प्रथम सांगेनाच. पण मामासाहेबांनीं चालविलेला तो हृदयभेदक आक्रोश, कुणालाहि ऐकवेना! रडत रडत, चंदननं तुझा पत्ता सांगितला आणि त्याला व सुंदरला तिथंच बसवून मी ताबडतोब इथं आलों. क्रांती माझ्यावरील अविश्वासामुळं, तुझ्यासाठीं जगलेल्या पित्याला, तूं मृत्युसमयींसुद्धां न भेटण्याइतकी निष्ठुर आहेस काय?

क्रांतिः—बाबा! कायहो हे आपले हाल? काय करूं, हें खरं असेल का? कुठली तरी अज्ञात देवता प्रगट होऊन, या वार्तेचा सत्यपणा मला ऐकवील का? मग कांहींही होवो, मला गेलंच पाहिजे. पण कशी जाऊं? मला चालवत नाहीं! क्रांती, जन्मदाता पिता तिकडे मृत्युशय्येवर, तुझ्या नांवानें आक्रोश करीत असेल. नका नका बाबा तुमच्या अंतकालच्या हांका, मला इथून ऐकूं येतात. मानेभोंवतीं मृत्युपाश आवळत चालल्यामुळें, निर्बल देहाची चाललेली धडपड मला स्पष्ट दिसते आहे. काय करूं? बाबा, मी आलें. कज्जलेश्वर, मी आलें चला. ( कष्टानें उठते. )

कज्जले०—माझा हात धर.

क्रांतिः—कज्जलेश्वर, पायांत उभं राहयाची शक्ती नसली, तरी गडगडत मी घरापर्यंत जाईन, पण तुमचा हात धरायचं माझ्या नशीबीं नको यायला?

कज्जले०—प्रत्येक क्षण मोलाचा आहे. माझं ऐक! मी तुला नेतों. एरवीं मामासाहेबांचे प्राण——

क्रांतिः—नको, नको ती भेसुर कल्पना. ज्या हातांना स्पर्श करण्याचा विचार मनांत येतांच, मला आत्महत्त्या बरी वाटली, ज्याचं नांव

घेतांच, तिरस्कारानें आणि संतापानें माझं मस्तक फिरूं लागतं, त्याच कपटी मांगाला बिलगून, मला घर गांठावं लागणार? काय ही विधिघटना! क्रांती, कितीहि प्रयत्न केलेस तरी ही विटंबना चुकत नाहीं. या, कज्जलेश्वर, चला मला घेऊन! ( तो हळू हळू जवळ येतो. ) परमेश्वरा, माझ्या बाबांचं दर्शन होईपर्यंत, मला आणि त्यांना जिवंत ठेव. ( त्याचा हात लागतांच किळस येऊन मागें सरून. ) नको, पित्याचा मृत्यु समोर दिसत असूनहि, याला स्पर्श करूं द्यायची कल्पना मला सहन होत नाहीं. क्रांती, हीच तुझ्या कसोटीची वेळ आहे. कज्जलेश्वर, मी बेशुद्ध पडेपर्यंत मला चालूं द्या! पुढं मग काय होईल तें होवो. ( ती हात धरून उठते. दोन पावलें जातात, तोंच पाणी घेऊन सुदीन येतो व पाहून )

**सुदीनः**—( अविश्वासानें ) क्रांती! कज्जलेश्वर! मी काय पाहातों आहें? विलक्षण वाटणारे चमत्कार सुद्धां, केव्हां केव्हां किती साधेपणानं घडून येतात? बिचारी क्रांती, क्रांती! ( दोघें चमकून पहातात. )

**कज्जले०**—झाला घात झाला! पण नाहीं, मला वाटतं सुदीन!

**क्रांतिः**—कृपा करा आणि आम्हाला जाऊं द्या. आपल्याशीं भांडायला मला शक्ति नाहीं आणि वेळ नाहीं.

**सुदीनः**—( हात धरून ) क्रांति, तुला वेडतर लागलं नाहीं? हा कोण आहे हें तूं नीट पाहिलंस का?

**क्रांतिः**—तुमचाच भाऊबंद! उडदांत काळं गोरं काय पहायचं?

**सुदीनः**—म्हणजे? तूं स्वतःच्या इच्छेनें या अधमाबरोबर जातेस?

**क्रांतिः**—होय, त्यांच्या पायांवर पडून, न्या म्हणून त्यांना विनविलें.

**सुदीनः**—क्रांती, तुला कसल्या मोहिनीमंत्रानं यानं भुरळ पाडली! क्रांती माझं ऐक!

**क्रांतिः**—शक्य नाहीं, मला गेलं पाहिजे.

**सुदीनः**—सुदीनला काय वाटेल? त्याला मी काय सांगूं?

**क्रांतिः**—मला विसरा, माझ्यावर प्रेम असेल, तर त्या प्रेमाची शपथ, पुन्हां मला वांचविण्याकरितां, गावांत पाऊल टाकूं नका. आपलं मिलन परमेश्वराला पसंत नाहीं. ( जाऊं लागतात. )

**सुदीनः**—काय करूं! निराशेनं, संतापानं माझं देहभान नाहींसं होणारसं मला वाटूं लागलं आहे. क्रांती ! क्रांती ! जाऊं नकोस ! या विलक्षण हट्टानें, सुदीनच्या आयुष्याला तूं स्वतः बरोबर आग लावतेस ? त्यानं कसं जगावं ? तुला या नीचांच्या हातीं देऊन, त्यानं कसं मरावं ? क्रांती, मागुं फीर ? तुला सुदीनची शपथ आहे.

**क्रांतिः**—चला कज्जलेश्वर मला घेऊन ! माझ्याच्यानं हें ऐकवत नाहीं. मी वेडी होईन, मला घेऊन चला !

**सुदीनः**—( कज्जलेश्वराला धरून ) पाताळयंत्री पिशाच्च्या, तुला तरी मी जिवंत सोडीत नाहीं.

**क्रांतिः**—सोडा, त्यांना सोडा ! मी तुमच्या पायां पडतें. तुम्हाला अंतःकरण असेल, कधीं काळीं प्रेमाचं नुसतं त्याला वारं जरी लागून गेलं असेल तर त्यांना सोडा. प्रेमाकरितां मला सोडा. बाबा बाबा मी काय करूं !

**चंदनः**—( प्रवेशून—पाहून दचकून स्वगत ) अरेरे, सर्वस्वी घात झाला. या मांगाला कसा पत्ता लागला कुणाला ठाऊक ? ( सर्वांची नजर जाते )

**कज्जले॰**—झाला घात झाला. हरामखोरानं वैर साधलं !

**सुदीनः**—चंदन, तुझ्याक्रांतीला वांचव. ती त्या मांगाच्या तावडींत पुरी सांपडली आहे.

**क्रांतिः**—कोण ? चंदन ? सुंदरचा चंदन ? चंदन, बोल लवकर तूं कां आलास ? माझे बाबा कसे आहेत ? चंदनभाई, सांग, माझे प्राण कासावीस होताहेत रे ! ( कज्जलेश्वर जाऊं लागतो, सुदीन अडवतो. )

**चंदनः**—कोण दादासाहेब ? ठीक आहेत. त्यांना काय झालं आहे ? दोन तीन दिवसांत आपण काशीयात्रेला जाणार, असं आतांच त्यांनीं मला सांगितलं !

**कज्जले०**—हरामखोर !

**क्रांतिः**—खरं नां हें ? माझी शपथ ? सुंदरची शपथ ?

**चंदनः**—खरं म्हणजे ? क्रांतीताई, आपल्या गळ्या शपथ ! दादासाहेब खुशाल आहेत. आणि तुम्हाला ही भलती बातमी कुणी दिली ?

**क्रांतिः**—अहाहा, परमेश्वरा, तुझी लीला माझ्यासारख्या अज्ञ अबलेला काय कळणार ! दुःखाच्या खोल गर्तेतून, आनंदाच्या शिखरावर देवा, किती सहज मला नेऊन बसवलंस तूं. ( बसते. चंदन जवळ जातो. व तिला आंत नेतो. )

**कज्जले०**—काय करावं ? भयंकर गोंधळांतून पाऊलवाट काढणाऱ्या माझ्या बुद्धिमत्तेला, या आकस्मिक धक्क्यानं बेशुद्धि आली. ( वळून ) सभ्य गृहस्था, माझी वाट सोड ! हा कांहीं तरी भयंकर घोटाळा झाला आहे.

**सुदीनः**—हं खरं आहे !

**कज्जले०**—सुदीनच्या नादानं तूं भलत्याच फंदांत पडलेला आहेस. सुदीन राजद्रोही कायद्यानं बहिष्कृत केलेला, फरारी आहे हें ध्यानांत घेऊन, या तरुणीला तिच्या पित्याकडे पोंहोचती कर ! एरवीं निष्कारण संकटांत पडशील.

**सुदीनः**—कायरे, तुला अंतःकरण द्यायला देव विसरला, कीं तूंच तें तुझ्या नीच कृत्यांच्या आड येऊं नये, म्हणून काढून ठेऊन आला आहेस !

**कज्जले०**—निष्कारण भाषा वाढवीत बसणं, मला आवडत नाहीं.

**सुदीनः**—कमरेला तरवार बांधून सरदारीचीं वस्त्रं पांघरणाऱ्या बेरडा,

### पद १०

**खलांच्या खला सदा । आनंद विषयीच हो । लांछी कुलाला ॥ ध्रु० ॥ सरला बला दुर्बला भूला अधमा वरोनी अति नीचतेला । असुरी प्रयत्नें वृथा दाहिशी सत्त्वशीला ॥ १ ॥**

**कज्जले०**—खामोष, स्त्रियांच्या नाजुक दुःशब्दांना दिलेली सवलत तुझ्यासारख्या रानवटाला देणारा, अरसिक आणि भित्रा ठरेल. रस्ता सोड. एरवीं नाईलाज म्हणून, मला शस्त्र चालवावं लागेल.

**सुदीनः**—शोभे करितां तूं कमरेला लावलेल्या, तुझ्या फितुरीचं आणि देशद्रोहाचं बक्षिस म्हणून मिळालेल्या, त्या तलवारींत काय सामर्थ्य आहे असं तुला वाटतं ? काढ आपली तलवार ! तलवारीच्या जोरावर तूं आपली वाट काढ, नाहीं तर मी तरी तुझी वाट लावतों.

**कज्जले०**—वाटेल त्या मारेकऱ्याबरोबर, सुदीन सारख्या हीन, पळपुट्याच्या कवडी किंमतीच्या नोकराबरोबर भांडण्यासाठीं, ही शाही समशेर नाहीं.

**सुदीनः**—नाहीं ! खास नाहीं. स्वराज्याच्या सेवकांना झोंपेंत मारण्यासाठीं, रात्रीं बेरात्रीं, गरीब बाया बापड्यांच्या पावित्र्यांत घुसण्यासाठीं, मोंगल मसनदीला कुर्निसात करण्यासाठीं असलेली तरवार, लढण्याच्या कशी उपयोगीं पडेल !

**कज्जले०**—पाजी मनुष्या, तूं आहेस तरी कोण ? या तुझ्या उद्दामपणाबद्दल, तुझ्या मालकासह तुला जिवंत जाळलं जाईल हें ध्यानांत ठेव ! चंद्या, चल लवकर ! तुझ्या या निमक हरामीचा जाब द्यायला, तुला माझ्या बरोबर आलं पाहिजे.

**सुदीनः**—चंदन काय तुझ्या बापाचा नोकर ? तुझ्या सारख्या भ्याडाला मारणं किती अवघड आहे, हें आज माझ्या ध्यानांत आलं. इच्छा असूनहि, मी तुला मारूं शकत नाहीं. चंदनचा जाब नंतर घे. पण तुझ्या या हलकटपणाचा जाब घेतल्याशिवाय, मी तुला सोडीत नाहीं.

**कज्जले०**—( तुच्छतेनें हंसून ) तूं माझा जाब घेणार ? असल्या भुरट्या न्यायाधीशाला उत्तरं देत बसण्याइतका, मी मूर्ख आणि निरुद्योगी नाहीं.

**सुदीनः**—भुरटा न्यायाधीश ! प्रत्येक सरलमार्गी मनुष्य, तुझ्या सारख्याचा न्यायाधीश आहे. पाताळयंत्री कारस्थानानं, दुसऱ्यांच्या मुंड्या मुरगळून

बळकावलेल्या श्रीमंतीच्या जोरावर, सरकारी कायद्यांतून तूं निसटलास तरी, जनतेच्या दरबारांत, तूं घोर अपराधी आहेस ! प्रभेचा खून तूं केलास ! राणाजींच्या एकनिष्ठ सेवकांना, मदतीचं आमिष दाखवून, त्यांना रहिमतखांच्या कत्तलखान्यांत शेळयामेंढ्याप्रमाणं तोडविलंस ! क्रांतीला, बद्रुद्दीनच्या हातीं रहिमतखांच्या गोटांत पोंचविण्याचा प्रयत्न केलास ! पावला पावलाला पापाचे पर्वत उभारणारा नराधम तूं ! समाजाच्या शांततेवर, आप्तांच्या आयाबहिणींवर, स्वदेशाच्या सौभाग्यावर; स्वार्थाकरितां उठलेल्या नीचा, तुझा न्याय करायला न्यायाधीश कशाला पाहिजे ? हा तुझा न्यायाधीश, तुझ्यासमोर उभा आहे. चल, उपस आपली तलवार. पाहूं यानं तरी तुला चीड येते का ? ( मुस्कटांत मारतो. चंदन, क्रांती बाहेर येतात. )

**कज्जले०**—( चिडून तरवार उपसून ) कज्जलेश्वराच्या गालावर हात ? मी स्वप्नांत नाहीं ना ? बस्स. शांततेचं सोंग पुरे झालं ! कज्जलेश्वराच्या क्रोधाला आणि सूडाला आव्हान करणाऱ्या आत्मघातक्या, संभाळ !

**सुदीनः**—हं ! हं ! हं ! कज्जलेश्वर रागावले ! कज्जलेश्वर लढायला लागले ! ( लढतात तरवार पडून कज्जलेश्वर उभा राहतो. सुदीन आनंदानें त्याच्यावर झांप टाकणार तोंच क्रांती मध्यें येते. चंदन सुदीनला आवरतो ) क्रांती सोड, या अधमाला मारण्याची संधि पुन्हां येणार नाहीं. संतापानं माझं देहभान नाहींसं झालं आहे. रहिमतखांच्या गोटांत यानं मारविलेले माझे वीरमित्र " सूड " " सूड " म्हणून माझ्या कानांत सारखे ओरडत आहेत ! मी खुनी ठरलों, उद्यां शाही शिपायांनीं माझे तुकडे करून, रस्तोरस्तीं विसकटले, तरी मला पर्वा नाहीं. पण या अधमाच्या नरडीवर पाय देऊन, या तरवारीनं मी याचं उलटं काळीज, काळाच्या तोंडावर फेंकणार !

**क्रांतिः**—वेडे आहांत तुम्ही ! कुत्रं आपल्याला चावलं, म्हणून आपण का त्याला चावायचं ? तुम्हाला माझ्या गळ्याची शपथ आहे. तरवार म्यान करा ! कज्जलेश्वर, आपण चालूं लागा !



**कज्जलेश्वर**—कज्जलेश्वराच्या क्रोधाला आणि सूडाला आव्हान करणाऱ्या आत्मघातक्या, संभाळ ! [पान ६०].

**चंदनः**—सरदार साहेब, कज्जलेश्वरांचा अंत झालेला पहाण्यापेक्षां, मी आत्मत्याग करीन. कारण ते या जगांतून गेले, तर परमेश्वरी सृष्टीतलं वैचित्र्य नाहींसं होईल, आयुष्य नीरस होईल, वीरांच्या तलवारीला काम राहणार नाहीं.

**कज्जले०**—काय करूं ! काय करूं !

**सुदीनः**—कज्जलेश्वर, या चंदनच्या पुण्याईनं तुझा जीव वांचला हें ध्यानांत ठेव. त्याच्या एका केंसाला धक्का लागला, तर ही तरवार एका क्षणाचाहि विलंब न लावतां, तुझं हृदय फोडून निघून जाईल. जा. शक्य तर शहाणा हो ! ( कज्जलेश्वर जातो. )

**क्रांतिः**—( सुदीनला जवळ बोलावून, त्याचा गुप्त वेष काढून, प्रेमभरानें पाहून ) हें कपट बरं वाटलं ना ?

**सुदीनः**—चंदन, काय गाढव आहेसरे !

**चंदनः**—काय करूं ! या औषधाशिवाय त्यांच्या हातापायांत जीव यायचं चिन्ह दिसेना म्हणून दिलं झालं हें बातमीचं चूर्ण !

**क्रांति०**—म्हणजे माझ्या तोंडून भलभलतं ऐकायचं होतं वाटतं ? चला बोलूं नका माझ्याशीं !

**सुदीनः**—पण तूं तरी बोलशील कीं नाहीं ?

**चंदनः**—बरं आहे, क्रांतीताई, येतों मी. या खवीसावर मला डोळा ठेवला पाहिजे. आणि आतां तुम्हीहि मुक्काम हलवा येथून !

**सुदीनः**—भांडणं लावून चाललास होय ? पण तूं कशाला जातोस त्या आगींत ?

**चंदनः**—माझ्याबद्दल काळजी करूं नका ! मी बरोबर त्याला कसा आडकवतों पहा जाळ्यांत. येतों क्रांतीताई मी ?

**सुदीनः**—मीहि हा इतक्यांतच आलों हं ! तुझा दिलरुबा घेऊन येतों.

**क्रांतिः**—एकदां सांगितलं नां, माझ्याशीं बोलूं नका म्हणून ?

## पद ११.

ना दावा वदना । काय न छळिता शंका मना ।
उगाच पिडित दिना जनां ॥ ध्रु० ॥ अदय घातें मना ।
रडवि प्रेम ना फसवि स्वजनां । नच सरल रीति
रुचेच ना ॥ १ ॥

सुदीनः—म्हणजे इत उत्तर मुका का ?

क्रांतिः—चंदन, एकदां सुंदरला मला भेटीवरे ?

चंदनः—बरं आहे क्रांतीताई, तीहि सारखी मागं लागली आहे माझ्या !

सुदीनः—नाहीं तर ती कुणाच्या मागं लागणार ? ऐकलंस का ? ( क्रांती स्वस्थ रहाते. ) चंदन, अरे आमचं हें असं मुक्यानं आयुष्य कसं निघायचं बुवा ?

चंदनः—नवसाशिवाय देव पावला म्हणायचा तुम्हाला ?

क्रांतिः—चंदनभाई, वहिणीची थट्टा करायची होयरे !

चंदनः—मी काय केलं क्रांतीताई ? हेच पहा कीं काय बोलताहेत !

क्रांतिः—त्यांचं काय ऐकतोस तूं !

सुदीनः—चंदन, चल मला लवकर परत आलं पाहिजे. राणाजीकडे दूत पाठवायचा आहे मला, जरूरीचीं पत्रं आहेत; गेलीं पाहिजेत वेळेवर ! ( जाऊं लागतात, क्रांती पहाते, तो नजर चुकवितो. सुदीन अगदीं दूर जाऊं लागतांच. )

क्रांतिः—चंदनभाई, त्यांना म्हणावं, लवकर या. मी एकटी कशी राहूं इथं !

चंदनः—( परत येऊन ) बरं तर क्रांतीताई, ते परत येईपर्यंत मीच थांबतों !

सुदीनः—चंदन हा मी आलोंच इतक्यांत !

क्रांतिः—( मान फिरवून ) वाटेल तेव्हां या ! इतकी घाई नाहीं. ( सुदीन हंसत हंसत जातो. ) चंदनभाई, किती प्रेमळ तूं ! माझी सुंदर

खरंच भाग्याची ! चंदन, थोड्याच वेळांत कितीरे आकस्मिक घटना घडून आल्या ह्या ? चंदन, तो देव दयाळू आहे.

चंदनः—खरंच, ताई तो दयाळू आहे.

कांतिः—दीनदयाळ परमेश्वरा, सुखाच्या अगर दुःखाच्या तीव्रतेनंतर तुझ्या कृपेचं कौतुक आठवणार नाहीं, असं हृदय असेल काय ?

## पद १२.

**गोपिका मोहना । सुरमुनि अखिल जग पालका देवा ॥ ध्रु० ॥ गात ही तव गुणा । नत पदीं अन्यना प्रार्थना । तव कृपा पसरि तव दया दावी मोहना ॥१॥**

( पडदा. )

---

## प्रवेश ३ रा.

स्थलः—रस्ता. ( रूढीराम व बद्रुद्दीन बोलत येतात. )

बद्रु०—रूढीराम, तुम लोक क्या करते है मुझे मालुम नहीं होता. वो लडकी जिंदी है या नहीं ? और जिंदी नही होगी, तो आप लोक, मुझे यहां रोकते क्यौं ? मुझे जाने दो.

रूढीरामः—खांसाहेब, रात्रीचा दिवस करून, आम्हीं शोध करतों आहोंतना तिचा ! ती जिवंत नसेल, तर आम्हीं काय तिला स्वर्गांतून आणून द्यावी ?

बद्रु०—मगर वुसको लानेके लिये, तुम लोगोको, जन्नदमे कौन छोडेगा ? तुम्हारा रास्ता जहन्नम !

रूढी०—अहो कसला जन्नद आणि जहान्नम ! कल्पना आहेत साऱ्या. पण सरदारसाहेबांचा कुठं पत्ता नाहीं ? ते रात्रंदिवस, जातीनं आजू-

बाजूची रानं पालथीं घालताहेत. पाहिलंत कज्जेश्वर सुद्धां किती झटतात तें!

बद्रु०--कुछ मेहेरबानी नहीं करते? आजतक, उस्कू जाहागीर कितनी मिळी? देहलीमे, खांसाहेब उनको कितने चाहते हैं. यार, मै तो आंखोंसे देखा, खांसाहेब उनको खानेको, साथ लेके बैठते है.

रूढी०--बघा, नाहीं तर आमचं नशींब!

बद्रु०—रूढीरामजी, तुम्हाराभी वख्त आयेगा! ये ज्ञातभैरवके लड-कीका काम हो जाताथा, तो फारन मै तुम्हे देहली तरफ ले जाता था.

रूढी०—माझीहि तीच ईच्छा होती हो! पण त्या चांडाळणीनें ऐन-वेळीं जीव देऊन, माझा घात केला. स्वतः नाक कापून घेऊन, दुसऱ्याला अपशकुन करणारी ती! अहाहा ती जिवंत असती—

बद्रु०—तो फिर क्या होताथा रूढीराम?

रूढी०—क्या होता था? अहो तिला, या या हातांनीं भररस्त्यांतून फरफरत, खां साहेबांच्या पायांवर टाकली असती. पण करणार काय!

बद्रु०--रूढीराम, तुम्हारा कलेजा तो और है भाई! खुदा जाने तुम कैसे लोग है! ( चंदन गोसाव्याच्या वेषांत येतो. )

चंदनः--खुदाला तरी काय माहित असणार खां साहेब! अहो त्याला सुद्धां भ्रम पडायचा कीं, ही आपलीच कृति काय म्हणून!

रूढी०—खां साहेब, या तुमच्या चंद्याला बजावून ठेवा. कवडि क्किंमतीचा नौकर, वाटेल तसं बोलूं लागला तर आमची गावांत काय क्किंमत राहणार!

चंदनः—पण रहायला, अगोदर किंमत असली पाहिजे ना?

रूढी०—खां साहेब, पहा हं! तुमच्या आधारावर, फारच शेफारलीं तो.

बद्रु०—चंद्या, साला जबान रोक! क्या बकता हैतूं?

चंदनः—तसं नव्हे खांसाहेब, यांच्यासारख्या मोठ्या माणसांची किंमत आपण जाणणार. इथे या गांवात यांची किंमत कोण करणार ?

बड्ड०—हां सच बात है रूढीरामजी, चंद्या ठीक कहता है !

रूढी०—पण नोकरांनीं मध्यें बोलणं बरं नव्हे खाँसाहेब ?

बड्ड०—मगर वो हमारा नौकर है !

चंदनः—काय समजलांत रूढीरामजी ? मी खांसाहेबांचा नोकर आहें. असा तसा नाहीं, दररोज चारसहा लाथा खाणारा. जातगोत, धर्म, सर्व त्यांच्याकरितां विसरलेला नोकर आहें मी ! माझी योग्यता, राणा प्रतापसिंहाच्या स्वतंत्र सरदारालाहि नाहीं.

बड्ड०—बराबर ! बराबर रूढी रामजी, चंद्या उमदा आदमी है.

रूढी०—नाहीं, खांसाहेबांचा तो आवडता नोकर आहे तें ठीकच आहे. पण त्याचं तोंड जरा आवरायला सांगा ! बरं, काय चंदोबा, लागला का कांहीं पत्ता ?

चंदनः—( स्वगत ) त्या हरामखोराची आणि यांची भेट झाली नाहीं वाटतं अद्याप ! तो काय सांगतो तें ऐकून, आपण उत्तर द्यावं. (उघड) अद्याप तर कांहीं नाहीं. या गोसाव्याच्या दाढी मिशा लावून आणि अंगाला राख माखून, फिरतों आहें वणवण ! सरदार साहेब भेटले होते मला.

रूढी०—मग आतां कुठं आहेत ते ?

चंदनः—म्हणजे ? ते तर मघांच पुढं आले ! भेटले नाहींत का ? मला वाटतं असतील घरींच !

बड्ड०—चंद्या, तलासमे रेहेना. ( बाजूस. ) कुछ पत्ता मिल गया, तो फौरन मुझे खबर देना. ये दोनोका मुझे शक् आता है !

चंदनः—जरूर धनीसाहेब, मी सारखा त्याच कामावर फिरतों आहें.

रूढी०—( स्वगत ) काय करूं ! हा पागल बड्डा जर याच्या मुठींत नसता, तर या चंद्याचं मी आणि सरदारसाहेबांनीं केव्हांच चंदन केलं

असतं. पण काय करणार ? ( उ. ) चला खांसाहेब. तरदारसाहेबांची काय बातमी आहे ती तरी कळेल !

**बद्रु०**—चंद्या, रातको मुझे मिलना, भूलना नहीं.

**चंदनः**—जी हुजूर. ( दोघे जातात. ) या बद्रुद्दीनचा माझ्यावर कल्पनातीत विश्वास आहे म्हणून बरं, नाहीं तर या दोघां गिधाडानीं माझा फराळ केला असता ? कज्जलेश्वर, सारा अपमान विसरून मला आपल्या बाजूला ओढण्याचा प्रयत्न करील. आपणहि ठकास महाठक असाच डाव टाकला पाहिजे ! अरेच्या, चंद्राच्या आजुबाजूला चांदणी असायचीच ! आतां अवेळीं उगवल्यामुळं निस्तेज दिसते. पण चांदणी आहे ती ! ( कपडे साफसूफ करून उभा रहातो. सुंदर घागर घेऊन येते. )

**सुंदरः**—काय मेलं, सतरादां सांगितलं असेल, मला एकदां क्रांतीला भेटवा. पण हजार सबबी ! आज मध्यरात्र झाली तरी मी क्रांतीकडे गेल्याशिवाय रहावयाची नाहीं !

**चंदनः**—माई, बुवाला जरा पानी पाजते ?

**सुंदरः**—तुझ्यासारख्या उडाणटप्पूला पाणी पाजायला असंच कोणीतरी मिळायचं ! पाजतें हं पाणी तुला ! फुकटखाऊ—

**चंदनः**—माई, आम्ही फुकट साधू नाहीं झाला. आम्ही भूतभविष्य जानते. पाहूं तुझा हात !

**सुंदरः**—दाखवितें हं तुला हात ! अरे, अशी राख डोक्यांत घातल्यानं जर भूतभविष्य कळतं, तर आम्हीं तरी भविष्य कां सांगू नये ? चूल फुंकून फुंकून आमच्या डोक्यांत, टोपलीभर राख जाते दररोज !

**चंदनः**—माई, झूट ठरेल तर ये झोळी देल तुला !

**सुंदरः**—होय ! अडकीव कीं माझ्या गळ्यांत, म्हणजे सुटलास एकदांचा ! बरं, पहा हात ! पण खरं सांग हं !

**चंदनः**—खरा सांगेल ! झूट ठरेल तर कान कापून देल !

सुंदरः—कशाला कापतोस बाबा! उगीच तुझ्या चेहऱ्याची शोभा जायची आणि जात ओळखायला अडचण पडायची!

चंदनः—( स्व. ) अद्याप मला हिनें ओळखलं नाहीं, तेव्हां कानावरून जात ओळखायची हिची कीं माझी? ( उघड. ) माई, तुजा नशिबांत—

सुंदरः—हात पहातोस, कीं चेहरा निरखतोस? अरे, हात नशिबाला लाऊन का बसविणार आहेस तूं मला?

चंदनः—जरा सुन लेव. तुमचा लग्न लवकर होतो. नवरा चांगला मिळतो.

सुंदरः—होय! अगदीं खरं! चांगलेच आहेत ते! पुढं पुढं सांग पाहूं?

चंदनः—पण तुम्हांला सवत आहे माई!

सुंदरः—आग लागली तुझ्या ज्योतिष्याला! मेल्या, मला सवत असायला, मी काय कुरुप आहें कीं म्हातारी आहें? नीट बघ आणि सांग!

चंदनः—माई, मी काय करूं? तुमचा भविष्य तसा सांगते.

सुंदरः—तर! तर! तुझं भविष्य सुद्धां सांगतं तुझ्या दोन थोबाडींत द्याव्या म्हणून! लग्नाआधींच माझ्या उरावर सवत नाचविणार तूं? बघ! सांग नाहीं म्हणून? नाहींतर मी जीव देईन!

चंदनः—माई, आम्ही कसा खोटा सांगेल?

सुंदरः—सांग! कोण फिर्याद करतंय तुझ्यावर खोटं सांगतोस म्हणून? तुला मापटंभर तांदूळ देतें, पण सांग मला सवत नाहीं म्हणून.

चंदनः—हां, तसा असेल तर बदलेल थोडा! ( हात पाहून ) माई, तुमाला दोन मुलगे आहेत.

सुंदरः—आणि मुलगी नाहीं का एखादी? एखादी मुलगी असावी!

चंदनः—हाय, एक छोकरीबी हाय!

सुंदरः—चल, मोठा आलाय ज्योतिषी! मेला आपला मी विचारीन तं आहेच म्हणतो! जातोस का आतां मुकाट्यानं! मघापासून पहातें आहें तुझा चावटपणा! तुला वाटलं, सांपडली बिचारी, लुबाडावी चांगली.

चालता हो इथून! मापटंभर तांदळानं, याचं भूतभविष्य भूतासारखं नाचायला लागलं! मेले भीक मागतात, ती तरी प्रामाणिकपणानं मागावी? मला भूतच येतंय, मला भविष्यच माहित आहे; मला कर्ण पिशाच्च सहाय्य आहे. मला देवच भेटला! ढोंगी मुलखाचे! चल चालता हो.

**चंदनः**—माई, मापटाभर चावल—

**सुंदरः**—तोंड धुवून ये नदीवरून!

**चंदनः**—माई जरा पानी तो—

**सुंदरः**—पाणीसुद्धां मागूं द्यायची नाहीं मी! ( जाऊं लागते )

**चंदनः**—अहाहा! काय पण अक्कल! प्रत्यक्ष माझी ओळख पटली नाहीं तुला? ( दाढी मिशा काढतो. )

**सुंदरः**—कोण? तुम्ही का ते? अहो, संसाराआधींच संन्यास घ्यायची कां घाई झाली तुम्हाला? सोंग म्हणावं तर शिमगाहि लांब आहे? इतका का कंटाळा आला तुम्हाला माझा?

**चंदनः**—खुळीच आहे! अग हा सुदीनच्या पाळतीवर राहण्याचा गुप्तवेष आहे.

**सुंदरः**—अहो गुप्त वेष घ्यायचा होता तर, माझीं लुगडीं होतीं कीं घरांत! रात्रभर उकिरड्यांत लोळून आल्यासारखी, हीं राख कशाला फासायला हवी होती? चला, उतरा तें ध्यान लवकर! बाई! बाई! शर्थ केलीत हो!

**चंदनः**—अग, गोसाव्याच्या सोंगाला, भांडवल आणि अक्कल बेताची लागते. पण तुझा, बायकोचा वेष घ्यायचा, म्हणजे अगोदर तुमचं तें नटणं, मुरडणं, लाजणं आणि ते हावभाव शिकायला मला एखाद्या वस्तादाकडे, आदा करायची तालीम घेतली पाहिजे. आणि तें बरोबर झालं म्हणजे ठीक! नाहीं तर, फाजिल हावभावानें मी शिखंडीच्या रिकाम्या पडलेल्या गादीचा वारस ठरायचा! गुप्तहेराचं काम आलं, म्हणजे अशीं सोंगं घ्यावीं लागतात; समजलीस.

**सुंदरः**—अहो, सोंगं घ्यावीं लागत असतील, पण स्वतःच्या बायकांना ' आई, माई ' म्हणायचं सोंग, मी आजच पहातें आहें !

**चंदनः**—खुळी आहेस तूं ! अग तुझं लग्न झालं नाहीं म्हणून ! बायकोच्या कचाट्यांत सांपडलेले किती तरी नवरे, ' आई माई ' म्हणूनच दिवस काढताहेत जगांत !

**सुंदरः**—पण कित्येक, दिवस काढण्याऐवजीं, आई माईहि काढतात ?

**चंदनः**—ही त्यांची कृतज्ञता आहे. मुलीचं दान करणाऱ्या आईबद्दल कृतज्ञतेनं उल्लेख करणं योग्य आहे ?

**सुंदरः**—म्हणजे ? माझ्याशीं लग्न झाल्यावर तुम्हींसुद्धा माझ्या आईचा असाच का उद्धार करणार ?

**चंदनः**—आपण थोडेच पुण्यवान् आहोंत. आणि उद्धार करायचाच झाला, तर तो एका पिढी पुरताच कां ? मी तुझ्या बेचाळीस पिढ्यांचा उद्धार करून मोकळा होईन !

**सुंदरः**—राहूं द्या, किती वाद घालावा ? आईचं तोंड चालू झालं असेल. जा नदीवर आणि धुवून या ती राख ! माणसानं तोंड तरी किती वाजवावं बाई ! अगबाई, पण तो पहा. तो मांग येतो आहे ! मी जातें. लवकर या ! ( जाते. )

**चंदनः**—मला पहातांच, बद्रुद्दीन आणि रूढीराम यांना सोडून, हा इकडे कां आला ? ( बाजूला जातो )

**कज्जले०**—( येतो व चंदाला पाहून स्वगत ) चंद्यानं, क्रांतीचा सुगावा लागल्याची बातमी अद्याप बद्रुद्दीनाला दिली नाहीं, आणि तो देणारहि नाहीं. मी माझ्या मतलबासाठीं, आणि चंद्या क्रांतीच्या रक्षणाकरितां तोंड बंदच ठेवणार ? या चंद्राची मी केव्हांच चांदरात केली असती. पण बद्रुद्दीनची ब्याद जाईपर्यंत, तें इष्ट नाहीं. या चंद्याला चुचकारून पहावा निदान. आज रात्रीचा बेत पार पडेपर्यंत, त्याला कुठं तरी अडक-

वून ठेवला पाहिजे. नाहीं तर गेल्या खेपेप्रमाणं, बदमीष ऐन वेळीं पिशाच्चासारखा प्रगट व्हायचा! (प्रगट) चंद्या, (चंदन येतो) थोड्या वेळानें माझी वाड्यांत भेट घे! जरूरीचं आणि तुझ्या फायद्याचं काम आहे. जा तूं!

**चंदनः**—(स्वगत) मला वाटलंच, हा असा कांहीं तरी डाव टाकील म्हणून. मलाहि सावधच राहिलं पाहिजे. (चंदन जातो.)

**कज्जले०**—चंद्यासारख्या, यःकश्चित् हमालानं जर माझ्यावर मात केली, सुदीन सारख्या राकट रामोशानं, जर क्रांतीला पटकावली आणि क्रांती जर माझ्या डोळ्यांदेखत, सुदीनचा संसार करूं लागली, तर माझी अफाट संपत्ति, माझा आजपर्यंतचा दुष्कर्मयोग, आजपर्यंत मी भल्या बुऱ्या मार्गानं मिळविलेला शाही सन्मान, यांची काय प्रतिष्ठा राहिली? आणि कज्जलेश्वरानं, जगण्याची तरी काय अवश्यकता राहिली? या कज्जलेश्वराच्या गालावर हात? मला आश्चर्य वाटतं, मी संतापानं वेडा कसा झालों नाहीं? याचा सूड घेतल्याशिवाय, मी वेडा होणार नाहीं! त्या सुदीनच्या शरीराचे, तापलेल्या सांडसानं लचके काढून, कोल्ह्या-कुत्र्यांकडून खावविण्यापूर्वी, क्रांतीला या कज्जलेश्वराची बटिक करण्यापूर्वींच, मी कसा वेडा होईन? सुदीनचं मरण, आणि क्रांतीचं हरण, हीं रात्रीचा पृथ्वीवरील बुरखा दूर होण्यापूर्वींच घडून येतील—नव्हे मी घडवून आणीन. (जातो.)

(पडदा)

---

## प्रवेश ४ था.

**स्थलः**—सुदीनची झोंपडी. रात्र.

**पात्रेः**—क्रांती, सुदीन (सुदीन दिलरुबा घेऊन तारा जमवीत आहे. झोपडीच्या पुढील बाजूस क्रांती बाजूला बसून पहात आहे.)

**सुदीनः**—बाबा, सुरवातीलाच सरळ, सरळ गोड बोलतास, तर माझ्या हातांना आणि तुझ्या कानाला इतका त्रास कां होता?

**क्रांतिः**—चुकतं तें इथंच ! असे जोर जोरानं कान पिळल्यावर, त्यानं दुःखानं रडवें सूर काढूं नये, तर करावं तरी काय ?

**सुदीनः**—तुझ्या सारखीच्या नाजुक हातांत जावं. घे तूंच ! माझ्या नांवानं त्यानं रडायला नको. ( देतो )

**क्रांतिः**—मला माहितच होतं तें. पण हें असं, पर्यायानं सुचविण्यापेक्षां, स्पष्ट " गाऊन दाखीव " म्हटलं असतंत तर ?

**सुदीनः**—तुला अद्याप सरळ बसतां येत नाहीं, आणि गा कसं म्हणायचं ?

**क्रांतिः**—तेंही खरंच ! पण आतां मलाहि आली आहे लहर ! पहातें प्रयत्न करून !

**सुदीनः**—अशी, भलत्यावेळीं लहर आली नाहीं, तर तूं कवयित्री कसली ? ठीक, चालूं द्या !

**क्रांतिः**—काय बरं गाऊं मी ?

## पद १३.

**कमलावरा ही बालिका । नित नम्र पायीं उदार**
**सुमंगल । दीन जनांतर रंजना ॥ ध्रु० ॥ विपदा हरोनि**
**दिधलें यशाला । अरि वधुनि, तारिशी सत्यभजका ॥१॥**

**भिल्लः**—( आंतून ओरडतो. ) " गुलाम "

**सुदीनः**—( उठून ) " स्वतंत्र. "

**भिल्लः**—" हळदी घाट "

**सुदीनः**—" समशीर "

**भिल्लः**—( येऊन मुजरा करून ) हुकूम. ( पत्र देतो. )

**सुदीनः**—" शिरसावंद्य "

**भिल्लः**—" जयशंकर "

**सुदीनः**—" जय भारत " ( भिल्ल त्वरेनें निघून जातो. )

**क्रांतिः**—काय तें ?

**सुदीनः**—राणाजींचा हुकूम ! युद्धाची सूचना ! सुडाचा संदेश !

( पत्र वाचतो. )

**क्रांतिः**—म्हणजे ? ( सुदीन पत्र वाचून क्रांतीकडे पाहून खिन्न होतो. ) काय झालं ? तुम्हीं असे शून्य दृष्टीनं, आकाशांत काय पहातां ?

**सुदीनः**—जन्मभूमीचं आकाशाच्या आरशांत दिसणारं प्रतिबिंब !

**क्रांतिः**—अगबाई ! तुमचे डोळे कशानं भरून आले ?

**सुदीनः**—हृदयांत कोंडलेला अपमान आणि दुःख, या वार्तेनं ढवळून, नेत्रांवाटे वाहूं लागणारसं दिसतं. क्रांती, देशोधडीला लागलेल्या लहानमोठ्या सरदारांना, वनवासी राणाजींनीं, तातडीनं हजर होण्यासाठीं दिलेला हा हुकूम आहे. क्रांती, महाराणा प्रतापसिंहाच्या या रणगर्जनेनं, हिंदु जागे झाले नाहींत, या रणभेरीच्या गंभीर गडगडाटानं, हिंदूंची स्वातंत्र्येच्छा, कडाडून सेलीमच्या सैन्यावर तुटून पडली नाहीं, तर—तर राणाजींच्या प्राणाबरोबर, त्यांचे मूठभर सेवक आणि आर्यभूमीचं सौभाग्य, मोंगल साम्राज्यसमुद्रांत कायमचं गाडलं जाईल ! क्रांती, मला ताबडतोब निघालं पाहिजे, पण तुझं—

**क्रांतिः**—अतिशय शहाणीं माणसं, स्त्रियांच्या सहवासांत वेड्यासारखीं करूं लागतात म्हणतात, तें खरंच; खोटं नाहीं. क्रांतीवरचे डोळे काढून, जन्मभूमीच स्वरूप डोळ्यांपुढं आणा. शोकानं आणि लज्जेनं व्याकुल झालेली तिची मुद्रा, दिसते का तुम्हाला ? स्वातंत्र्याचा भरजरी शालू, ठिकठिकाणीं फाटल्यामुळं लज्जा रक्षण सुद्धां अशक्य झालेल्या, आपल्या आईकडे पहा ! स्वतःच्याच पोराबाळांच्या आत्मघातकी फितुरीनं, तिच्या जिवाचा कसा संताप होत असेल, याची कल्पना करा !

**सुदीनः**—क्रांती, प्रत्येक तरुणाला, उसळत्या उत्साहानं कर्तव्यतत्पर बनविणारी, तुझ्यासारखी देवता लाभती तर—

**क्रांतिः**—खास लाभतील ! पण स्त्रिया म्हणजे, व्यवहाराच्या सोयीसाठीं अगदीं स्पष्टच बोलायचं म्हणजे, मनोविकारांच्या समाधानासाठीं, देतील त्या वेतनावर मिळणाऱ्या मोलकरणी, ही ज्यांच्या बद्दलची भावना, त्यांच्या मतांची आणि उपदेशाची जरूरी आणि पर्वा असणार कशी ? पण हा विषय आतां नको ! आपण अगोदर निघा पाहूं ?

**सुदीनः**—क्रांती, पण इथं तुझ्याजवळ कोण ? घोटभर पाण्याचीहि पंचाईत होणार ! हे लांडगे, तुला फाडून खातील !

**क्रांतिः**—खरं ? खाऊं देत कीं ! पण या क्रांतीसारख्या अनेक कन्यांना जन्म देणाऱ्या मातृभूमीवर तिकडे किती लांडगे तुटून पडले आहेत हें ध्यानांत आहे का ? स्वातंत्र्याची ज्योत जागृत ठेवणाऱ्या त्या नरसिंहाजवळ कोणी नाहीं, याचा तुम्हीं विचार केला आहे का ? बायकापोरांच्या मोहानें कर्तव्यशून्य बनणाऱ्या दुर्बलांना, बायकापोरांचं सुख तरी कायमपणें कसं लाभेल ?

**सुदीनः**—क्रांती, मी जाणार हें निश्चित ! पण या तुझ्या उपदेशानेंहि माझी तुझ्या बद्दलची चिंता दूर होत नाहीं.

## पद १४.

**सचिंतसें निराश हो स्मरोनिया। देई कष्ट माया ॥ ध्रु० ॥ मनीं वसे भय उपजवीत अति। अशुभ शंकि घटना या पाडिति ॥ संताप दे मना विचार हा ॥ १ ॥**

तुझं रक्षण कसं होईल ?

**क्रांतिः**—देशाचं रक्षण करणारे वीर, त्यांतील अबलांचे रक्षक आपोआप ठरतात. शीलसंपन्न स्त्री, मग ती शरीरानें कितीहि दुर्बल असो आत्मतेजाच्या बलावर, ती समर्थ असते.

**सुदीनः**—क्रांती (आश्चर्यमग्न) युद्धांत मी मारला गेलों तर ?

**क्रांतिः**—तर काय ? त्या बंधनापलिकडच्या जगांत, त्या सत् चित् आनंदमय सृष्टींत, आपलं चिरमीलन होईल. परमेश्वर आपला उपाध्याय होईल. प्रेमपावित्र्यानं प्रशांत अशा दिव्य मांगल्याचे आपण कायमचे रहिवाशी होऊं !

**सुदीनः**—क्रांती ! अहाहा कुठून हें ज्ञान पैदा केलंस ?

**क्रांतिः**—आजच्या हिंदूच्या महा पुण्याईनें, त्यांच्या पूर्वजांनीं त्यांच्याकरितां, ज्ञानाचा अथांग समुद्र पसरून ठेविला आहे. त्या जगमान्य भगवद्गीतेच्या ज्ञानसमुद्रांतील, माझ्या हस्तस्पर्शानं गढूळ झालेला हा एक थेंब आहे.

**सुदीनः**—पण त्या एका थेंबानें, गोंधळलेल्या भावना स्थिर होतात. क्रांती, येतों मी ! तुझं रक्षण मी कोण आणि काय करणार ? माझ्यासारख्यांचें रक्षण करणारी देवता तूं ! राणाजींच्या आज्ञेनें, जन्मभूमीच्या सेवेसाठीं, रणमैदानावर चाललेल्या या सुदीनला आशीर्वाद दे. राणाजींचा कर्मयोग आणि स्वदेशप्रेमी वीरांचं आत्मदान सफल होऊन, स्वातंत्र्याची ज्योत प्रज्वलित राहो ?

**क्रांतिः**—कर्तबगारीला दैवाची जोड मिळते. आपली प्रार्थना त्या विश्वपालकाच्या चरणीं रुजू होवो !

**सुदीनः**—क्रांती, क्रांती येतों मी.

**क्रांतिः**—परमेश्वर आपलं रक्षण करो. आपण जिवंत परत याल तर विजयी कर्तबगाराचं मी आनंदानें स्वागत करीन. लढाईत आपलं बरं वाईट झालं तर—

**सुदीनः**—पण क्रांती, तुला कळेल का तें ?

**क्रांतिः**—पवित्र प्रेम अंतर्ज्ञानी असतें. आत्मा देहाचा त्याग करून जातानां, मला हांक मारल्याखेरीज जाणार नाहीं.

**सुदीनः**—येतों मी ! ( अभिवादन [illegible] तर—[illegible]. )

क्रांतिः—( नमस्कार करून ) या ! विश्वपालक आपला योग्य उपयोग करो. बुद्धीचं तत्त्वज्ञान मन अद्याप ऐकेना. सुदीन—

## पद १५.

**वचनें बोललें वदुनि विषाद ना गेला ॥ ध्रु० ॥ बुद्धि**
**कां दुःख नेई जें प्रणयिनी ही साहे । कां, भासत**
**भारी । दाहें अंतरीं भागलें । वदणार कुणाला बालें ॥१॥**

सुदिननां कर्तव्यनिष्ठुर बनविणारी बुद्धी, क्रांतीच्या मनाचं मात्र समाधान करीत नाहीं. पण स्त्रीहृदय बुद्धीवर जगत नसून भावनांवर पोसलं जात असतं. बुद्धि सांत्वन करील पण हृदय रडल्याशिवाय कसं राहील ?

( आंत जाते. )

ज्ञातिभैरव—( येऊन ) सुंदरिनं खरं सांगितलं ! काय ही इची अवस्था. भलत्या हट्टानं बेफाम बनलेले बाप, पोटच्या गोळ्याचे कसे हाल करतात ते हे असे !

## पद १६.

**भासे विहित स्वहस्तें घात । देई जिवा प्रभु चरणीं**
**थारा । सुख ने कन्याघात ॥ ध्रु० ॥ गमत शून्य, मन**
**होत विरागी । पथदर्शन हो शांत ॥ १ ॥**

मुलं झालीं तरी त्यांना बुद्धि आहे, भावना आहेत आणि व्यवहारज्ञान नसलं तरी सत्यज्ञान होणं शक्य आहे एवढा विचार तरी आम्हां म्हाताऱ्यांना कां सुचूं नये ? वानप्रस्थाश्रमाचा स्वीकार करण्याची ज्यांची वेळ, ते म्हातारपणीं अंधत्व आलं तरी, द्रव्यनिधी चांचपून पहाण्यापासून, तों रस्त्यावरचं बेवारशी शेण गोळा करण्यापर्यंत संसारांत गुरफटून जातात. आणि जन्म दिल्याच्या हक्कानें, मुलाबाळांना दडपूं लागतात. मग कमी अनुभवाच्या भावनावश मुलांनीं, देशोधडीला कां लागूं नये व आत्मघात कां करूं नये ?
( क्रांति दारांत येते व आश्चर्यमग्न होऊन उभी रहाते. )

**क्रांतिः**—( एक एक पाऊल पुढें येत ) बाबा ! तुम्हीं कसे आलांत ? आणि अशा रात्रीं ?

**ज्ञाति०**—कसा आलों ? क्रांती, हा अपत्यस्नेहाचा, हटवादीपणावर विजय आहे. विवेकबुद्धीच्या जिवंतपणाची ही साक्ष आहे. क्रांती, ये. संसारदुःखाचा त्याग करण्यापूर्वीं, ईश्वरोपासनेच्या मार्गाला लागण्यापूर्वीं, मला तुला एकवार भेटून घेऊं दे. पण थांब, इतक्या रात्रीं इकडे कोण येत आहे ! एक दोन, तीन; क्रांती, बाळ पहा बरं ?

**क्रांतिः**—दुसरं कोण असणार ? सुखाचे क्षण संपतांच, दुःखाची लांबण लागणारच ! कज्जलेश्वर आणि रूढीराम येताहेत बाबा ! बरोबर, गांवातील कांहीं प्रतिष्ठित मंडळी दिसताहेत. आजची न्याय-कचेरी इथेच भरणार आहे वाटतं ? आपण आंत व्हा !

**ज्ञाति०**—तें कां ?

**क्रांतिः**—या इतर मंडळींनां, कदाचित् आपली लाज वाटेल, आणि आपण समोर असतांना, मलाहि त्यांच्याशीं स्पष्ट बोलणं अडचणीचं होईल.

**ज्ञाति०**—त्या मूर्खांनां उत्तरं देत बसूं नकोस !

**क्रांतिः**—ते मूर्ख आहेत हें ठरेपर्यंत बोलेन मी त्यांच्याशीं !

**ज्ञाति०**—पण कांहींतरी भयंकर अत्याचाराच्या इच्छेनें ते आले असतील तर ?

**क्रांतिः**—बाबा, एका पोरीच्या पाडावाकरितां, यानां पांच सात जणाचं सैन्य जमवावं लागलं, हीच त्यांच्या भित्रेपणाची व अपयशाची खात्री आहे. आपण निर्धास्त असा. ( ज्ञाती० आंत जातो ) ( रूढीराम, कज्जलेश्वर, जुलुमचंद, शूद्रसंत, सत्य सज्जन, द्रव्यकिंकर प्रवेश करतात. )

**रूढीरामः**—मान्यवर हिंदुपंच ! हीच ती क्रांती, आणि हेंच तें सुदीनचें झोपडें ! समाजसेवक, धर्मभक्त या नात्यानें, या क्रांतीच्या अधःपाताचा आपण न्याय करून योग्य ती शिक्षा द्यावी, अशी माझी विनंति

आहे. स्वैरसंचारी कुलटा शिक्षेशिवाय निसटल्या, तर तरुण मुली बाळींना तो दाखला होईल. वडिलांची भीति व समाजाचं स्वास्थ्य नष्ट होईल.

**सत्य०**—मुली, हें झोंपडं कुणाचं ?

**क्रांतिः**—सरदार सुदीनचं !

**सत्य०**—तूं त्याची कोण ?

**क्रांतिः**—त्यांच्याशीं विवाह करूं इच्छिणारी मैत्रीण !

**सत्य०**—किती दिवस झाले तूं इथे आहेस ?

**क्रांतिः**—सरासरी दहा दिवस !

**रूढी०**—दहा रात्रीहि पण !

**क्रांतिः**—अगदीं खरं !

**शूद्रसंतः**—काय घ ती, अन लगिन झाल्याबिगर ! म्यां तर माझ्या पोरीचा परान घेतला असता.

**सत्य०**—क्रांती, सुदीन जातीनें कोण आहे ?

**क्रांतिः**—वर्णानें क्षत्रिय आहेत.

**जुलूमचंदः**—आणि त्याच्याशीं तुझा विवाह ? ब्राह्मणकन्येशीं लग्न करायला तयार होणारी अवलाद, खास क्षत्रियाची नव्हे !

**क्रांतिः**—कां ? ब्राह्मणकन्या क्षत्रियापेक्षां हीन का ?

**जुलूम०**—हीन कीं थोर तें मला माहित नाहीं. पण तो अधर्म आहे एवढं मला कळतं.

**क्रांतिः**—हें ज्ञान आपण कुठे पैदा केलं ?

**जुलूम०**— रूढी असं सांगते. नित्याचा हा व्यवहार आहे.

**सत्य०**—क्रांती, वर्णाश्रमधर्म हें हिंदुधर्माचं आणि समाजाचं मुख्य स्वरूप आहे. तूं वर्णाश्रमधर्म मानीत नाहीस का ? तूं हिंदू नाहींस का ?

**क्रांतिः**—मी हिंदू आहें. वर्णाश्रमधर्म मी मानतें ! हिंदूसमाजांत वैमनस्याचीं दुष्टबीजं उत्पन्न करणारा जातिभेद, मला मान्य नाहीं.

**सत्य०**—वर्णाश्रमधर्म व जातीभेद तूं भिन्न समजतेस ?

**क्रांतिः**—होय! समजतें नव्हे, दोन्हींमध्यें फरक आहे असं मला वाटतं. वर्णाश्रमधर्मांत, राजर्षीचा ब्रह्मर्षी होऊं शकेल, ब्राह्मणाचा क्षत्रीय होईल. धंद्यावर वर्ण ठरेल, जन्मावर नाहीं. महत्वाकांक्षी लोकांनां उत्क्रांतीची आशा राहील व जन्मजात मोठेपणाला कलंक लावणाऱ्या कित्येक राक्षसांना, अति शूद्रांत ढकलतां येईल. जिकडे तिकडे उत्साहाचं व प्रयत्नवादाचं साम्राज्य राहील.

**सत्य०**—आणि जातीभेदानें !

**क्रांतिः**—क्षत्रियाला लाजविण्यासारखी तरवार गाजवून, शूद्र शूद्रच राहील. ब्राह्मणाला शोभणारी विद्वत्ता असूनहि, क्षत्रियाला ब्राह्मण्यासाठीं निराश व्हावं लागेल. ब्राह्मणापोटीं आलेला ब्राह्मणपुत्र, ब्रह्मकर्म करीत नाहीं. क्षत्रियाचा पुत्र क्षात्रधर्माला चिकटून रहात नाहीं. उदरभरणार्थ वाटेल त्यानं वाटेल तो धंदा आरंभल्यावर, जन्मावर उच्च नीचत्व कां अवलंबून राहावं ? चार पांच पिढ्या भिन्न व्यवसायांत गेल्यावर, रक्तांतील संस्कार-उच्च नीचत्व—कायम राहाणं केव्हांहि शक्य नाहीं. समाजाच्या सोयीसाठीं हलक्ीं कामें करणाऱ्या आप्त बांधवांना, पशूपेक्षांहि नीचपणानं व परकीयांपेक्षांहि परकेपणानं वागवावयास लावणारा हा जातीभेद, मला मान्य नाहीं. ही महत्त्वाची वांटणी, अशा पक्षपातीपणानें झाल्यानें, यादवी, माराामाऱ्या व परधर्मप्रवेशही बोकाळून उद्यांचा हिंदुधर्म, निर्बल, तुकडे पडलेला आणि मूठभर लोकांचा धर्म राहील.

**सत्य०**—ही भीति व्यर्थ आहे. परकीयांच्या हल्ल्यांतून, हिंदूधर्म अद्याप जिवंत आहे.

**क्रांतिः**—जिवंत आहे, पण त्या हल्ल्यांनीं जर्जर झाला आहे. यापूर्वी झालेले हल्ले, तात्पुरते होते, पण आतांचा हा हल्ला, शतकानुशतकं चालणारा आहे. जुलमी भेद नष्ट झाल्याशिवाय, संघटना नाहीं. संघटनेशिवाय सुधारणा नाहीं. आणि सुधारणेशिवाय, हिंदूना जगतां येणार नाहीं ! हिंदूच राहून मरतां येणार नाहीं !

सत्य०—मुली, तूं बुद्धिमान आहेस. माझ्या मतानें तुझ्या कल्पना दुर्घट व अवेळीं आहेत. चांगल्या वाईट परंपरेला, श्रद्धाळूपणें बिलगणाऱ्या हिंदु समाजाच्या गळीं, या कल्पना उतरविणें किती कठीण कर्म आहे, याची तुला कल्पना नाहीं. आज या कल्पनेचा नुस्ता उच्चार करणाऱ्याचा, समाज बळी घेईल.

क्रांतिः—त्याबद्दल माझी खात्री आहे. पण अशा बलिदानाशिवाय, कार्यपूर्ती नाहीं. वीरांचे बळी दिल्याशिवाय, राज्य मिळत नाहीं. आणि नवमत, स्वतःच्या रक्तांत रंगवून डोळ्यांसमोर धरल्याखेरीज, समाज तिकडे ढुंकूनहि पहात नाहीं.

सत्य०—कज्जलेश्वर, मला विचार केल्याशिवाय यावर निर्णय देतां येणार नाहीं. मी ब्राह्मण आहें, आणि न्यायाचा जितका मी भोक्ता आहें, तितकीच अन्यायाची मला चीड आहे. मुली, येतों मी !

क्रांतिः—याला मी खरं ब्राह्मण्य समजतें. मी नमस्कार करतें. मला आशिर्वाद असावा.

सत्य०—सत्याचरणी हो ! धर्माचरणी हो ! ( जातो. )

कज्जले०—पाहिलंत ? हा अहमंन्य विद्वान, शेवटीं असा दांत पाडून गेला !

रूढी०—जाऊं द्या ! कुणी नसलं, तरी जुलूमचंद आहे. वाटेल त्या मार्गाचं अवलंबन करावं लागो, आज क्रांतीला मी येथून उचलून नेणार !

क्रांतिः—कां रूढीराम, कसल्या विचारांत पडलांत ? पापाच्या सिद्धीला सुद्धां कांहिं सीमा असते. प्रत्येक वेळीं पापाचा जय होता, तर रावणाचं राज्य जगाच्या अंतापर्यंत चालून, रामाचा वनवास स्वर्गवासापर्यंत लांबला असता !

रूढी०—सत्य सज्जन गेला तरी आम्हीं आहोंत आणि तुझ्या पापाचं प्रायश्चित्त तुला दिल्याखेरीज, आम्ही इथून जाणार नाहीं.

क्रांतिः—चोरांनीं न्यायासनावर बसलेलं पहाण्याचे प्रसंग फार थोडे असतात. रूढीराम, माझा न्याय करणारे तुम्हीं कोण ?

**रूढी०**—आम्ही कोण ? आम्हीं कोण तें तुला पटवून देऊं. बोलाव तुझ्या—

**क्रांतिः**—रूढीराम, खबरदार पुढं एक शब्द बोलाल तर ! दिल्लीच्या खिजमतगाराचे खिजमतगार तुम्ही ! तुमच्या आगांतुक न्यायासनाला, आणि बेचव बडबडीला मी कवडीचीहि किंमत देत नाहीं. मुकाट्यानें इथून चालते व्हा.

**रूढी०**—क्रांती, तोंड आवर ! संतापानं माझं देहभान नाहीसं झालं, तर मी जीव घेईन तुझा !

**क्रांतिः**—दुसऱ्याचा जीव घ्यायला सुद्धा सामर्थ्य असावं लागतं समजलांत ? एका अबलेला पकडून नेण्यासाठीं, तुम्हाला खांसाहेब बोलवावे लागले. गावांतल्या चार लोकांची मदत मागावी लागली, इतका भ्याड तूं !

**रूढी०**—जुलूमचंद, शुद्रसंत ! पहातां काय ? ओढा तिला आणि चला घेऊन !

**क्रांतिः**—कां आतां त्यांच्याकडे वळलास ! जुलूमचंदासारख्या क्षत्रियांना, शूद्र म्हणून त्यांचा उपहास करून त्यांच्या मदतीची अपेक्षा तुम्हीं कां करावी ? जुलूमचंद, या ! तुमच्याच धर्मभगिनीचा हात धरून, तिला फरफटत चवाठ्यावर नेऊन टाका.

**जुलूम०**—क्रांति, मी साधासीधा शिपाई गडी आहें. तुला तुझ्या इष्ट देवतेची शपथ आहे. खरं सांग ! तूं पवित्र आहेस ?

**क्रांतिः**—तुमच्या सरळ सवालाला मी सरळच जबाब देतें. हृदयाच्या अदलाबदली—पलिकडे आम्हीं गेलों नाहीं आणि जाणारहि नाहीं. मी शीलानं पवित्र आहें, मनानं स्वतंत्र आहें, याला साक्ष तो विश्वपालक !

**जुलूम०**—रूढीराम, मला धर्माकर्माचा वाद करतां येत नाहीं, आणि दुसऱ्यांनीं केलेला समजत नाहीं. या मुलीचं अगर सुदीनचं पाऊल वाकडं पडल्याचं सिद्ध झालं, तर क्षणाचाहि विलंब न लावतां, मी दोघांचीं शिरं

चावडीवर हजर करीन. तोंपर्यंत, हिला छळण्याची कल्पनाहि मला सहन होत नाहीं. मुली, सुदीन कुठे आहे ?

क्रांतिः—राणाजींच्या छावणींत !

जुल्म०—मुली, येतों मी ! जरुर पडली तर मला निरोप पाठीव !

क्रांतिः—रूढीराम, हा क्षत्रियांचा सीधेपणा पाहिलात ( ती नमस्कार करते )

जुल्म०—वीरपत्नी हो ! वीरमाता हो. ( जातो. )

कज्जले०—( रूढीरामास ) हात दाखवून अवलक्षण करून घेतलंत ! तुमचा मूर्खपणा अंगाशीं आला !

रूढी०—मला नव्हतं वाटलं हे इतके पागल असतील म्हणून ! आतां काय करायचं ?

कज्जले०—आतां बुरखा टाकण्याखेरीज गत्यंतर नाहीं. सुदीनवर गुप्त हल्ला करण्यासाठीं, मी शिपायांनां लपून राहायला सांगितलं आहे ! सुदीनचाही पत्ता नाहीं अद्याप ! चंद्याला कोंडून ठेवला हें ठीक झालं. नाहीं तर घोंटाळा झाला असता !

शूद्र०—काय सरदार ? म्होर काय करनार हायसा ?

कज्जले०—दूर हो गाढवा, जवळ किती येतोस ?

क्रांतिः—ऐकलंस बाबा, ज्यांनीं पंचांत तुला जमा केलंय, ते तुझी काय किंमत ठेवतात तें पाहिलंस ? घाणींत तोंड घातलेल्या कुत्र्याला, ते कुरवाळतील; पण ! तुझ्यासारख्या हिंदूला ते शिवूनही घेणार नाहींत. डोक्यांतील शेंडी काढून, हनुवटीला चिकटव, तुला न शिवणारे हे धर्मामार्तंड, सरबताचे प्याले घेऊन तुझ्यापुढें धांवतील !

शूद्र०—व्हय, पन आमी म्हारच हाय, ते शिवणार कसे आमासनी !

क्रांतिः—या गुलामगिरींत, पिढ्यानुपिढ्या तुम्हाला इतकं खोल गाडलं आहे कीं, दुसऱ्याकडून हीन म्हणवून घेणंच तुम्हाला सुखाचं वाटतं ! आपल्या नसानसांतून, इतरांसारखंच शुद्ध रक्त वहात असून, आपण गुलाम नव्हे

स्वतंत्र आहोंत, हें तुम्हाला पटत नाहीं. नव्हे, ऐकवत नाहीं. समाज सत्ताधाऱ्यांच्या जुलमाचा तुमच्यावर भयंकर परिणाम झाला आहे !

**कज्जले०**—( स्व. ) शेवटचं निर्वाणीचं अस्त्र मला आतां सोडलं पाहिजे. ( उ. ) क्रांती, दिल्लीश्वराच्या आज्ञेनं, मी सम्राटांचा सेवक तुला कैद करीत आहें !

**क्रांतिः**—आतां आपल्याला वाचा फुटली ! मला कैद करण्याचं कारण ? माझ्यावर आरोप तरी कोणता ? आणि तो कोण ठेवीत आहे ?

**कज्जले०**—सम्राटांच्या शत्रूला—राणा प्रतापला—तूं आणि सुदीन सामील आहांत. राणा प्रतापला पत्रं पोहोचविण्याचा आणि गुप्त मदत केल्याचा तुम्हां दोघांवर मी आरोप ठेवतों !

**क्रांतिः**—मी निरपराधी आहें ! मी आपल्या स्वाधीन व्हायला तयार नाहीं.

**कज्जले०**—तो फितूर कुठं आहे ?

**क्रांतिः**—तुमच्या गालावर त्यांचा हात उठला आहे हें ध्यानांत असूं द्या ! पाठीमागं, राजालाहि शिव्या दिलेल्या पचतात. मला त्यांचा पत्ता माहित नाहीं.

**कज्जले०**—ठीक आहे, सांपडेल तोही ! दिल्लीश्वराचा हात, फार दूरवर पोंचतो हें तुला लवकरच दिसून येइल ! ( टाळ्या पिटतो. शिपाई येतात. )

**ज्ञाति०**—( आंतून येऊन—तरवार उपसून ) माझ्या क्रांतीला कैद करणाऱ्याला, स्वतःचे प्राण गमवावे लागतील !

**क्रांतिः**—बाबा, आपण दूर व्हा ! विधीलिखित तसं नसेल तर माझ्या एका केसालाहि धक्का लावण्याची त्यांची प्राज्ञा नाहीं.

**ज्ञाति०**—नाहीं, जन्मानं ब्राह्मण असलों तरी सारं आयुष्य मी क्षात्रकर्मांत घालविलं आहे. मोंगल सेवेनं भ्रष्ट झालेली तरवार, आज तुझ्या उपयोगीं पडली तर आयुष्याचा शेवट तरी सत्कृत्यानं होईल !




**क्रांती**—थांबा ! माझ्या बाबांच्या पवित्र प्रेताची मला व्यवस्था लावूं द्या ! [पान ८२]

कज्जले०.—मामासाहेब, सम्राटाच्या अधिकाऱ्याला तुम्हीं हरकत करतां अहांत ! तुमच्या वयाचा मुलाहिजा न करितां, आम्हाला तरवार चालवावी लागेल. तुम्ही दूर व्हा !

ज्ञाति०—चालव, बेलाशक चालव ! तूं तरवार आज चालविणार असशील. माझे काळयाचे पांढरे झालेत ती पेलून !

क्रांतिः—बाबा तुम्हाला माझी शपथ आहे, तुम्ही बाजूला व्हा !

ज्ञाति०—वेडी आहेस तूं ! सम्राटांच्या नांवावर चाललेला या भुरट्याचा जुलूम सहन करूनच, लोकांनीं यानां शिरजोर बनविलं आहे.

कज्जले०—चला, दोघांनांही गिरफदार करा ! ( ते धांवून जातात ज्ञाती० पडतो )

ज्ञाति०—जन्मभर क्षात्रकर्म केल्याचं, आज सार्थक झालं. क्रांती तूं वीरकन्या आहेस आणि वीरकन्येला साजेल, अशा तऱ्हेनेंच धैर्यानं, निश्चयानं वाग ! तुझं इच्छित पूर्ण होईल, असा माझा तुला आशिर्वाद आहे. मी येतों. जय–( मरतो. )

क्रांतिः—बाबा, बाबा ! माझ्याशीं एक शब्द तरी बोला. बाबा, पहा हो एकवार डोळे उघडून माझ्याकडे पहा ! बाबा, मी कुठे जाऊं ? कुणाला हांक मारूं ? कज्जलेश्वर, चांडाळा काय केलंस हें ? माझ्या बाबांचा माझ्या डोळयांदेखत तूं खून केलास ? बाबा, माझे बाबा !

कज्जले०—चलो, उठाव उस्को. ( शिपाई क्रांतीला धरून ओढतात )

रूढी०—चल, मोंगलांच्या जनानखान्यांत. आतां जन्मभर रडत बैस आईबापांच्या नांवानं !

क्रांतिः—थांबा, मी पदर पसरतें, भीक मागतें, माझ्या बाबांच्या पवित्र प्रेताची, मला व्यवस्था लावूं द्या ! मी तुमच्या बरोबर येतें, पण मला थोडा वेळ द्या. मी तुमच्या पायां पडतें.

कज्जले०—कुजत पडूं दे त्या थेरड्याला ! ( लाथ मारतो ) चलो फौरन ले चलो उस्को !

क्रांति:—नका, नका ! युद्धभूमीवर एकमेकांचीं हृदयं, खड्गानें विदीर्ण करणारे हाडवैरी, सुद्धां, मृत प्रतिस्पर्ध्याची अशी विटंबना करीत नाहींत. हिंदूंना काफीर ठरवून, त्यांची कत्तल करणारे परधर्मी यवन सुद्धां, बरोबरीच्या वीराचा, अशा भ्याडपणानं अपमान करीत नाहींत. कज्जलेश्वर, हिंदु तुम्हीं ? तुमच्याच हाडामांसाच्या, तुमच्याच धर्माच्या, तुमच्याच वर्णाच्या एका वृद्ध वीराचं शरीर, असं लाथेनं ठोकरतांना, अंतरीक्षांतील वीज, कडाडून तुमच्या पायांवर कां पडली नाहीं ? ज्या धर्मांत, ज्या देशांत माणुसकीला मुकलेलीं, स्वार्थानं अंध झालेलीं माणसं, शेंकड्यावारी उपजतात, त्या धर्माचे वाटेल त्यानं लचके तोडले, त्या देशाला अनंत कालपर्यंत पारतंत्र्याच्या नरकांत पिचावं लागलं, तर त्यांत आश्चर्य कोणतं ? बाबा, तुमच्या कृपेचं कवच नाहीसं होतांच, सुदीन, तुमची पाठ फिरतांच, या गिधाडांनीं क्रांतीला वेढलं ! ईश्वरा, तुझ्याशिवाय मी कुणाला आळवूं ? बाबा ! बाबा ! बाबा ! ( बेशुद्ध होते. तिला ओढून नेतात. )

( पडदा पडतो. )

अंक दुसरा समाप्त.

# अंक तिसरा.

## प्रवेश १ ला.

स्थलः—( गांवा बाहेरील रस्ता. बद्रुद्दीन, रूढीराम, कज्जलेश्वर. )

बद्रु०—क्या सरदारसाहेब, आप मुझे बच्चा समझते हो ! मुझे मालूम है तुम मुझे फसाते है. वो ज्ञातीभैरव की लडकी, अपने काबूमे लेके, मुझे बनानेका आपका इरादा है !

कज्जले०—खांसाहेब, काय घाणेरडी शंका ही ! क्रांती माझ्या कबज्यांत आली, पण केव्हां काल रात्रीं ! तिला येथून, बिनबोभाट तुमच्याबरोबर गुप्तपणें पाठवायची तजवीज नको का करायला ? गोष्ट षट्कर्णी झाली, तर क्रांती जाईल सुटून. आणि गांवचे लोक, तुमचे आमचे तुकडे करून, माझ्याच वाड्याच्या आगींत जाळतील.

बद्रु०—सरदारसाहेब, छोड दो ये बाते. ऐसे टुकडे करनेवाले, हम बहोत देखे है ! आज रातको तुम करांती को मेरे साथ भेज दो. आगेका मै देखलुंगा ! और दूसरी बात, चंद्या कहां है ? रूढीरामजी, शामतक चंद्या मेरे सामने न आय, तो मैं कसम खाके कहता हूं, के इसका अंजाम बहोत बुरा होगा !

रूढी०—खांसाहेब जुलूम म्हणायचा हा ! ईश्वर साक्ष मी दोन दिवसांत चंद्याला पाहिला सुद्धां नाहीं. अहो, आम्हीं काय त्याला खाल्ला कीं काय ?

बद्रु०—खायेंगे ! तुम् क्या करेंगे नहीं ? तुम्हारी जात मुझे मालूम है.

रूढी०—खाँसाहेब, आतां जातीवर आलांत ? लाजलज्जा सोडून लोकांची खेटरं खाऊन तुमची सेवा केली, आणि तुम्हीहि आतां आमच्यावर उलटलां ?

बद्रु०—क्या मेहेरबानी की हमारेपर ! दोदोसो अश्रफी, ये हातोंसे मैं गिनके दे चुका हूं, तुम् हमारी नोकरी नहीं की, मगर पैसे की. सरदार-साहेब, चंग्या, मेरे साथ आना जरूर है.

कज्जले०—खांसाहेब, काय वेड घेऊन बसला अहांत तुम्ही ! चंग्या किती हरामखोर आहे, तुम्हाला माहीत आहे ? तुमचं निमक खाऊन, सर्व गुप्त मसलती त्याच हरामखोरानं त्या सुदीनला सांगितल्या. तुम्हीं समजतां त्याला गरीब, पण महा नीच आहे तो !

बद्रु०—कुछबी हो, वो मेरा आदमी है. उस्का कसूर होगा, तो मै उसे सजा दूंगा, मै कुछ अंधा नही था ! पहिलेसे मै देखताथा, तुम दोनो उस्पे जलते थे !

रूढी०—ऐका सरदारसाहेब ! अहो, तो आमचा भाऊ का बंद ? आम्ही त्याच्यावर जळायचं कारण ?

बद्रु०—खैर, ये सब रहेने दो. शामके वख्त, चंग्या और वो लडकी मेरे साथ आएंगे !

सुंदर०—( प्रवेशून. ) अहो दिल्लीचे दलाल, हे कुठे आहेत ? गेले दोन दिवस त्यांचा पत्ता नाहीं. बऱ्या बोलानें त्यांचा पत्ता द्या !

कज्जले०—घ्या ही आली महाकाली ! सुंदर, उगीच वटवट करूं नकोस. तुझा चंग्या गेला मसणांत !

सुंदरः—आणि तुम्हां दोघांना सोडून ? इतके गैदी नाहींत ते ! कुठे आहेत ते !

बद्रु०—ओ सुंदरबाई, मला काय मालूम ! ये दोनोंला पूछो !

सुंदरः—रूढीराम !

रूढी०—कायग काळुंद्रे, मस्ती आली वाटतं ? अगदीं एकेरी नांवानं हांक मारतेस ?

सुंदरः—तर काय तुला महाराज म्हणूं ? तुझ्या सारख्याला जर अहो जाहो म्हणायचं तर आमच्या म्हाताऱ्या गोम्या बैलानं काय पाप केलंय ?

मुकाट्यानें मला त्यांचा पत्ता सांगा ? त्यांचा शोध लावल्याखेरीज, मी अन्न नाहीं घ्यायची !

कज्ज०—आणि मेरनास कां टांचा घांसून ? काय नसती पीडा आहे.

रूढी०—चालती हो इथून ! आम्हाला कांहीं खाजगी बोलायचं आहे.

सुंदरः—कां ? आतां आणखीं कुणावर आलीय संक्रांत ?

बड्डु०—सुंदरबाई शामला मिळेल वो चंद्या तुम्हाला ? मगर वो और अभी जानेवाले है आज रातको !

सुंदरः—तर तर ! जानेवाले ? मी साफ सांगतें ते आतां येणार नाहींत तुमच्या बरोबर ! पुरे झाली तुमची नोकरी ! आम्हाला आतां नोकरीच करायची नाहीं.

रूढी०—तर ? उत्पन्नच ठेवलंय कीं नाहीं लेकाचं इथे ? का तूं कमावून घालणार आहेस त्याला ?

सुंदरः—बायकांची कमाई खाणारा तूं, ते नाहींत समजलास ?

बड्डु०—सुंदरबाई, थोडे दिनके बाद, में उसे वापस भेजदूंगा ! मगर इस वख्त, मै अकेला जा नहीं सक्ता !

सुंदरः—अहो, पुरुषासारखे पुरुष तुम्हीं ! तुम्हाला कोण धरतंय कीं काय ! शिवाय, दाढी सकट तुम्हाला धरायला, डोळे फुटले नाहींत साऱ्यांचे.

कज्जले०—खांसाहेब, काय उगाच तिच्याशीं वाद घालीत बसतां ! सुंदर, जा तूं. चंद्या जिवंत असेल तर भेटेल तुला आज संध्याकाळीं ! उगीच डोकं उठवूं नकोस ?

रूढी०—शिचीचं तोंड आहे कीं तोफखाना ? आंवाज तरी किती मंजूळ !

सुंदरः—तर ! आणि तुझ्या आवाजानं, दिवसा दिवे लागतात ? मी जातें, संध्याकाळपर्यंत, हे आले नाहींत, तर मी आहें आणि तुम्हीं अहांत ? ( सुंदर जाते. )

बड्डु:०—देखो ! चंद्या खुद्द दिलसे कहां जाता, तो जरूर उस्कू कहता ? मै जानतां हूं, ये सब तुम दोनोंका खेल है. खैर जो होगया सो होगया. शामका इन्तेजान बराबर रखना. चांद निकलनेके बाद मै चलुंगा. ( एक नोकर येतो. )

नोकर:—सरदार साहेब धांवा ! भिल्लांचं आणि रजपुतांचं सैन्य, किरपुरहून इकडच्या रोखानें चालून येत आहे.

कज्जले०—कुणी दिली ही बातमी ? मूर्खच आहे. राणा प्रतापचं सैन्य परवांच चितोडच्या रोखानें गेल्याचं मला कळलं आहे !

नौकर:—नाहीं. किरपूरच्या ठाकुराकडून मघांच हरकारा आला. किरपूर लुटून त्यानीं फस्त केलं ! ठाकुरसाहेब जखमी होऊन, त्यांच्या हातीं सांपडले आहेत. इथे शिबंदीही पुरेशी नाहीं.

कज्जले०—ही काय भलतीच भानगड उद्भवली. खाँसाहेब बहुधा राणा प्रतापचा, मुख्य सैन्याच्या पिछाडीस पायबंद देण्याचा डाव असावा ! कायरे, त्या सैन्यावर मुख्य कोण आहे कळलं का ?

नोकर:—नाहीं. पण किरपूरचे बरेच लोक त्या सैन्याला जाऊन मिळाले. त्यावरून, तो इकडचाच कुणी तरी असावा !

कज्जले०—इकडचा कुणी तरी ? सुदीन तर नसेल ! शक्य आहे. खाँसाहेब, वक्त बांका आहे ! तुम्ही असेच्या असेच माझ्या घोड्यावरून निघा आणि खाँसाहेबानां वर्दी द्या. पुढून मागून भिल्ल रजपुतांनीं तुमच्यावर हमला केला तर,–ती कल्पनाच नको ! तुम्ही मदत घेऊन या, तोंपर्यंत शेजारच्या फितुरगडांत मी आश्रय घेतों.

बड्डु०—ये क्या आफत है ! अच्छा, तो वो क्रांतीकू हजर करो, और चंद्या !

कज्जले०—खाँसाहेब तुम्हाला वेड नाहीं लागलं ! वख्त कसला, क्रांतीचं आणि चंद्याचं लोढणं गळ्यांत अडकवून घेऊन कां तुम्ही छावणी



कज्जलेश्वर—कांतीला घेऊन तावडतोब फितुरगडावर रवाना व्हा.

[पान ६९].

गांठणार ? असे रेंगाळलांत तर क्रांतीच्या सुडासाठीं टपलेला तो हरामखोर, वाटेंतच तुम्हाला कबरस्थान दाखवील, आणि वेळेवर बातमी न पोहोंचून भिल्लांचा अचानक हल्ला खाँसाहेबांवर होईल.

**रूढी०**—शिवाय, तुमची वेळेवर कुमक न आली, तर आम्हीं फितुरगडासह गाडले जाऊं हें ध्यानांत ठेवा. आणि या सर्वांचं खापर तुमच्या डोक्यावर फुटेल, चला जलदी करा.

**बद्दु०**—क्या वख्त आया ? अच्छा मैं आगे बढता हूं ! कुछ बी हो मगर गड लढाना ! मैं खाँसाहेबसे तुम्हें मदत भेजुंगा. ( जातो )

**रूढी०**—होय ! होय ! तेवढं कराच. नाहींतर आमची धडगत नाहीं ! सरदारसाहेब ! मी घरीं जातों, माझीं बायकामुलं, माझ्या हिशेबाच्या वह्या—

**कज्जले०**—जाऊं देत हो ! भलत्या वेळीं काय घेऊन बसलांत ? अगोदर वाड्यांत जा. क्रांतीला घेऊन ताबडतोब फितुरगडावर रवाना व्हा ! एक एक क्षण मोलाचा आहे.

**रूढी०**—क्रांती, तुमच्या वाड्यांत जळून मेली तरी मला परवा नाहीं. आपणच क्रांतीला द्या आणि फितुरगड गांठा. मी जमलं तर मुलांसह येतोंच, नाहींतर इथंच कुठेतरी लपून राहीन. ( जाऊं लागतो )

**कज्जले०**—( तरवार उपसून ) खबरदार एक पाऊल पुढें टाकाल तर ! प्रथम क्रांतिला गडावर पोहोचती करा, आणि नंतर मग तुमचीं बायकामुलें ! काय ?

**रूढी०**—( घाबरून ) माझ्या इमानीपणाचं शेवटीं हें बक्षीस मिळायचं होतं ? सरदारसाहेब, त्या आडदांडांच्या राक्षसी कत्तलींत, माझीं पोरं बाळं कापलीं जातील. दया करा, मला जाऊं द्या.

**कज्जले०**—तें शक्य नाहीं ! क्रांतीला घेऊन अगोदर गडावर जा. किल्लेदाराला ही आंगठी दाखवून, तिला बंदोबस्तानें ठेवण्याची व्यवस्था करून मग इकडे या ! चला, जा लवकर ( आंगठी देतो. )

**रूढी०**—काय करूं ? जन्मभर मी केलेल्या पापाचं प्रायश्चित्त, माझ्या कच्च्याबच्च्यांच्या कत्तलीनें, माझ्या घरादाराची होळी होऊन का मला मिळणार आहे ? दुष्टा, कज्जलेश्वरा तुझ्या नादानें—

**कज्जले०**—सोन्याच्या थैल्या घरीं पोहोचवितांना, माझा नाद नव्हता ? बायकापोरांना दिल्लीहून दागिने खरेदी करून आणतांना माझा नाद नव्हता ? दुष्कर्मयोग आचारणाऱ्यांनीं, पापाचा परमेश्वर सैतान, प्रसन्न होऊन वर देणार आहे हें विसरूं नये. चला चालूं लागा. गफलत कराल, तर भिल्लां-ऐवजीं मी स्वत:, तुम्हाला तुमच्या घरादारासह जिवंत जाळीन हें ध्यानांत ठेवा. ( रूढीराम जातो. ) जा गांवच्या शिबंदीसह गांवकामगारांना किर-पुरच्या वेशीवर तयार रहायला सांग, मी माझ्या लोकांसह आलोंच तिथे. ( नोकर जातो ) ( स्वगत ) एकंदरींत, या अनपेक्षित अडचणीनें असा घोटाळा केला ! बहुधा, सुर्दीनची या सैन्य-विभागावर नेमणूक झाली असावी. जन्मभर सावधगिरीनें पांघरलेला सभ्यपणाचा बुरखा, परवां रात्रीं क्रांतीच्या प्रयत्नानें आणि त्या दीडशहाण्या पंडितांच्या फसवणूकीनें, कायमचा फाटन, माझं सत्य-स्वरूप उघड झालं. हरकत नाहीं ! सभ्य-पणाच्या सोंगाला, क्रांती बळी पडणार नाहीं, हें मलाहि कळलंच होतं. या चंद्याचं हें बावळट पण घातकी घोडं, या खांसाहेबांच्या जोरावर भलत्या उड्या न मारतं, तर या क्रांतीच्या आयुष्यांतील नाटकाचा नायक हा कज्जलेश्वर ठरता ! पण जाऊं द्या ! जन्मभर दुष्कृत्यें करून, मृत्यू-नंतरहि पत्ता न लागूं देणाऱ्या कर्तबगारांत दाखल होण्याचं भाग्य, माझ्या नशिबीं नाहीं.

**नोकर:**—चला सरदारसाहेब, गांवावर हल्ला झाला. गांव-कामगार, सारखे आपल्या नांवानें हांका मारीत आहेत.

**कज्जले०**—हांका मारीतच राहूं दे त्यांना ! तूं आपले लोक घेऊन, फितुरगडावर माझ्याबरोबर चल ! क्रांती—

**नोकर:**—रूढीराम तिला घेऊन गडावर रवाना झाले ?

**कज्जले०**—ठीक !

**नोकर**:—आणि तो दुसरा कैदी चंद्या ?

**कज्जले०**—चंद्या ! खुपस तुझी तरवार त्या उपद्यापी कोल्ह्याच्या छाताडांत ! ( नोकर जातो. ) ( पडद्यांत ओरड ) मरा, तुमच्याकडे लक्ष्य द्यायला मला फुरसद नाहीं. बस्स, शांतीचा फाटका बुरखा फेकून देऊन, या कपट–नाटकांतील उरलेला प्रवेश, दुष्टांच्या धडाडीनें, आणि सैतानाच्या सल्ल्यानेंच मी पुरा करणार ! या बद्यानें खाँसाहेबांकडून कुमक आणविण्याच्या आंत जर फितुरगड पडला तर, तर–क्रांती त्या हरामखोराच्या हातांत जाऊन, माझा कडेलोट होणार ! पातक्यांच्या परलोकांतसुद्धां अपेशी, बुद्धिहीन, कच्च्या दिलाचा, पापी म्हणून माझी छीः थूः होणार ! काय करूं ? सुडाशिवाय मरण ! कळसाशिवाय हें सैतान मंदीर अपुरंच टाकून मी कसा मरूं ? माझ्या सर्व नाशाला कारण झालेल्या क्रांतीला, या विजयी कज्जलेश्वराच्या तोंडाला भयंकर काळोखी फासणाऱ्या त्या पोरीला, सुखानं संसार करायला सोडून मी मरूं ? नाहीं, मला मरणंच भाग असेल, तर क्रांतीलाही मेलं पाहिजे ! आणि तेंही भ्रष्ट म्हणून ! या कज्जलेश्वराची बटीक होऊन ! शुद्ध शीलानें क्रांती मेली, तर माझा सूड अपुरा राहील. धर्मपूर भिल्लांच्या बाणांनीं छिन्न विछिन्न झालं, सारं गांवच्या गांव, बेचिराख झालं, तरी मला त्याची पर्वा नाहीं. शील–भ्रष्टतेच्या धडधडणाऱ्या आगींत, क्रांतीला जाळून तिच्या पावित्र्याची चिता पेटवून, ही निराशेची रखरखीत आग, त्या सुदीनच्या जन्मावर फेकीपर्यंत, हा कज्जलेश्वर, इच्छा मरणी भिष्माप्रमाणें जिवंत राहील.

---

## प्रवेश २ रा.

स्थळ–( कज्जलेश्वराच्या घरांतील अडगळीची कोठडी. )

( चंद्या एकटाच. )

**चंद्या**:—दोनच दिवस मी अन्नावांचून आहें, पण इतक्यांत, दहापांच यमदूत येऊन गेले. आज तर, यमाचा रेडा या दारापाशीं, डरकाळी

फोडून गेलेला मी ऐकला. आणखी एखादा दिवस, मला उपास पडला, तर राक्षसांच्या घरांत बळेंच दत्तक जाऊन, मी आज पाय, उद्यां हात, परवां पोट, पोटासाठीं खाऊन, शेवटीं दांत सुद्धां खात राहणार ! आतां माझं मलाच हसूं येतें, काल मी भुकेच्या भरांत, इथं चुकून आलेल्या उंदराच्या पिट्टुकल्यांच्याच मागं लागलों होतों. उपासाने डोळेसुद्धां मंद झाले. क्रांतीताई आणि सुदीनची मुर्ती, क्षणोक्षणीं डोळ्यांपुढं उभी राहते. पण स्पष्ट कांहीं दिसत नाहीं. सुंदरची स्पष्ट आकृती दिसण्याऐवजीं तिची लांबच्च लांब सावली मात्र दिसते आहे; काय करूं ! नरभक्षक ठरलों तरी चालेल, पण कज्जलेश्वर यावेळीं येईल तर, उपासाच्या आगींत भाजून, त्याला मी जिवंत खाऊन मोकळा होईन. नव्हे, पोट भरीन ! हा कोण ?

**पहारे०**—काय दोस्त ! कसं काय ?

**चंद्या**ः—दोस्ता, जवळ येरे, मला कमी ऐकूं येतंय !

**पहारे०**—नको बाबा ! हाय हतच बरा ! गमतीने हात म्होर केला अन् त्वा तेवढाच चापलास, म्हंजी व्हायचा समदा घोंटाळा ! ( पडद्यांत ओरड ) आतां काय करावं तरी काय ? गांवावर ह्यो घाला, अन् घरामंदी तरनी ताटी प्वार एकली ! टकुरं फिरायचा येळ आला.

**चंद्या**ः—काय हो दोस्त, हा ओरडा कसला ?

**पहारे०**—ह्यो भोग म्हनायचा बाबा ! गांवावर भिल्लांचा हल्ला आलाय !

**चंद्या**ः—आणि तुम्ही, घरच्या मंडळींचं रक्षण करायचं सोडून, माझ्या राशीला बसलां अज्ञात होय ?

**पहारे०**—बाबा काय करावं ! चाकरी हाय ! तक्कड माझं तरन ताट लेकरुं, एकलं असेल, अन् मीं हत बसलोया अंडीं उबवीत.

**चंद्या**ः—हें बघा मामा, तुम्ही जा. दाराला कुलुप आहे ना ? मग झालं तर ! मी कांहीं कुलुप फोडून पळून जात नाहीं.

**पहारेकरी**ः—नेम काय तुंझा ! अन् गेलास तर ?

**चंदन:**—अहो माझ्या अंगांत उठायचा जोर असता तर त्या कमलेश्वराच्याच जिवावर उठलों नसतो का मी ? कुलुप फोडायची ताकद असती, तर असा कां डोळे फिरवित पडलों असतों ? जा तुम्ही, पण मला जरा कांहीं तरी खायला देऊन जा. बघा, गांवच्या दंगलींत तुम्ही मारले गेलांत तर मला अन्न घातल्याच्या पुण्याईवर, स्वर्गांत तुम्हाला कमी भाड्यानें खोली मिळेल; नाहींतर तुम्ही जगून मी मेलों तर आवसे पुनवेला मी तुमच्या घरांत नाचायचा येऊन !

**पहारे०**—खरं हाय बाबा ! समंद लई वंगाल ! मी देतों तुला वाईच भाकरी, पन शिपत व्हा !

**चंद्या:**—काय व्हाऊ !

**पहारे०**—भाकरी दिल्यावर मी समंद हूनशान तुझ्या मागं लागनार न्हायी म्हून शान !

**चंद्या:**—देवा शपथ मी भूत होऊन तुझ्या मागं लागणार नाहीं. दे लवकर, पाणीही आण जरा हं !

**पहारे०**—काय पानीबी, मर्दा तुज पाय लांबाया लागले रे ! आतां वाईच भाजी बी मागायचा तूं !

**चंद्या:**—मग तूं काय भाजीशिवाय भाकरी देणार होय ! वा ! घांस लागून मरेन कीं मी !

**पहारे०**—आणि मेलास तर !

**चंद्या:**—भूत होईन ! ( डोळे फिरवून ) आण भाकरी ! आण भाकरी ! आण भाकरी !

**पहारे०**—( घाबरून ) अरे घेर घे ! मरुं नग् ( भाकरी देतो ) ( सुंदर डोकावून पहाते. )

**सुंदर:**—आतां कुठे कुठे शोधूं तरी यांना ? सगळा वाडा कसा भयाण पडलाय ! दिवसा भुतं नाचायचीं असल्या जागीं ! पण हें कोण ? अगबाई हे तर ते ! ( पडद्यांत ओरड )

**पहारे०**—( सुंदरला पाहून ) बया कोन ग तूं !( सुंदर पहात राहते. तो घाबरून ) आँ इकत्यांत भूतं नाचाया लागलीं जनूं, राम ! राम !

**सुंदरः**—अहो असे घाबरलांत काय ? इथे ते आहेत ना ?

**पहारे०**—भूत तर खास न्हायी म्हना ! बया; वाईच त्येला पानी आनूनशान देग ! माझा जीव अक्षी घाबरा झालाया बघ !

**सुंदरः**—म्हणजे तुमचा जीव घाबरा झालाय, आणि त्यांना पाणी काय म्हणून ?

**चंद्याः**—मी मेलों म्हणून !

**पहारे०**—जा ! जा ! बया, आन वाईच पानी, त्यो मेलो म्हनतोय ! न्हायींच आतां दम धरवत, काय बी हुंद्या मी जातो घराकड, पोरगी तरी दिसल मला ? ( धांवत जातो. )

**चंद्याः**—अरे ! पाणी ! मघांशीं अन्नावांचून मरत होतों. आतां पाण्याशिवाय तडफडतों आहें.

**सुंदरः**—अगबाई ! थांबा हं ? मी पाजतें तुम्हाला पाणी ?

**चंद्याः**—तूं आणि कोण बाई आलीस पाणी पाजायला ! बरं तर चल, कुणीही ऐस पण पाणी आण !

**सुंदरः**—अहो मी सुंदर !

**चंद्याः**—सुंदर ऐस नाहीं तर हिडींबेची आई ऐस, पण माझे आई, दया कर आणि पाणी, पाणी आण !

**सुंदरः**—चला ! मला आई म्हणतां ! मी नाहीं आणीत पाणी !

**चंद्याः**—अग आई नको बाबा ह्मणतों, पण कृपा कर आणि पाणी पाज मला.

**सुंदरः**—अगबाई यांना घेरी आली ! ( पडतो ) आलें आलें हं पाणी घेऊन ! ( धांवत जाते, पाणी आणून गजांतून आंत देते. तो प्याला घेऊनं पितो व उठून बसतो. )

**चंद्या:**—( हंसून ) माणसाचं मन तरी काय मिस्किल आहे बघा ! अन्न–पाणी मिळतांच, भावी बायको डोळ्यांसमोर दिसूं लागली ! सुंदर !

**सुंदर:**—काय म्हणतां ?

**चंद्या:**—( निरखून पाहून ) म्हणजे तूं खरोखरीच माझ्यासमोर उभी आहेस का ? हात दे बघूं इकडे !

**सुंदर:**—देवा–ब्राम्हणांच्या साक्षीशिवाय ?

**चंद्या:**—अग, त्यांच्या साक्षी घालूं नंतर ! प्रथम मला हात दे उठायला !

**सुंदर:**—आइ ! बाई ! काय ही अवस्था झाली दोन दिवसांत. देवा कायरे हा प्रसंग !

**चंदन:**—देवाला काय विचारतेस ? मी सांगतों. पण या प्रसंगातून बाहेर पडायची काढ सोय कांहीं तरी.

**सुंदर:**—हें कुलुप मला कसं निघणार ? काय करूं ? ( गज हालविते )

**चंदन:**—गप्, उगीच निघेल एखादा गज ! मारुतीची मावशी तूं !

**सुंदर:**—काय करूं ? कुणाला तरी हांक मारूं का ?

**चंदन:**—वा: ! म्हणजे दोघानांही त्यानं आंत ढकलावं ?

**सुंदर:**—ढकलूं द्या !

**चंदन:**—छान म्हणजे दोनच दिवसांत एकमेकांनीं एकमेकांला खाऊन संपवावं. ( ओरडा जवळ होतो. )

**सुंदर:**—अगबाई, हा पहा आरडा ओरडा अगदीं जवळ आला. काय करूं, घरीं बाळ, म्हातारीजवळ एकटं आहे. आईचं कसं होईल ?

**चंदन:**—जाऊं देग ! म्हातारी अगोदरच मम्माच्या बाराखडींत आहे. शिवाय, इतक्या म्हातारपणीं, मृत्युशिवाय तिच्या गळ्यांत कोण हात टाकणार ? तूं तिच्याबद्दल अगदीं निर्धास्त ऐस ! पण यांतून सुटायचं कसं !

**सुंदर:**—अगबाई, मी बाजूला होतें. हा मेला मांग इकडे आला.

**चंदन:**—अग मांग ही जात झाली. नांव सांग कीं लवकर !

**सुंदर:**—रूढीराम ! लपत छपत येतोय !

चंदनः—हें बघ, तुझ्या हातांत काय आहे तें ?

सुंदरः—कांहीं नाहीं. त्या दयेचं जुनं लुगडं परत द्यायचं होतं, तें तसंच राहिलंय !

चंदनः—चल, चटकन इकडे टाक तें, आणि तूं जरा आड हो ! मी हांक मारल्याखेरीज पुढं येऊं नकोस. ( ती लुगडं टाकून जातां जातां "आला हो आला" म्हणून निघून जाते. चंदन आड होऊन लुगडें गुंडाळतो. )

रूढी०—( वह्यांसह घाबऱ्या घाबऱ्या ) या पाजी कज्जलेश्वरानें, शेवटीं माझा असा गळा कापला ! बायकांपोरानां काय होणार आहे, पण माझ्या या उधारीच्या वह्या आणि दस्त, मला संभाळले पाहिजेत. गडावर जाईन म्हटलं, तर हे राक्षस गावांत घुसले ! वाटेंतच पकडून, माझा जीव घेतील ! देवा, मरणाची कल्पनाच जर इतकी भेसूर आहे, तर मृत्यु माझ्या समोर जिभल्या चाटीत उभा राहिला, तर माझी काय अवस्था होईल ? कुठे लपूं ? कुठे जाऊं ? कज्जलेश्वर पळाल्याची वर्दी मिळून, हे तावडतोब गडाकडे धांव घेतील, तोंपर्यंत इथेच आपण सुरक्षित राहूंया ! पुढचें पुढं पाहतां येईल.

( ओरडा. )

चंदनः—( कृत्रिम स्वरानें ) देवा, सोडीवरे या संकटांतून ! मरतें ! मरतें मी आतां ?

रूढी०—ही कोण ? मरू दे. पण नाहीं. इच्याच सुश्रुषेला बसल्याचें सोंग करावें. ते आडदांड आंत आलेच, तर कज्जलेश्वरानें माझ्या मुलीचा घात केला, आणि मलाहि बंदींत टाकलें, असा कांगावा करून सुटावं. लुटीसाठीं हापापलेले ते रानवट, कैद्याच्या कोठडींत कशाला बारीक चौकशी करतील ? ( ओरडा. ) बापरे ! धुडगुस इकडेच नाचत येतो आहे. ( कुलुप दगडानें तोडतो व आंत शिरून पडलेल्या चंदनचे पाय दाबीत बसतो. )

रूढी०—गप्प बैस बाळ हं ! शहाणी माझी बाळ ती !

**चंदनः**—कोण तें ? माझे पाय कोण चुरतं आहे ?

**रूढी०**—मी तुझा बाप,–भाऊ–!

**चंदनः**—खोटं ! माझा फक्त एक नोकर होता !

**रूढी०**—मीच तो ! स्वस्थ पडा हं ताईसाहेब. ( ओरडा, रूढीराम खालीं मान घालून भरभर पाय दाबूं लागतो. दोन तीन भिल्ल प्रवेशतात. ते शोधतांना पाहून. )

**चंदनः**—धांवा हो धांवा ! कुणीतरी या गरीब गाईला या चांडाळाच्या हातून सोडवा !

**नाईकः**—तंट्या, भिव्या, बघ ! कोण ओरडतंय तें ! ( भिल्ल आंत शिरतात व रूढीरामला पकडून पुढें उभा करतात. ) बाई, आपण बाहेर या ! घाबरूं नका !

**चंदनः**—( पदरासह ) काय सांगूं दादासाहेब, त्या मांगानं–कज्जलेश्वरानं–बळजबरीनं मला इथे आणून कोंडली. आज चार दिवस, मी अन्नपाण्यावांचून तडफडलें !

**नाईकः**—अरेरे ! बसा, बाई खालीं बसा ! जा रे, तुम्हीं चोहोंकडे पाहून या. ( भिल्ल जातात. )

**चंदनः**—आज कुणीं नाहींसं पाहून, हा चांडाळ, माझ्या कोठडींत दार मोडून आला, आणि ( रडत मोठ्यानें ) त्यानं माझी अब्रू घेण्याचा प्रयत्न केला.

**रूढी०**—नशीब ! देवा, सगळीं पापं केलीं होतीं, एवढंच राहिलं होतं, तेंहि आतां नशिबीं आलें !

**चंदनः**—आपण माझ्या भावासारखे ! वेळेवर आलांत म्हणून बरं झालं ! एरवीं—

**रूढी०**—नाईकसाहेब, यापैकीं एक अक्षरहि खरं नाहीं. ही कैदाशीण—

**नाईकः**—खबरदार बिचारीला शिव्या देशील तर! बाई, तुम्ही स्वस्थ असा! अगदीं भिऊं नका!

**रूढी०**—अहो, पण हें निव्वळ कुभांड आहे!

**नाईकः**—हें कुलुप कुणी मोडलं?

**रूढी०**—मी—मी—मी. पण—

**नाईकः**—चुप! विचारतों तेवढं सांग! तूं खोलींत गेला होतास कीं नाहींस?

**रूढी०**—होय. पण—

**नाईकः**—बस्स्! या बाईच्या अंगाला तूं हात लावलास कीं नाहीं?

**रूढी०**—तें खरं, पण—

**नाईकः**—( रपाटा मारून. ) बदमाष आणि लाज नाहीं वाटत पुढं बोलायला? थांब, तुझी चामडी लोळवितो. अरे, मिशा पिकल्या, कांहीं लाज धर! बाई, चला आपण आपल्या घरीं! ( भिल्ल सुंदरला पुढं घालून आणतात. ) ही कोण बाई?

**सुंदरः**—मी याच गांवची आहें.

**चंदनः**—ती माझीच बहीण आहे नाईक साहेब. जातों आम्ही दोघी!

**सुंदरः**—लाज वाटते का बहीण म्हणायला! नाहीं हो, मी यांची बहीण नाहीं. हे—

**चंदनः**—बरं नाहीं तर नाहीं! चल घरीं! ( चंदन मुद्दाम बायकां-सारखा चालतो तोंच मागील बाजूनें त्याचा पुरुषवेष दिसतो. सर्व निरखून पहातात. )

**नाईकः**—अरेच्या, इथे कांहीं तरी भानगड दिसते. थांबा उभे रहा!

**चंदनः**—( वळून ) जाऊं द्या बाई आह्मांला? ( मुरकत जाऊं लागतो )

**रूढी०**—( चवताळून जाऊन धरून ) हा कुणीतरी लुच्चा आहे! हरामखोरा ( पदर ओढतो. ) चंद्या? पाजी.

**चंदनः**—तुझा बाप पाजी. नाईकसाहेब पाहिलंत, माझा पदर ओढतोय !

**नाईकः**—थांब उभा रहा. कोण तूं ?

**रूढी०**—अहो, हा त्या रहिमतखांच्या बद्रुद्दीनचा नोकर. खास दिल्लीचा आहे.

**नाईकः**—पकडा त्याला.

**चंदनः**—हं ! ख़बरदार ! " स्वतंत्र "

**नाईकः**—" हळदीघाट "

**चंदनः**—" समशीर "

**नाईकः**—" जयशंकर "

**चंदनः**—" जयभारत " ( नाईक येऊन भेटतो. दोघे कुजबुजतात. )

**चंदनः**—नाईकसाहेब, पकडा त्या बदमाषाला ! कज्जलेश्वराचा उजवा हात, या गावांतलि कुटाळांचा म्होरक्या, आणि तरुण मुलींना, मोंगलांच्या जनानखान्यांत लोटणारा नराधम रूढीराम तो हाच ! ( त्याला पकडतात. )

**रूढीरामः**—भरलीं माझीं शंभर वर्षे ! ( बेशुद्ध होतो. )

**भिल्लः**—नाईकसाब, हेचं त्वांड बंद झालं !

**चंदनः**—नाक दाबा म्हणजे तोंड उघडेल ? म्हणच आहे, नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाहीं.

**रूढी०**—( घडपडून ) मी निरापराधी, आहें हो !

**नाईकः**—ते पहा, सरदार सुदीन येताहेत, त्यांना सांगा काय तें ?

**रूढी०**—( घाबरून ) काय सुदीन ! ( पहात राहतो. )

**सुदीनः**—( रक्तानें न्हालेला ) होय ! सुदीन. पहा, नीट डोळे फाडून पहा ! नाईक चला. या वाड्यांतलं तुमचं काम संपलं. ताबडतोब फितुर गडाला वेढा द्या ! राणाजींची स्वारी, पल्लवदरींतून बाहेर पडायच्या अगोदर,

आपल्याला रहिमतखांच्या पिछाडीवर तुटून पडलं पाहिजे. ( ते जातात. ) बोल रूढीराम, कां आतां दांतखिळी कां बसली ? कुलस्त्रियांची निंदा करणारी, प्रभेसारख्या गरीब गाईंची भरमसाट निर्भत्सना करणारी, देशबांधवांच्या चहाड्या करणारी जीभ, आतां कां अडखळली ? बोल !

रूढी०—सुदीन, सुदीन ! माझ्यावर कां आग पाखडतां ? मी काय केलं ?

सुदीनः—तूं काय केलंस ? तुझ्या डोळ्यानीं दिसत नसेल, तर माझ्या डोळ्यांनीं पहा. कज्जलेश्वराच्या कामवासनेला बळी देण्यासाठीं, प्रभेला तिच्या घरांतून मध्यरात्रीं कुणीं फरफटत नेलं ? गरीब बायाबापड्यांनीं, विश्वासानें ठेवलेल्या ठेवी गडप् करून, त्यांना अन्न पाण्यावांचून तडफडत देशोधडीला कुणी लावलं ? विश्वासघात करून, फितुरगड मोंगलांच्या ताब्यांत कुणी दिला ?

रूढी०—सुदीन ! माझ्यावर दया करा !

सुदीनः—दया ? दयेचा आणि तुझा काय संबंध ? मूर्तिमंत क्रूरपणा करून, दुसऱ्यांच्या अब्रूवर, गिधाडाप्रमाणं तुटून पडतांना, तुला दया आठवली नाहीं ? क्रांतीच्या कल्पित पापांची न्यायकचेरी भरवितानां, डोमकावळ्या, तुला दया सुचली नाहीं; अन्नावांचून मरणाऱ्या शेतकऱ्यांकडून, व्याज वसूल करतांना तुझं अंतःकरण द्रवलं नाहीं; ज्ञातीभैरवासारख्या वृद्धवीराचा, अमानुषपणें खून करतांना तुझी दया दडून बसली होती ? आणि आतां, या सुदीनपाशीं दयेची याचना करतांना, तुझी जिव्हा अडखळली कशी नाहीं ?

रूढी०—सुदीन ! या सर्व पापांचा करविता कज्जलेश्वर आहे. मी काय केलं ?

सुदीनः—करविता कज्जलेश्वर आहे, पण कर्ता तूं आहेस ? रहिमतखांच्या शाही वशिल्यावर, तुला आप्तेष्टांची किंमत वाटली नाहीं. कज्जलेश्वराच्या जोरावर, तुला स्वर्ग दोन बोटं उरला होता; पण नीट

पहा! स्वर्ग दूर जाऊन, नरक मात्र आतां दोन बोटांवर आला आहे. देश सेवेच्या कृपेनें, वाडवडिलांच्या आशिर्वादानें, आणि स्वातंत्र्यवीर राणाजींच्या तेजानें, समर्थ बनलेल्या या तरवारीनें मी आज तुझी तिथे रवानगी करणार. जा, आणि मागोमाग येणाऱ्या कज्जलेश्वरासाठीं, नरकांत निवाऱ्याची जागा पाहून ठेव !

**चंदनः**—सुदीन देव, याच्याकडे तूर्त दुर्लक्ष करा. क्रांती ताईचा प्रथम शोध लावला पाहिजे. त्या नीचानें, त्यांचे तिकडे काय हाल मांडले असतील कुणाला ठाऊक !

**सुदीनः**—चंदन, क्रांतीच्या केसालाहि धक्का लावण्याचं त्या माकडांच्या अंगीं सामर्थ्य नाहीं. शील, सदाचार आणि आत्मविश्वासाच्या तेजानें तळपणाऱ्या क्रांतीकडे, डोळे उघडून पहाण्याची कज्जलेश्वरालाच काय पण मूर्तिमंत सैतानालाहि ताकद नाहीं. बोल, रूढीराम, कज्जलेश्वर कुठे आहे ?

**रूढी०**—तो फितुरगडावर केव्हांच निघून गेला.

**सुदीनः**—जाऊं दे. तो फितुरगडावर जाऊं दे ! सैतानाच्या पाठीशीं पडूं दे ! त्याच्या विषयवासनेला बळी पडलेल्या तरुणींचें पावित्र्य, मला त्याचा मार्ग दाखवील. त्यानें देशोधडीला लावलेल्या अनाथ कुटुंबांचे शिव्याशाप, या तरवारीच्या रूपानं, त्याचं हृदय फोडून निघून जातील. बोल, क्रांती कुठं आहे ?

**रूढी०**—मला–मला माहीत नाहीं.

**सुदीनः**—माहीत नाहीं ? माझ्या चेहऱ्याकडे नीट पहा. तुझ्या सारख्याच फितुरांच्या रक्तानें माखलेल्या, या तरवारीकडे नजर टाक. आपल्या पापांची आठवण कर, आणि नंतर उत्तरें दे ! तुझी जीभ खोटं बोलली, तरी आंत लपलेलं सत्य उघड करण्यासाठीं, या तरवारीनें तुझें हृदय मी फोडून पाहीन ! बोल, क्रांती कुठं आहे ?

**रूढी०**—नका मला मारूं नका. क्रांतीला मी फितुरगडावर पोहों-चवून आलों !

**सुदीन**:—हरामखोर, स्वतःचीं मुलंबाळं, लढाईच्या वणव्यांत होरपळत ठेऊन, द्रव्याच्या लोभानें, दुसऱ्याच्या लेकी बहिणी, त्या कज्जलेश्वराच्या स्वाधीन करतांना, अंतःकरणशून्य लोभ्या, कांहींतरी विचार करावयाचा होतास ?

**रूढी०**—मी काय करूं ? त्यानें खुणेदाखल ही आंगठी देऊन, प्रथम तिला पोहोंचती कर म्हणून, मला ठार मारण्याची भीति घातली.

**सुदीन**:—आणि जिवाच्या भयानें तूं हें दुष्कर्म केलंस ?

**रूढी०**—काय करूं ! प्राण कुणाला प्यार नाहींत ?

**सुदीन**:—प्रभेची अंतकालची धडपड, आसुरी आनंदानें पहातांना, तुला प्राणाचें महत्व पटलं नाहीं. आणि आज दुष्कृत्याचा जाब म्हणून, स्वतःच्या प्राणनाशाची वेळ येतांच, तुला प्राणप्रेमानं भडभडून आलं ? दयेची दिव्य भावना दिसूं लागली ! पण जोंपर्यंत, तुमचीं नीच कृत्यें या सुदीनच्या डोळ्यांसमोर नाचताहेत, जोंपर्यंत तुम्हीं हाल हाल करून जीव घेत-लेल्या बायाबापड्यांच्या कर्कश किंकाळ्या, माझ्या कानांत कठोर स्वरानें प्रतिध्वनित होत आहेत. तोंपर्यंत, सूड! सूडाशिवाय, मला कांहीं दिसणार नाहीं, सूडाच्या गर्जनेशिवाय, मला कांहीं ऐकूं येणार नाहीं. फितुरगडाचा दगड न दगड निखळून काढून, कज्जलेश्वराला शोधून काढतों आणि त्याच उध्वस्त गडाच्या दगडमातीच्या पर्वतप्राय ढिगांत, तुम्हां दोघां समं-धांना जिवंत गाडतों. तोंपर्यंत त्या सर्व भक्षक काळाचं मृत्यूचं—चित्र, अंधेरांतल्या प्रकाशांत, कल्पनेचे डोळे ताणून पहात—जिवंत—रहा !

**चंदन**:—( सुदीनच्या कानाशीं ) ईश्वरानेंच मार्ग दाखविला !

**सुदीन**:—उत्तम ! चंदन, छान तोड काढलीस ! रूढीराम, कज्जले-श्वराची ती अंगठी आण इकडे. आण ! ( रूढीराम अंगठी देतो ) चंदन,

सुंदरला घरीं . पोहचवून तूं गडाच्या पायथ्याशीं, बलभीमाच्या गोटांत माझी वाट पहा. पुढील बेत, मी तुला समजावून सांगेन ! बस्स ! आतां मी आहें आणि फितुरगड आहे. राणाजींच्या कृपेनें आणि वडिलांच्या आशिर्वादानं, एकही सैनिक बळी न देतां, गडाच्या पायथ्याशीं संतापानें फडफडणारं केशरी निशाण, मावळत्या सूर्यनारायणाच्या साक्षीनें, मी फितुरगडाच्या माथ्यावर फडकवीन, तरच मी राणाजींचा सेवक. तरच माझ्या क्षात्रधर्माचं सार्थक.

## पद १७ वें.

**सदैव शांत वीर आज क्रूर होत। या रणक्षेत्रीं ॥ ध्रु० ॥ दे चमकुनि असि चपल खल-रुधिर-तृषित मज विजय खचित महा ॥ ध्रु० ॥ रणीं रत रिपुमद शमविन आतां। अतुल बल, समरप्रविण प्रतापा। दे तवबल हो यशद रणसंगर ॥**

( जातो. )

**चंदनः**—चला रूढीराम, तुम्हाला नेण्यासाठीं, यमाचा रेडा आगाऊच दाखल झाला आहे. ( रूढीरामला धक्के देत आंत नेतो. )

---

## प्रवेश ३ रा.

**स्थलः**—फितुर गडांतील यातना—गृह.

पात्रें:—( क्रांती. जवळ पहारेकरी उभा. )

**क्रांतिः**—बाबा, आपण क्रांतीला कसे हो टाकून गेलांत ! आपल्या पश्चात् क्रांती आणि संकटं, मरेपर्यंत अशींच गळ्यांत गळा घालूनच का रहाणार ?

## पद १८ वें.

छळे आपदा, विमला बाला। नच येई देवा ॥ कां
करुणा ॥ ध्रु० ॥ असे जेथ आनंद ॥ सकलांसि थारा।
तेथें न जागा या जीवां ॥ १ ॥

कायेनं, वाचेनं आणि मनानं, पूर्ण विरुद्ध असलेल्या क्रांतीला, आपलीशी करण्यासाठीं, या कज्जलेश्वराची चाललेली धडपड पाहून मला आतां हसूं येऊं लागलं आहे. ( पहारेकरी हंसतांना पाहून ) कां तुम्ही कां हंसतां ?

**पहारे०**—तुझं निष्कारण हंसणंच माझ्या हंसण्याचं कारण आहे. या भयंकर प्रसंगीं-सुद्धां तुला हसूं येतं ? आश्चर्य आहे ?

**क्रांतिः**—आश्चर्य कसलं ! भयंकर प्रसंगांतहि आनंदानं हंसत राहणारे कांहीं असतातच !

**पहारे०**—क्वचित् ! पण बायकांनीं हंसून घालविण्यासारखा हा प्रसंग नाहीं खास !

**क्रांतिः**—आणि रडून पार पडण्यासारखाहि नाहीं ! प्रभुकृपेवर दृढ-निश्चय ठेऊन, संकटांतहि आनंदी रहाणाराच, त्या प्रसंगांतून पार पडूं शकतो.

**पहारे०**—मुली, कुठला प्रभु ? त्याला कुणी पाहिलं आहे ? तो कुठे आहे ? मुली, ईश्वर जगांत नाहीं, आणि असला, तरी जबरदस्ताचा हात धरण्याची त्याची ताकद नाहीं. तुझा ईश्वर दिसला, तर त्याची शेंडी पकडून, मी त्याला मुसलमान धर्माची दीक्षा देईन.

**क्रांतिः**—पकडायला त्याला शेंडी नाहीं, आणि मुसलमान धर्माची दीक्षा द्यायला, तो मुसलमान नाहीं असं नाहीं. सर्व धर्म ज्याच्या चरणीं विराम पावतात, त्याला दीक्षा कसली देतां ? शिपाईबुवा, देवावर आपला फारच राग दिसतो. पण तो देव दयाळू आहे.

**पहारे०**—दयाळू ? होय, त्याच्या दयाळूपणाचा मासला म्हणूनच,

तूं या कज्जलेश्वराच्या हातीं भ्रष्ट होणार आहेस ! आणि त्याच्याच दयेनें, मी हा असा दाढीमिशांचं जंगल वाढवून, तुझ्या समोर उभा आहें.

**क्रांतिः**—शिपाई बुवा, याबद्दल देवाला दोष न देतां दैवाला द्या ! परमेश्वरापासून निर्माण होऊन, परमेश्वरांत पुन्हां मिसळेपर्यंत, केलेल्या बऱ्या वाईट गोष्टींचें प्रायश्चित्त भोगूनच जीवाला मुक्त व्हावं लागतं. जन्म दिल्याबद्दल मूर्ख मुलांनीं, आईबापानां दोष देण्या इतकंच मूर्खपणाचं आहे हें !

**पहारे०**—मूर्खपणाचं असेल, पण तें सत्य आहे. आणि कज्जलेश्वराच्या आजच्या जुलूमानंतर, तुझं हें तत्त्वज्ञान, माझ्या इतकंच गढूळ होईल.

**क्रांतिः**—माझा परमेश्वावरील विश्वास, परमेश्वराइतकाच पवित्र आणि अभंग आहे ! पण आजच्या कज्जलेश्वराच्या जुलूमानंतर तुमचा मात्र गेलेला विश्वास, मी परत आणीन !

**पहारे०**—तुझ्या दृढ निश्चयाचं मला कौतुक वाटतं ! काय करूं, माझ्यावर आलेल्या त्या प्रसंगांची आठवण होतांच, मुली, संतापानं माझी सारासार विचारबुद्धी नष्ट होते ! त्या देवावर माझा पूर्ण विश्वास होता. मी एकनिष्ठेनं त्याची अष्टौप्रहर आराधना करणारा त्याचा भक्त होतों. पण त्याच्या आराधनेंत मग्न असतांना, त्याच्यासमोर, मला माझ्या मुलांबाळांसह भ्रष्ट करण्यांत आलं. शेंडीची दाढी झाली, पुराणाचं कुराण झालं, नमस्कारांतून मी सलामांत आलों ! आणि याला कारण कोण तर आमचेच भाऊबंद ! आमचेच स्नेही सोबती !

**क्रांतिः**—म्हणजे ? तें कसं ?

**पहारे०**—मुली ! त्यांच्याच कृपेनें मला हा राजधर्म प्राप्त झाला. कर्मठ प्रतिष्ठितांची हांजी हांजी केली नाहीं. येणाऱ्या शाही सरदारांच्या पायांवर लोटांगणें घेतलीं नाहींत, म्हणून त्यांनीं हा सूड घेतला. मला आपल्या लाथांनीं, त्यांनीं परधर्मांत ठोकरलं !

**क्रांतिः**—अरेरे, शिपाईबुवा, काय हे तुमचे हाल ?

पहारे०—मुली, ज्या गोष्टी मी अत्यंत त्याज्य मानल्या, त्याच आतां कर्तव्य म्हणून मी निर्ढविलेल्या हातांनीं करतों आहें. पण माझ्यां मुलाबाळांचे हाल, आतां माझ्याच्यानें पहावत नाहींत. जातीभेद न मानणारे मुसलमान बाटगी अवलाद म्हणून माझ्या मुलींना पत्करित नाहींत आणि धर्मभ्रष्ट म्हणून, हिंदु शिवत नाहींत. काय करूं! मुली, तुझा देव असला तरी तो आंधळा, निष्ठुर, भित्रा आहे.

क्रांतिः—मला तुमची कींव येते. पण त्याच्यावर विश्वास ठेवा! तो दयाळु आहे, आणि त्याची दया तुम्हाला दिसल्या खेरीज राहणार नाहीं.

कज्जले०—क्रांती, त्या देवाच्या दयेची त्याच्यापेक्षां तुलाच यावेळीं जास्त जरूरी आहे. खलमल्ल, तूं जा. किल्लेदार साहेबांना सांग, बद्रुद्दीन मदत घेऊन येईल, घाबरण्याचं कारण नाहीं. (खलमल्ल क्रांतीकडे दुःखानें पहात जातो.) क्रांती, या शेवट त्या प्रसंगीं, तूं काय करायचं ठरविलं आहेस?

क्रांतिः—कांहीं नाहीं.

कज्जले०—क्रांती, आजचा आपल्या भांडणाचा शेवटचा दिवस आहे.

क्रांतिः—कणाला ठाऊक!

कज्जले०—क्रांती, तुझीं उद्दाम उत्तरं न ऐकतां, मी आज—

क्रांतिः—कां थांबलात कां? उच्चार करायची छाती होत नाहीं?

कज्जले०—क्रांती, त्या दिवशीं, सुदीनशीं लढण्याचं मी टाळलं, याचा अर्थ मी भित्रा आहें असा करूं नकोस!

क्रांतिः—भलतंच! तुम्हाला भित्रे म्हणण्याइतकी मी मूर्ख नाहीं. परमेश्वराला न भिणारा कुणालाच भीत नाहीं.

कज्जले०—क्रांती, या कज्जलेश्वराचं, सहनशील संभावितांचं सोंग, परवांच संपलं आहे. अद्याप सावध हो, आणि पत्नी या नात्यानें मी तुझा स्वीकार करावयाला कबूल आहें, तोपर्यंतच राजी हो!

क्रांतिः—कज्जलेश्वर, तुमच्या सर्व प्रश्नांना माझं एकच उत्तर आहे. वाटेल ते हाल होवोत, माझ्या शरीराचे तिळा तिळा एवढे तुकडे झाले,

तरी माझा निश्चय बदलणार नाहीं. हा नाटकी प्रकार बंद करून काय करायचं असेल तें करून घ्या !

**कज्जले०**—क्रांती, हेंच तुझं उत्तर ?

**क्रांतिः**—कितीदां सांगू ! हेंच ! हेंच ! हेंच !

**कज्जले०**—क्रांती, नीट विचार कर !

**क्रांतिः**—काय कटकट आहे ! ( दूर जाऊन स्वस्थ बसते. )

**कज्जले०**—कोण आहे बाहेर. ( खलमल्ल येतो. ) काळ्या कोठडीच्या रखवालदाराला, इकडे पाठवून दे. ( तो जातो. ) काळ्या कोठींतील अंधारांत, डोळे मिटेपर्यंत स्पष्ट दिसणारं, भयंकर दृश्य पाहिल्यानंतरही तुझा हा निश्चय, कायम राहतो कीं काय, हेंच मी आतां पहाणार आहें !

**क्रांतिः**—कज्जलेश्वर, नुसत्या भाषेच्या बागुलबुवानं मी भ्यायची नाहीं. दुसरा एखादा मार्ग, तुमच्या कल्पक डोक्याला सुचतो का पहा !

**कज्जले०**—कल्पकांच्या कल्पनेला सुचलेला, आणि तुझ्यासारख्या नाजुक मैनेलाच काय, पण तोफेच्या तोंडावर चालून जाणाऱ्या, बेफाम वीरानांहि वठणीवर आणणारा मार्गच, मी आतां तुला दाखविणार आहें.

**क्रांतिः**—मी आनंदानं पाहीन तो ! पण आपण त्वरा करा ! मी प्राणत्यागाला उत्सुक आहें.

**कज्जले०**—पण मी उत्सुक नाहीं. तुला ठार मारणं, हें माझं उद्दिष्ट नाहीं. मृत्यू पूर्वीचे अनंत हाल भोगवून, तुला जिवंत ठेवणं हा माझा उद्देश आहे.

**क्रांतिः**—सुखोपभोगाला लालचावलेल्या तुमच्यासारख्यांच्या विषयी मनाला, शरीरकष्टाची भीति वाटत असेल पण मला त्याचं कांहींच वाटणार नाहीं. शरीराच्या हालानं, अंतःकरण हातीं येईल म्हणणं, मूर्खपणाचं आहे. सक्तीच्या पोटीं, भक्तीचा जन्म कसा होणार ?

**कज्जले०**—भक्ति ! आणि ती पाहिजे कुणाला ? ती किल्ल्याच्या तटावर टक्कर घेणाऱ्या त्या हरामखोराकरितां राखून ठेव. मला मनाचं प्रभुत्व नको, शरीराचं स्वामित्व पाहिजे. मनाबरोबर बंडखोरी करणारं तुझं शरीर, यातनांच्या माऱ्याखालीं खास वठणीवर येईल.

**क्रांतिः**—कज्जलेश्वर, खरोखरी का तुमचा ब्राह्मण घराण्यांत जन्म झाला आहे. नाहीं ! इतक्या नीच मनोवृत्तीचे, इतक्या पशू अवस्थेला पोहों-लेले अधम, ब्राह्मणांत तर नाहींतच, पण दैत्यांतही निर्माण होणार नाहींत. तुमचा जन्म, रौरवांत झाला आहे.

**कज्जले०**—क्रांती, तुला हस्तगत करण्याकरितां, गांवांतील गाढव पंडितांची मदत मिळावी म्हणून, मी तें ब्राह्मणत्वाचं सोंग आणलं होतं समजलीस ! सर्व संग परित्याग करणाऱ्या परमहंसाला, जशी लौकिक-बंधनं नसतात—

**क्रांतिः**—तशीच, लाज सोडलेल्या अधमानाहि नसतात.

**कज्जले०**—अलबत् ! जगांतील सर्व वस्तूंचा, शक्य त्या साधनानीं उप-भोग घ्यावा, हेंच आमचं ध्येय आहे. खावं, प्यावं, मजा करावी, ही आमची गीता आहे. पापपुण्य या गोष्टी, स्वतःला शिष्ट समजून दुसऱ्याला उपदेश करणाऱ्या धेंडानीं, आणि आपला मूर्खपणा जगावर ओतणाऱ्या भाषापंडितांनीं, शास्त्रांच्या सजावटीनं अर्धवटांपुढं टाकल्या आहेत.

**क्रांतिः**—कज्जलेश्वर, मला इथून जाऊं द्या ! माझा प्राण घ्या ! पण मनुष्य प्राण्याचं हें अधः पतन, माझ्याच्यानं पहावत नाहीं. आपल्या मुखांतून बाहेर पडणाऱ्या घाणींत उभं राहणंही, मला अशक्य झालं आहे.

**कज्जले०**—आणि कांहीं दिवसांपूर्वीं, तुझ्या तोंडांतून पडणारी घाण, यापेक्षां सहनीय होती अं ? विषारी वाक्यांनीं दुसऱ्याच्या अंतःकरणाला भयंकर जखमा करतांना, तुझी भाषा, गुदगुल्या करणारी होती ? घिसाड-

घाईंत घडलेले चेहरे म्हणून, ज्या तोंडांची तूं हेटाळणी केलीस, तेंच हें तोंड, यातनागृहाचें तोंड उघडतांच, तुला सुंदर दिसूं लागेल. ज्याच्या हातांना स्पर्श करण्याचा विचार मनांत येतांच, तुला आत्महत्या आवडली, त्याच्या लाथा खातांना तुला आनंदानं भडभडून येईल.

**क्रांतिः**—जगांत केव्हां काय होईल हें कुणी सांगावं ? पण कज्जलेश्वर, तुमची काळी कोठी मला पाहूं द्याच एकदां. तुमच्या आयुष्यापेक्षां, तुमच्या विचारांपेक्षां आणि तुमच्या आचारांपेक्षां, भयंकर आणि यातनापूर्ण, या जगांत आणखी कांहीं असेलसं वाटत नाहीं.

**कज्जले०**—तुझ्या वाटण्यावर वस्तुस्थिती अवलंबून नाहीं. ती पहा, तुझ्या आदरातिथ्यासाठीं तिष्ठत राहिलेली काळी कोठी, आनंदांत 'आ' वासून उभी आहे. ( मागील पडदा जाऊन, अंधारमय यातनागृह दिसतं ) नीट पहा ! कां अशी भांबावलीस कां ?

**क्रांतिः**—नाहीं ! म्हटलं, तुमच्या सारख्यांच्या अंतःकरणाचं हें भेसूर चित्र इतकं हुबेहूब घडविणारा हा कोण कारागीर ? स्वतःचें बुद्धीसर्वस्व यातनागृहांत खर्ची घालण्याचं हें पाप कुणीं पदरांत घेतलं, याचा मी विचार करतें आहें.

**कज्जले०**—क्रांती, विचार कर. क्षणभरानं खलमल्ल फरफरा ओढीत नेऊन, या भुकेनें तोंड पसरणाऱ्या यंत्रांना, तुझ्या शरीराचा एक एक तुकडा चारून रिकामा होईल.

**क्रांतिः**—कज्जलेश्वर, माझ्यापेक्षां, या यंत्रांची तुम्हालाच जास्त भीति वाटत आहे.

**कज्जले०**—होय ! कारण, तुला कदाचित् ठार मारून तीं तुला माझ्या हातून सोडवून घेतील.

**क्रांति०**—घाबरूं नका. एक परमेश्वर अगर सुदीन, यांच्या शिवाय कुणाबद्दलहि मला आशा नाहीं.

**कज्ज०**—दऱ्या खोऱ्यांच्या वळचणींत लपणाऱ्या त्या भेकडाला, या फितुर गडाचे तट ओलांडायला, गरुडाची भरारी आणि सिंहाची छाती पाहिजे. क्रांती, सुदीनच्या नशिबांत, तुला पहायचंच असेल, तर शील-सामर्थ्याचा दिमाख मातींत मिसळलेली, मोंगल सैन्यांतील भिस्त्याच्या भाकरी बडवतानांच त्याला तूं दिसशील. क्रांती या खोली बाहेर गेली, तर कज्जलेश्वराची बटिक म्हणूनच, जिवंत जाईल. एरवीं तिचीं हाडं, या यातना गृहांतच कुजत पडलीं पाहिजेत.

**क्रांतिः**—उः ! पडूं देत. अपवित्र होऊन उभीं राहण्यापेक्षां, या ठिकाणीं तीं पडून, कुजलेलीं काय वाईट ?

**कज्ज०**—उत्तम. खलमल्ल, उठाव इस्को.

**खलमल्लः**—आज्ञा.

**कज्ज०**—सर्वांत भयंकर–क्षणोक्षणीं येणाऱ्या मृत्यूचं पाऊल नीट दिसेल–अशा ठिकाणीं या क्रांतीला बांध !

**क्रांतिः**—कज्जलेश्वर, माझ्या मतें, परिणाम करण्याचा हा अत्यंत हीन आणि हिडिस मार्ग आहे. बुद्धीप्रधान ज्ञात्यांना, हा बायकांना भिवविण्याचा पोरकट प्रयत्न, बुद्धिहीनत्वाचा दिसेल.

**कज्जले०**—वाटेल तें म्हण ! पोरकट म्हण, हिडिस म्हण, बुद्धिहीन म्हण, पण दुराग्रही बेअकल्यांच्या जगांत, हेंच पाहिजे. आणि यानेंच माझ्या कार्याची पूर्ती होणार ! कायदेभंगाचं सोंग करणाऱ्यांना, विजय मंदिर दिसेपर्यंत दुराग्रही सनातन्यांपासून, तों बेअकली बाटग्यांपर्यंत, सकारण वैर करणाऱ्या कज्जलेश्वरापासून, तों निष्कारण छळणाऱ्या रूढीरामापर्यंत प्रत्येकानें केलेले हाल भोगावे लागतात. खलमल्ल उचल तिला ! ( खलमल्ल येऊन तिचा हात धरतो. )

**क्रांतिः**—विश्वपालका, या माझ्या बलिदानानं तरी कज्जलेश्वराची कामवासना नष्ट होवो आणि हा विषयी कसायांचा खाटिकखाना बंद होवो,

इतकीच तुझ्या चरणीं माझी प्रार्थना आहे. प्रत्येकाची भवितव्यता पूर्ण विचारानें आणि दयाळू हातानें तूं लिहितोस ! तुझा मृत्युसंदेश मला प्रमाण आहे. सुदिन, मी चाललें ! पण तिथेंहि मी आपली वाट पाहीन.

**कज्जले०**—क्रांति, पायाखालची जमीन फिरल्यासारखी वाटते का ? अद्याप विचार कर !

**क्रांतिः**—आतां झाला तर तो अविचार होईल !

**कज्जले०**—खलमल्ल उठाव ! ( खलमल्ल तिला नेऊन चाकावर बांधवो व दुसऱ्या खुणेबरोबर वरील धारेचें पातें चालू होतें. ) क्रांति, काय दिसत आहे समोर ?

**क्रांतिः**—माझ्या सुदीनचं मुख, परमेश्वराचे पाय !

**कज्जले०**—तोंड बंद कर ! मरतांना तरी, अपशब्दांच्या वर्षावांत मरूं नकोस !

**क्रांतिः**—मग तोंड बंद करा ! कज्जलेश्वर, क्रांति, मनानं पवित्र, शरीरानं शुद्ध, स्वर्गाला चालली आहे आणि हीच, तुमच्या सारख्या पातक्यांच्या अपयशाची साक्ष ! जय विश्वपालक !

**कज्जले०**—खलमल्ल चलाव जोरसे ! ( चाक जोरानें फिरत जातें. )

**क्रांतिः**—( डोळे मिटून ) सुदीन देव, क्षणाक्षणाला, तुमच्या माझ्यांतलं अंतर वाढतें आहे. तुम्हाला एकवार पहाण्याची इच्छा होती पण आतां, मी हृदयांतच आपली मूर्ति पहातें. सुदिन !

**कज्जले०**—सुदिन, सूर्याबरोबरच मावळला आहे. क्रांती, पहा अद्याप—

**क्रांतिः**—अहा हा, किती आनंदपूर्ण प्रवास हा ! सुदीन, तुम्ही असतां तर किती बरं वाटलं असतं मला ! रूढी नाहीं, कायदा नाहीं; विशेष हें कीं, कज्जलेश्वर इथे येऊं शकत नाहीं. सुदीन—

**कज्जले०**—ओरड ! तें पातें मस्तक फोडून जाईपर्यंत त्याच्या नांवानं

टाहो फोड! ये सुदीन, मावळत्या सूर्यकिरणावर तरी बसून ये! पण ये एकदां!

**सुदीनः**—( दार फोडून ) कज्जलेश्वर, भक्तांच्या धाव्याला परमेश्वर, आणि वैऱ्याच्या हांकेला वैरी, 'ओ' दिल्याखेरीज कसा रांहील? डोळे फोडून पाहूं नकोस. मी भुरटा न्यायाधीश! क्रांतीचा सुदीन, आणि तुझी प्राणदंडाची शिक्षा अमलांत आणणारा मांग तुझ्यासमोर उभा आहें.

**क्रांतिः**—सुदिन, आलांत शेवटीं!

**सुदीनः**—क्रांती! क्रांती! ( जाऊं लागतो. कजलेश्वर तरवार घेऊन आडवा होतो. )

**कज्जले०**—( लढत. ) खलमल्ल, फिराव जोरसे. पहा—उघड्या डोळ्यांनीं! तुझ्या क्रांतीचा हृदय भेदक अंत पहा!

**सुदीनः**—( लढत ) काय करूं! खलमल्ल, अधमा, क्षणभर थांब. क्रांती! क्रांती! आलों. ( धारेचें पाते डोक्याजवळ येतें. )

**क्रांतिः**—सुदीन, येतें मी! संभाळा! नमस्कार!

**कज्जले०**—सुदीन, धांव! पळ लवकर! हा सूड, हा कज्जलेश्वराचा सूड! ( हंसत लढत रहातो )

**सुदीनः**—क्रांती, क्रांती! काय करूं? ( कमर पट्यांतून कट्यार काढून, दोरीवर मारतो. दोरी तुटतांच, चाक हळूहळू खालीं येतें. ) कज्जलेश्वर, संभाळ! जय जगदीश! ( कज्जलेश्वराची तरवार पडते. तो घाबरून उभा राहतो. सुदिन त्याला रेटित आंत नेऊन, भोसकतो. कज्जलेश्वर "माझा सूड!" ओरडून पडतो. खलमल्ल पळून जातो. क्रांती दुःखानें मान फिरविते. ) ब्राह्मण धर्माला लागलेला कलंक, हिंदु समाजाला लागलेली आग, मनुष्यत्वाला लागलेला काळिमा, आज यमलोकीं गेला. ( चंदन दोन अनुचरांसह प्रवेश करतो. त्याचवेळीं सुदीन क्रांतीला सोडवीत असतो. )

**चंदनः**—सुदीनदेवं, फत्ते ! कज्जलेश्वराच्या अंगठीच्या जोरावर, बलभीम सैन्यासह बिनबोभाट गडावर आले. लोक सावध होण्यापूर्वींच चोहोंकडे आमचे चौकीपहारे बसले. पण हें काय ?

**सुदीनः**—पाहिलंस ! एक क्षणाचा विलंब लागता, तर क्रांतीला—

**क्रांतिः**—सुदीन दिसले नसते. होय ना ?

**सुदीनः**—चंदन, जरुरीपुरती शिबंदी इथे ठेऊन, लगेच बाकीच्या सैन्याला, कूच करायचा हुकूम द्यायला सांग !

**चंदनः**—पण क्रांतीताई—

**सुदीनः**—जिथे क्रांती तिथं सुदीन ! शत्रूशीं मी, आणि कज्जलेश्वर, रूढीरामसारख्या स्वकीयांशीं क्रांती, अशी दुहेरी मोहिम आतां सुरू होणं भाग झालं आहे.

**चंदनः**—आतां आपलं मंगल—

**सुदीनः**—नगाऱ्याची घाई टिमकीचें काई ! राणाजींच्या हातून मेवाड मंगल—

**सुंदरः**—आणि नंतर, क्रांती सुदिनचं शुभमंगल ! होय ना ?

( सुंदर क्रांतीला भेटते. )

**चंदनः**—आलीस का तूं ?

**सुंदरः**—मी जन्माचीच लागलें आहे तुमच्या मागं !

( मागील बाजूस निशाण चढतांना दिसतें. सर्व नमस्कार करतात )

**सुदीनः**—क्रांती, परवशतेच्या प्रलयांतून, परकीयांच्या हल्ल्यांतून, राणा प्रतापांच्या प्रतापानं, स्वतंत्र राहिलेलं हें निशाण, आज फितुरगडावर फडफडत, जगाला कसला संदेश सांगत असेल ? ( सर्व उभे राहतात. )

**क्रांतिः**—दुसरा कोणता संदेश सांगणार ?

## पद. १९

गगनिंहि फडके ध्वजा । करित मग ध्वनित गीता ॥ ध्रु० ॥ व्यसनिहि माता आतां । रुतलि जी इच्छित नेता । अदय अति बंधनें विकल सकल माता ॥ १ ॥ झडकरी ऐक्या वरा । विसरूनि भयद भेदा । सकल मग या क्षणीं प्रबल अमर देश काजा ॥ २ ॥ फडफडे मंत्रा अशा । उपजवी सुखद आशा । वदुनि गत हीं करी अखिल अशुभ देश पाशा ॥ ध्रु० ॥

अंक तिसरा समाप्त.

' श्रीकृष्णार्पणमस्तु '

समाप्त.



**सुदीन**—हें निशाण, जगाला कसला संदेश सांगत असेल! पान [११४]

## —शेवटीं—

सुमारें साडेतीनशें वर्षांपूर्वी दोन भिन्न धर्मियांमध्यें घडलेला हा—कित्येकांच्या मतें धर्मबाह्य—कित्येकांच्या मतें धर्मसंमत पण रूढीविरूद्ध—असा काव्यपूर्ण प्रसंग, मी विनोदि पात्रांच्या मदतीनें, फक्त स्थल व नांवें बदलून, फारच थोड्या फेरफारासह प्रेक्षकांसमोर आज ठेवीत आहें. परमेश्वरानें आपल्या मर्जीप्रमाणें घडवून आणलेला हा प्रसंग आहे. क्रांतिचें सुदिन लाभाचें प्रेमवेड घालवून परमेश्वरानें तिला न दिलेले—सद्गुण रंगभूमीच्या परंपरेसाठीं तिच्यावर लादण्याचा प्रयत्न माझ्याच्यानें करवला नाहीं. क्रांती, सुदिन लाभाचें वेड लागलेली फक्त प्रणयिनी होती इतकेंच—

आज ता. ११ जानेवारी रोजीं रात्रौ या नाटकाचा प्रयोग होत असून त्याचें सर्व यश माझे परम मित्र यशवंत संगित मंडळीचे डायरेक्टर **महाराष्ट्र कोकिळ शंकरराव सरनाईक** यांना आहे. त्यांनीं, त्यांचे तालिम मास्तर श्री. पुरोहित व इतर नटमंडळी या सर्वांनीं घेतलेल्या श्रमांबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

माझे बंधु तुल्य प्रियमित्र श्री. बाबूराव पै, श्री. दादासाहेब तोरणे, श्री. बापुराव पवार श्री. दादा परचुरे व सोनी, या पुस्तकाचे प्रकाशक खरे पुराणिक मंडळीचे मालक व श्री. प्रभावळे व कांहीं प्रेमळ व्यक्ती, या सर्वांच्या अकृत्रिम मित्रप्रेमामुळेंच हा सुदिनलाभ होत आहे ही गोष्ट मी कसा विसरेन ?

असेंच निर्हेतुक प्रेम करणारे मित्र मला सदैव लाभोत अशी त्या विश्वपालकाच्या चरणीं प्रार्थना करून, येथपर्यंत नाटक वाचित आलेल्या वाचकांस नमस्कार करून मी रजा घेतों.

---

IRBK-0100950

IRBK-0100950

IRBK-0100950